म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ३८५
९११९९८५

# पद्यग्रंथ.

भाग १ ला.

वामन रामचंद्र जोशी.
बी. ए. (मुंबई) कृत.

REFBK-0000281
REFBK-0000281

ॐ

जगदीशाय नमः

# पद्यग्रंथ.

## भाग पहिला.

रा. वामन रामचंद्र जोशी, बी. ए., मुंबई.

कृत.

आवृत्ति पहिली ५०० प्रति.

मुंबई, गिरगांव, "कर्नाटक" छा. छा.

श्रीशिवाजीराज्याभिषेक ...

श्रीशालीवाहन ...

ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क ...

REFBK-0000281

REFBK-0000281

२( १९०६

# प्रस्तावना.

स्वदेशाचे माझ्यावर असंख्य उपकार आहेत व स्वदेशसेवेसंबंधानें माझ्यावर मोठी जबाबदारी आहे. या बाबतींत माझ्या कर्तव्यांपैकीं एक ह्मणून राष्ट्रहितोपयोगी असे गद्यपद्यग्रंथ जन्मभाषेंत यथामति लिहावे व ते पुस्तकरूपानें पुढें एकत्र छापावे असा माझा हेतु आहे, व ईश्वरानें आयुष्य व इतर अनुकूल स्थिति दिल्यास तो लवकरच सफल होईल. या कामाकरितां तयारी ह्मणून आजवर कांहीं गद्यग्रंथ मी लिहून प्रसिद्ध केले व आतां हा पद्य ग्रंथांचा पहिला भाग प्रसिद्ध करीत आहें. या भागांत काय प्रकरणें आहेत हें अनुक्रमणिकेवरून कळून येईल, सबब येथें जास्त लिहीत नाहीं. ही प्रेमसेवा परमेश्वराला व राष्ट्ररूपी परमेश्वरविभूतीला मान्य होवो अशी अत्यन्त नम्रभावानें विज्ञापना आहे.

मुंबई, गिरगांव,
आंम्र्यांची वाडी.

ग्रंथकर्ता,
वामन रामचंद्र जोशी.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | पान. |
|---|---|
| राष्ट्रासाठीं ईशप्रार्थना ... ... | १ |
| जनबोध ... ... ... | २१ |
| देशभक्तमहिमा ... ... ... | २१ |
| सहज धुरीण कोण होतो ? ... ... | २४ |
| उत्तम गृहसुखवान् देशभक्त ... ... | २५ |
| विद्युत्विक्रम ... ... ... | २८ |
| सुशील पत्नी ... ... ... | २९ |
| स्वदेशाभिमानी सती ... ... | ३० |
| देशभक्त स्त्री ... ... ... | ३४ |
| कोणी दुर्दैवी देशभक्त ... ... | ३५ |
| कोणा दुर्दैवी देशभक्ताचे उद्गार ... ... | ३७ |
| कोणी दुर्दैवी राजा ... ... ... | ४२ |
| पाप ही सुखवृक्षाला कीड आहे ... ... | ४४ |
| सुखनाशाचीं कारणें ... ... ... | ४५ |
| भाग्यशत्रू कोण ? ... ... ... | ४७ |

दुर्दैवी देशभगिनींचें समाधान ... ... ४७
वैभवनाशाचें कारण ... ... ४९
पाण्याचा झरा व सुखाचा झरा ... ... ५०
वायु व मनुष्य यांचा संवाद ... ... ५१
संगतिप्रभाव ... ... ... ५२
सृष्टि अनसलता शिकविते ... ... ५३
पुण्यसंग्रह ... ... ... ५५
तपप्रभाव ... ... ... ५६
बालबोध ... ... ... ५८
वीर्यप्रभाव ... ... ... ५९
ओज ... ... ... ६१
जिवंत असून मृत कोण ... ... ६२
पाप भोगणें आहे तों पुण्य फिकें पडतें ... ६३
पाप दु:खाचें मूळ आहे ... ... ६४
देवाची आज्ञा ... ... ... ६६
ईशप्रार्थनामहिमा ... ... ... ६७
जीवाचें अमरत्व ... ... ... ६८

गच्ची ... ... ... ... ६९
वारापाऊस ... ... ... ७१
मोगरी ... ... ... ७१
विस्मृति ... ... ... ७२
गाढझोंप ... ... ... ७३
स्थित्यंतर ... ... ... ७४
मृत्युस्तुति ... ... ... ७५
हिंसानिषेध ... ... ... ७८
यशप्राप्तीला अवश्य गोष्टी ... ... ७९
शुद्धाचारसंबंधी जनबोध ... ... ८०
दुःखी कोण होतो ... ... ... ८१
सुखी कोण असतात ... ... ... ८३
अभागी कोण होतो व भाग्यवान कोण होतो ८४
कोणी अनुतापी ... ... ... ८६
स्वतःसंबंधी ... ... ... ९०
ईशप्रार्थना ... ... ... ९१
दिव्यजनप्रार्थना ... ... ... ९३

स्वतःसंबंधी ( आर्यसंघस्थापना ) ... ९४

स्वतः व मित्र रा. रा. विनायक हरिश्चंद्र ठाकूर यांसंबंधी ( आर्यन एज्युकेशन सोसायटीची स्थापना. ... ... ... ९५

स्वतःसंबंधी ( राष्ट्रीयप्रार्थनापुस्तक ) ... ९७

स्वतःसंबंधी ( राष्ट्रीय सनातन धर्मपुस्तक )... ९८

स्वतःसंबंधी { स्वदेशाभिमान संजीवन पुस्तक, मुलांचा स्वदेशाभिमान पुस्तक, स्त्रियांचा स्वदेशाभिमान पुस्तक } ९९

स्वतःसंबंधी ( द्वितीय विवाह न करण्याचा निश्चय ) ... ... ... १००

स्वतःसंबंधी ( दुर्जन शत्रूंस उद्देशून ) ... १०१

स्वतःसंबंधी ( मनाचे दोषांस उद्देशून ) ... १०३

स्वतःसंबंधी ( आकांक्षेस उद्देशून ) ... १०४

स्वतःविषयीं ( जगत्कर्त्याशीं भाषणें ) ... १०६

परलोकवासिनी पत्नी जवळ आहे असें कल्पून. } सूर्यास्तसमय ... ११९

| | | | |
|---|---|---|---|
| ,, | ,, | मंजुल वायु ... | १२० |
| ,, | ,, | बाग ... ... | १२१ |

परलोकवासिनी पत्नीस उद्देशून शोक ... १२३
परलोकवासिनी कन्या कृष्णाबाई हिला उद्देशून १२४
परलोकवासिनी पत्नीस उद्देशून ... ... १२५
परमेश्वरभेट ... ... ... १३०
शेवटीं जगत्कर्त्यालाच गुरु केला... ... १३१
ईश्वरास मनोवृत्ति अर्पिल्या ... ... १३२
ईश्वरास कविता अर्पिल्या ... ... १३२
ईशकृपा व समाधानप्राप्ति ... ... १३३
ईशकृपा व आनंदप्राप्ती ... ... १३४
अखंड आनंदस्थितीसाठीं प्रार्थना ... १३५
आशियाचे उन्नतीसाठीं झटण्याविषयीं दृष्टान्त १३५
मूढ आक्षेपकांस उद्देशून ... ... १३८
स्वदेशधोरण संभाळण्याविषयीं जनास बोध १४१
गैरसमजानें छळणाऱ्या दुर्जनास उद्देशून ... १४२
कर्तव्य चुकणाऱ्या पुढाऱ्यांस उद्देशून ... १४५

रत्नागिरीस लहानपणीं शिकण्यास होतों त्या काळासंबंधी ... १४६

श्रीमहाकाली जन्मग्रामदेवता हिला उद्देशून ... १५२

भवसमुद्र ... ... ... १५३

स्वतंत्रतेचा झरा ... ... ... १५४

हिरवा डोंगर ... ... ... १५५

वहाळ ... ... ... १५६

पिंपळ ... ... ... १५७

ओसाड देश ... ... ... १५८

एक पश्चात्तापी कवी ... ... ... १६१

कर्मफल ... ... ... १६२

जनस्थितिनिरूपण ... ... ... १६५

जलधारा ... ... ... १६७

सुखकारी वायु ... ... ... १७०

नभस्तुति ... ... ... १७२

कै. पुरुषोत्तम नारायण दाते ... ... १७३

| | |
|---|---|
| रा. रा. परशुराम दिनकर चित्रे... ... | १७५ |
| कै. तीर्थरूप रामचंद्र प्रभाकर जोशी<br>कै. तीर्थरूप गोविंद प्रभाकर जोशी | १७७ |
| स्वराष्ट्रीय जनांस उद्देशून ... ... | १८० |
| पोपट ... ... ... | १९४ |
| स्वतः ... ... ... ... | १९५ |
| जीव व ईशकृपा ... ... ... | १९७ |
| दुर्जन छलकांस उद्देशून ... ... | १९९ |
| स्वतःस उपदेश लीनतेबद्दल ... ... | २०० |
| जीव व कर्म ... ... ... | २०१ |
| दिव्यजनांस प्रार्थना ... ... ... | २०३ |
| मनाच्या शुद्धतेसंबंधानें ... ... | २०५ |
| कै. दत्तात्रय कोंडो घांटे ... ... | २०६ |
| राष्ट्रीय धोरणासंबंधानें ... ... | २०८ |
| प्रियपत्नीचें स्मारक ... ... ... | २१२ |
| स्वतःचे कुलासंबंधी वगैरे थोडी माहिती ... | २१२ |
| ईश्वराची प्रार्थना ... ... ... | २१७ |

मांसमद्याहारी जनांस बोध ... ... २२०
भाग्यदेवतांची प्रार्थना ... ... २२२
स्वराष्ट्र बांधवांस हितबोध ... ... २२८
स्वराष्ट्रास भावीस्थिति कशी असावी ... २३९
स्वराष्ट्रास आशीर्वाद ... ... ... २४०
स्वतःच्या पुढील जन्मासंबंधानें ... ... २४१
सत्य हेतूंचें सामर्थ्य ... ... ... २४३
मित्रांस उद्देशून ( स्वतःच्या संबंधानें ) ... २४४
,, ( स्वतःच्या राष्ट्रीय हेतुसंबंधानें) २४४
,, (माझीं स्मारकें मी करून ठेवलीं आहेत तींच चालवा. } २४७
दुर्जन छलकांस उद्देशून ... ... २४८
अविवेकी राष्ट्रबांधवांस उद्देशून ... ... २४९
स्वतःच्या दुःस्थितीसंबंधानें उद्गार ... २५०
स्वप्रास्थितींतही मनाची निर्मळता अखंड असावी यासाठीं ईश्वरप्रार्थना } २५३

स्वतःची दुःस्थिती कशी सुधारेल यासंबंधानें उद्गार ... २५४
जगद्धिताचे अथवा राष्ट्रीय हेतु न धरणारे व विदेहमोक्ष इच्छिणारे जे लोक त्यांस उद्देशून २५७
ईश्वरप्रार्थना स्वतःसाठीं व राष्ट्रासाठीं ... २६१
ईश्वरप्रार्थना ... ... ... २६३
जीवकर्मगति ... ... ... २६३
श्रीसर्वेश्वरस्तोत्र ... ... ... २६४
ईश्वरप्रार्थना ... ... ... २६७
शुद्धस्थलमाहात्म्य ... ... ... २६९
ईश्वरप्रार्थना ... ... ... २७१
स्वतःच्या स्थितिसंबंधानें उद्गार ... ... २७२
सुखकारी वायू ... ... ... २७३
मनोहर राई ... ... ... २७४
रम्यजलाशय ... ... ... २७५
जीवकर्मगति ... ... ... २७६
भाग्यवृद्धि केव्हां होते ... ... २७८

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ईश्वरप्रार्थना | ... | ... | ... | २७८ |
| दैन्यवाण्या जिण्याची निंदा | | ... | ... | २७९ |
| ईश्वरवंदन | ... | ... | ... | २८० |
| निरपराधी प्राण्यांचे छलकांस व त्यांचे हिंसकांस उद्देशून. | | | ... | २८१ |
| आत्मबुडव्यांस उद्देशून | | ... | ... | २८३ |
| स्वतःच्या स्थितिसंबंधानें उद्गार... | | | ... | २८४ |
| जगदीशस्तोत्र | ... | ... | ... | २८६ |
| परमेश्वरापाशीं शरणगतीनें संभाषण | | | ... | २९१ |
| राष्ट्रोन्नति कशी होईल | | ... | ... | २९४ |

ॐ

जगदीशायनमः

# स्फुट कविता भाग १ ला.

## राष्ट्रासाठीं ईशप्रार्थना.

### अभंग.

जगदीशा तुवां ॥ जग हें निर्मिलें
केधवां नकळे ॥ अज्ञ आह्मां ॥ १ ॥
प्रचंड चालना ॥ या जगाची कैशी
अव्यक्त तूं करिशी ॥ नकळे आह्मां ॥ २ ॥
आह्मां आत्मभाव ॥ तुवां दिला बापा
दयेनें संगोपा ॥ अमुचा करीं ॥ ३ ॥
करुनि घ्यावी भक्ति ॥ आपुली उत्तम
द्यावें आह्मां प्रेम ॥ कृपावंता ॥ ४ ॥

सकल संकटें ॥ भयें दूर करीं
सकल मोह वारीं ॥ जगन्नाथा ॥ ५ ॥
विचार निर्मळ ॥ शब्दहि विमळ
आचार सोज्वळ ॥ आमुचे ठेवीं ॥ ६ ॥
तुझि स्मृति आह्मां ॥ सदा चित्तीं घडो
सुख अमुचें वाढो ॥ अनुक्षण ॥ ७ ॥
सदा भाग्यवृद्धि ॥ सदा सुखशांति
द्यावी आह्मांप्रति ॥ विश्वनाथा ॥ ८ ॥
शुद्ध गृहसुखें ॥ शुद्ध राष्ट्रसुखें ॥
दिव्यमुक्तिसुखें ॥ आह्मां द्यावीं ॥ ९ ॥
तुजवीण आह्मीं ॥ कोणाकडे पाहूं
तव कृपा संभाळू ॥ आह्मां बाळां ॥ १० ॥
मराठी प्रार्थना ॥ राष्ट्रासाठीं केली
माला ही अर्पिली ॥ प्रेमें तूतें ॥ ११ ॥

## पद.

मराठी ॥ बांधव देवा हो ॥ मराठी ॥

अन्न नाहीं तडफड करिती
यांतें रक्षाहो ॥ १ ॥
इतुके ॥ विपन्न असतांहो ॥ इतुके ॥
मराठि बांधव माझे देवा
जाग न घेत अहो ॥ २ ॥
कलहां ॥ मध्यें रमती हो ॥ कलहा ॥
देशहिताच्या वृद्धीसाठीं
स्वार्थ न त्यजिति अहो ॥ ३ ॥
व्यभिचारासि न कमति अहो ॥ व्यभिचा ॥
वैभव जाउनि दास्य आलें
चैनिस खळति न हो ॥ ४ ॥
आळस ॥ अझुनी सोडि न हो ॥ आळस ॥
देशभक्तिची तोंडी वटवट
माजत चाललि हो ॥ ५ ॥
आतां ॥ काय करावें हो ॥ आतां
समजदार जे त्यांनीं देवा
तुजला ध्यावें हो ॥ ६ ॥

आपुलि ॥ एकि करावी हो ॥ अपुली ॥
देशहिताच्या वृद्धीसाठीं
तनु खपवावी हो ॥ ७ ॥
प्रार्थना ॥ देवा तुमची हो ॥ प्रार्थना ॥
उत्तम विश्रांती मानावी
अखंड यांनीं हो ॥ ८ ॥
प्रार्थी ॥ राष्ट्रासाठीं हो ॥ प्रार्थी ॥
जगदीशा नर नारी माझे
बांधव तारा हो ॥ ९ ॥
मराठी ॥ बांधव देवा हो मराठी ॥

**अभंग.**

पहा पहा कैसे ॥ हे मराठी जन
स्वराष्ट्र अभिमान॥ सांडितात ॥ १ ॥
भावी कालाचा हे ॥ न करिती विचार ॥
बनुनि पामर ॥ नेती दिन ॥ २ ॥
समान आकांक्षा ॥ आग्रहें न करिती
तेणें अधोगति ॥ राष्ट्रा होते ॥ ३ ॥

धर्मशाळेंतले ॥ वाटसरू जैसे
परके हे तैसे ॥ हेतूंमध्यें ॥ ४ ॥
जाति जाति तशा ॥ व्यक्ति आणि व्यक्ति
भांडत बैसती ॥ भिन्न हेतू ॥ ५ ॥
मराठ्यांच्या राष्ट्रासाठीं करुणा भाकीं
संरक्षीं संरक्षीं ॥ जगन्नाथा ॥ ६ ॥

## अभंग.

१

सर्व दिशां अंत ॥ तुझ्या रूपा नाहीं
ध्यानीं चित्त जाई ॥ गुंगोनियां ॥ १ ॥
निर्मळ पांडुर ॥ सांवळें मधुर
सुखद सुंदर ॥ रूप तुझें ॥ २ ॥
सर्वांतरीं सूक्ष्म ॥ राहसी व्यापून
नाहीं तुजवीण ॥ कांहींएक ॥ ३ ॥
गगन अंतराळीं ॥ प्रचंड ग्रहमाळा
चालविशी लीला ॥ थोर तूझी ॥ ४ ॥

सर्वेश्वरा तुज ॥ प्रार्थू नम्रभावें
सदा भाग्य द्यावें ॥ महाराष्ट्रा ॥ ५ ॥

( २ )

शुद्ध बुद्धी देई ॥ मोहां दूर धरी
श्रमातें निवारी ॥ ध्यान तूझें ॥ १ ॥
धरुनि तूझें ध्यान ॥ न्यायानें कष्टती
कृतार्थ ते होती ॥ जगामध्यें ॥ २ ॥
संकटें आपत्ती ॥ भयें पळवीशी
भक्तांसि रक्षिशी ॥ नानापरि ॥ ३ ॥
महाराष्ट्रा तुझी ॥ सत्यभक्ती द्यावी
खोटीभक्ति जावी ॥ नाशपथा ॥ ४ ॥

( ३ )

जीं जीं अमंगळें ॥ जीवां दुःख देत
कधीं न शिवोत ॥ महाराष्ट्रा ॥ १ ॥
अंतर्भयें जीं जीं ॥ सुखनाशकारी
त्यांचें बीज हरीं ॥ येथूनीयां ॥ २ ॥

बाह्यसंकटें जीं ॥ राष्ट्रां दुःखदायी
त्यांसि नाशा नेईं ॥ परभारें ॥ ३ ॥
अंतर्बाह्य विघ्नें ॥ दुष्टराष्ट्रांवरी
पाठवूनि तारीं ॥ महाराष्ट्रा ॥ ३ ॥

( ४ )

विश्वपोषक तूं ॥ तुजवीण कोण
मम राष्ट्रा अन्न ॥ पुरवील ॥ १ ॥
माझे राष्ट्रजन ॥ उपाशीं मरती
नांव तुझें घेती ॥ क्षुधाकुळ ॥ २ ॥
जगाच्या जीवना ॥ नको अंत पाहूं
त्वरित दया येऊ ॥ तूझ्या चित्तीं ॥ ३ ॥
मानवी प्रयत्न ॥ जेथ पंगू झाले
तेथें बळ चाले ॥ तुझें एक ॥ ४ ॥

( ५ )

सृष्टिकर्त्या तुवां ॥ देहशक्ति दिधल्या
माझ्या राष्ट्रीं गेल्या ॥ वायां पाहीं ॥ १ ॥

जिवंत हीं मढीं ॥ डोळां देखोनीयां
दुःखाग्नीनें काया ॥ पोळे माझी ॥ २ ॥
आशाभग्नजन ॥ सर्वत्र हा दिसे
दु:खाचे उसासे ॥ टाकी सदा ॥ ३ ॥
विचार करीतां ॥ जो तो मूढ होई
परिस्थिति पाही ॥ निराशेची ॥ ४ ॥
जगन्नाथा तारीं ॥ तारीं ममराष्ट्रा
आशा महाराष्ट्रा ॥ कृपा तुझी ॥ ५ ॥

( ६ )

पार नाहीं तूझ्या ॥ दिव्य सामर्थ्यासि
करीं बा आह्मांसि ॥ शक्तिमंत ॥ १ ॥
पार नाहीं तूझ्या ॥ ज्ञानमहिम्यासि
करीं बा आह्मांसि ॥ ज्ञानवंत ॥ २ ॥
पार नाहीं तूझ्या ॥ ऐश्वर्य गुणासि
ऐश्वर्य आह्मांसि ॥ द्यावें नाथा ॥ ६ ॥
पार नाहीं तुझ्या ॥ नित्य आनंदासि
आनंद आह्मांसि ॥ द्यावा सदा ॥ ४ ॥

तूंचि एक सर्व- ॥ आशा पुरविता।
कृपाळू तूं होतां ॥ मिळे सर्व ॥ ५ ॥

( ७ )

पुरें गांवें शेतें ॥ बागा तळीं नद्या
पर्वत टेंकड्या ॥ रानें वनें ॥ १ ॥
खाड्या उपसागर ॥ समुद्र महाब्धि
देउत समृद्धि ॥ महाराष्ट्रा ॥ २ ॥
पृथ्वी जल बाष्प ॥ वायु वीज वन्ही
रवि शशि आणि ॥ इतर ग्रह ॥ ३ ॥
असोत सुखदायी ॥ सदा महाराष्ट्रासी
आज्ञा द्यावी त्यांसि ॥ विश्वनाथा ॥ ४ ॥

( ८ )

दुःखांचा उद्वेग ॥ साहण्या कठीण ॥
ऐसें माझें मन ॥ आक्रंदतें ॥ १ ॥
माझी स्थिति असे ॥ तीच महाराष्ट्राची
थेंबानें पाण्याची ॥ स्थिति कळे ॥ २ ॥

स्वस्थ राहावें तरि ॥ आशीति विपत्ती
दावीं जगत्पति ॥ वाट आह्मां ॥ ३ ॥
दुःखांनीं गांजलों ॥ मोहांनीं घेरलों
दोषांनीं जाहलों ॥ आत्मघाती ॥ ४ ॥
भयें देहामध्यें ॥ भयें घरामध्यें
भयें देशामध्यें ॥ भ्याडवीती ॥ ५ ॥
देशाबाह्य जातां ॥ भयें तेथें येती
आमची सांगाती ॥ भयें झालीं ॥ ६ ॥
भयहर्ता तूंची ॥ एक सृष्टीकर्ता
महाराष्ट्रा त्राता ॥ तूंची एक ॥ ७ ॥

( ९ )

निराशेचें जिणें ॥ मरणाहूनि खोटें
ऐसें मज वाटे ॥ पुनः पुनः ॥ १ ॥
नाश विस्मरण ॥ करिति दुःखां अंत
निराशा टोंचीत ॥ जीवमर्म ॥ २ ॥
लक्ष्मी अंतर्धान ॥ ज्यांची ज्यांची पावे
कैसें त्यांनीं राहावें ॥ जगामध्यें ॥ ३ ॥

इतरांचीं सुखें ॥ यांणीं तीं पहावीं
स्वतः भोगावीं ॥ घोर दुःखें ॥ ४ ॥
निष्ठुर सकल ॥ होतांहि इतर
तूं एक आगर ॥ करुणेचें ॥ ५ ॥
शरणागत आलों ॥ तुज जगन्नाथा
तुजला समर्था ॥ शक्य सर्व ॥ ६ ॥
महाराष्ट्रासहित ॥ मज सुखी करा
दुःखअंत करा ॥ कृपासिंधो ॥ ७ ॥

( १० )

पुनः पुनः काय ॥ विनवावें तुला
जाणसि कृपाळा ॥ सर्व कांहीं ॥ १ ॥
पात्र नाहीं आह्मीं ॥ तुझिया कृपेसि
मान्य हें आह्मासि ॥ आह्मी दोषी ॥ २ ॥
दोषी आह्मी सत्य ॥ परि तव बाळें
सांभाळीं कृपाळे ॥ विश्वजननी ॥ ३ ॥
विहित मार्गांनीं ॥ वागण्यास आह्मीं
कुमति ह्मणूनि ॥ पात्र नसों ॥ ४ ॥

कृपाहस्तीं आह्मां ॥ धरीं जगदंबे
सदा आह्मां द्यावें ॥ सुमतीतें ॥ ५ ॥
देउनि सुमति ॥ वागवूनि नीट
सुखभाग्यवाट ॥ दाखवावी ॥ ६ ॥

( ११ )

दुःखव्याप्त आह्मी ॥ अनुतप्त होऊं
पश्चात्ताप पावूं ॥ खरोखरी ॥ १ ॥
खरोखरी झाला ॥ पश्चात्ताप चित्तीं
परि दुर्बळशक्ति ॥ विवेकाची ॥ २ ॥
विवेकाची शक्ति ॥ दुर्बळ ह्मणूनि
अवचित येऊनि ॥ पडे घाला ॥ ३ ॥
पडे घाला नाना- ॥ प्रमाद दैत्यांचा
चुराडा जिवाचा ॥ होई मग ॥ ४ ॥
जिवाचा चुराडा ॥ पुनरपि होतां
पश्चात्ताप चित्ता ॥ पुन्हा होतो ॥ ५ ॥
जैसी ही व्यक्तीची ॥ माझ्या सारिख्यांची
तैशीच राष्ट्राची ॥ स्थिति असे ॥ ६ ॥

जगन्नाथा राष्ट्रा- ॥ सहित मज रक्षीं
स्थिरसत्यमति ॥ द्यावी आह्मां ॥ ७ ॥

( १२ )

अभाग्य येईल ॥ ऐसी दोषकरणी
विवेक धरोनी ॥ करूं नये ॥ १ ॥
करूं नये ऐसी ॥ करणी करितां
क्षणसुख चित्ता ॥ वाटतसे ॥ २ ॥
ईश्वरी न्यायानें ॥ पुढें दुःखें येती
होतां त्यांची प्राप्ती ॥ जीव रडे ॥ ३ ॥
जीव रडे घोर ॥ यातना भोगीतो
देवासि ह्मणतो ॥ धांवें आतां ॥ ४ ॥
देव काय करील ॥ कैसें पाप हरिल
नियम कैसे मोडिल ॥ स्वतः केले ॥ ५ ॥
स्वतःचे नियम ॥ तो मोडूं शकेना
अपराध्या सोडीना ॥ शिक्षेवीण ॥ ६ ॥
पश्चात्तापी त्यासि ॥ करी सौम्य दंड
उद्धटा उदंड ॥ शिक्षा करी ॥ ७ ॥

आह्मी व्यक्ती ईश- ॥ शिक्षा भोगितांही
राष्ट्र हा समूहो ॥ आमुचाचि ॥ ८ ॥
आतां विश्वनाथा ॥ दृढ हातीं धरूं
त्यासि न सोडूं ॥ कधीं कोठें ॥ ९ ॥
कधीं कोठें जरि ॥ विसंबूंना त्यासि
तरी प्रमादांसि ॥ थारा नाहीं ॥ १० ॥
प्रमादांसि थारा ॥ मुळीं न मिळतां
येइल भाग्य हाता ॥ उचित वेळे ॥ ११ ॥
भाग्य चालोनीयां आपाप येईल
त्यासि आकर्षील ॥ पुण्यबळ ॥ १२ ॥

( १३ )

भाग्यमार्ग जरी ॥ निश्चयें धरणें
तरि चंचल होणें ॥ उचित नाहीं ॥ १ ॥
उचित नाहीं मोहां ॥ हार जाणें कधीं
निजव्रतीं ढळणें ॥ उचित नाहीं ॥ २ ॥
ढळे व्रतीं तया ॥ अत्र ना परत्र
आतां नाहीं सुख ॥ नाहीं पुढें ॥ ३ ॥

जिवाचा करुनि ॥ धडा एकदाचा
धरावा भाग्याचा ॥ मार्ग मग ॥ ४ ॥
कळे शब्दज्ञानें ॥ मज तसें देशा
आमुतें विश्वेशा ॥ धैर्य देईं ॥ ५ ॥
धैर्य देईं आह्मां ॥ यशः सिद्धीकारी
दयेनें निवारीं ॥ सर्व विघ्नें ॥ ६ ॥

( १४ )

मनाचा निर्धार ॥ जयांच्या जाहला
त्यांसि निरोप झाला ॥ त्याचवेळे ॥ १ ॥
त्याचवेळे त्यांचे ॥ बंध तुटुनि गेले
मुक्त ते जाहाले ॥ चिंतांतूनी ॥ २ ॥
अंगीकृत कार्य ॥ ध्यास त्यांस चित्तीं
त्यासंबंधी कृति ॥ तयां सौख्य ॥ ३ ॥
जिवंत असूनी ॥ मृत्युसम शांत
कार्यावरि नीट ॥ लक्ष्य असे ॥ ४ ॥
स्वतःच्या सर्वस्वा ॥ उदार जे झाले
त्यांवरि कैशी चाले ॥ दैन्यसत्ता ॥ ५ ॥

हें तों आह्मां शब्दज्ञानें कळों आलें
परी न वठलें ॥ कृतीमध्यें ॥ ६ ॥
जगजेठी आह्मां ॥ धैर्यबळ देईं
संरक्षूनि नेईं ॥ भाग्यमार्गें ॥ ७ ॥

( १५ )

चला बंधू ॥ जाऊं कार्या
देशभाग्या ॥ शोधूं याहो ॥ १ ॥
श्रम शीण ॥ मित्र करूं
आशादेवी ॥ प्रेमें पूजूं ॥ २ ॥
सत्य घेऊं ॥ शिधेरीसीं
यान करूं ॥ सुन्यायासि ॥ ३ ॥
ईशभक्ती ॥ छत्र घेऊं
देहान्ताचें ॥ पेणें करूं ॥ ४ ॥
दुजाजन्म ॥ दुसरें पेणें
इष्ट कार्य ॥ न सोडणें ॥ ५ ॥
मार्गदर्शी तो ॥ अंतरीं
परमात्मा ॥ साह्यकारी ॥ ६ ॥

( १६ )

कांरे आपुला टाळा ॥ व्यर्थ शिणवितां
जिव्हेचा करीतां ॥ दुरुपयोग ॥ १ ॥
काय विरक्तता ॥ अंतरीं ठसली
उगाच घेतली ॥ हातीं गाथा ॥ २ ॥
हातीं गाथा घेती ॥ टाळा शिणवीती ॥
विटंबना करिती ॥ संतशब्दां ॥ ३ ॥
कोठें तुकाराम ॥ वैराग्यविश्राम
कोठें विषयाराम ॥ जन तुह्मां ॥ ४ ॥
खरें बोला तुह्मीं ॥ खोटें नका बोलूं
तुमचा आनंदू ॥ भवसुखीं ॥ ५ ॥
भवसुखें घेणें ॥ दोष मुळिंच नाहीं
जरी न्याय पाहीं ॥ धरीयेला ॥ ६ ॥
न्यायमार्गें जावें ॥ जगीं सुखी व्हावें
व्यर्थ न पसरावें ॥ दंभबंड ॥ ७ ॥
वैराग्याचें बंड ॥ कांरे पसरीतां
नसुनि योग्यता ॥ तुमचे अंगीं ॥ ८ ॥

( १७ )

ज्ञानोबा तुकोबा ॥ आह्मां पूर्ण वंद्य
त्यांचे चेले योग्य ॥ आह्मीं नाहीं ॥ १ ॥

ऐहिकाचा त्याग ॥ त्यांचा उपदेश
त्यासि पात्र खचित ॥ आह्मीं नाहीं ॥ २ ॥

त्यास खरोखरी ॥ असो पात्र कुणी
तो बोध आह्मांसि ॥ उचित नाहीं ॥ ३ ॥

आह्मीं स्पष्ट बोलों ॥ सद्गुरु विश्वेशा
आमुच्या तरि आशा ॥ राष्ट्रभाग्यीं ॥ ४ ॥

राष्ट्रभाग्यासह ॥ वाढावें स्वभाग्य
ध्यास चित्तीं नित्य ॥ असुच्या असे ॥ ५ ॥

तुज आह्मी केला ॥ योग्य परमगुरु
तूं आह्मां आधारु ॥ सर्वपरि ॥ ६ ॥

निंदक अज्ञानें ॥ ह्मणोत कांहींहि
स्वदेशासि आह्मी ॥ एक झालों ॥ ७ ॥

( १८ )

सदा सर्व- ॥ भावी काळीं
महाराष्ट्रा ॥ सुखी ठेवीं ॥ १ ॥

वर्षं शतें ॥ आणि युगें
नित्य व्हावीं ॥ नवीं शुभें ॥ २ ॥
राष्ट्रभाग्य ॥ सदा वाढो
दाही दिशां कीर्ती भरो ॥ ३ ॥
हीच प्रार्थना ॥ पुनः पुनः
तुजपाशीं ॥ जगजीवना ॥ ४ ॥
चंद्र सूर्य ॥ जोंवरी असती
भाषा वाढो ॥ ही मऱ्हाटी ॥ ५ ॥
जे जे मऱ्हाटी ॥ बोलती
ऐक्य वसो ॥ त्याचे चित्तीं ॥ ६ ॥
एकजीव ॥ त्यांचा असो
राष्ट्रभक्ति ॥ अंतरिं वसो ॥ ७ ॥

( १९ )

राष्ट्र व्यापुनि ॥ जीव माझा
सदा असो ॥ विश्वराजा ॥ १ ॥
देह माझा ॥ पडुनि जावो
महाराष्ट्रीं ॥ जीव राहो ॥ २ ॥

नित्य राष्ट्र-भाग्यासाठीं ॥
भजो तुज ॥ जगजेठी ॥ ३ ॥
जनासहित ॥ कष्ट घेवो
जनासह ॥ सुखी होवो ॥ ४ ॥

( २० )

देशभक्त ॥ जे जे असती
त्यांची द्यावी ॥ मज संगती ॥ १ ॥
एकजीव ॥ अमुचा होवो
तुझी कृपा ॥ यश देवो ॥ २ ॥
देशभक्त ॥ नसती त्यांतें
मार्गी अमुच्या ॥ आणण्यातें ॥ ३ ॥
जगदीशा ॥ साह्य द्यावें
सिद्धीप्रति ॥ यत्न न्यावे ॥ ४ ॥
जो जो मराठा ॥ जन्मला
होवो देश- ॥ भक्ति किल्ला ॥ ५
हीच प्रार्थना ॥ जगदीशा
पुरवीं माझी ॥ शुद्ध आशा ॥ ६ ।

## जनबोध.

### पद.

जन हो ॥ सावध तुह्मी व्हाहो ॥ पुढचा विचार करा ॥
आर्य हो ॥ देशभक्ति धराहो ॥ पुढचा विचार करा ॥
बंधु हो ॥ ज्ञान उपयोग कराहो । पुढचा विचार करा॥
सुजन हो॥आळस टाकुनि द्याहो ॥ पुढचा विचार करा ॥
प्रियकर हो॥कलहा टाकुनि द्याहो ॥ पुढचा विचार करा ॥
सुधर्मि हो ॥ धर्मस्थिति जाणाहो ॥ पुढचा विचार करा॥
मित्र हो॥निज चैनिस अवराहो ॥ पुढचा विचार करा॥
कुलीन हो ॥ हीनदास्य न कराहो॥पुढचा विचार करा॥
विवेकि हो ॥ पापें तुह्मि न कराहो॥ पुढचा विचार करा॥
मर्द हो ॥ मेषवृत्ति न धराहो ॥ पुढचा विचार करा ॥

---

## देशभक्तमहिमा.

निर्मल श्याम अनंत सुंदर
ईशरूप हें अहा ॥
हें पद देशभक्तां पहा ॥ १ ॥

निर्मल अंबर विस्तृत पाहुनि
मन हर्षे अहा ॥
जसें देशभक्तयश देखतां पहा ॥ २ ॥
निर्मल मंजुल वायु भेटतां
प्राण सुखावे अहा ॥
जसा देशभक्त भेटतां पहा ॥ ३ ॥
निर्मल तेज रवीचें चित्तीं
मोद देत अहा ॥
जसा देशभक्तउत्कर्ष पहा ॥ ४ ॥
निर्मल पाणी वाहातें पिऊनी
जीव सुखावे अहा ॥
जसा देशभक्त गुणगानें पहा ॥ ५ ॥
निर्मळ शीतळ सुगंधि स्थळ हें
कितितरि सुखवी अहा ॥
जसें देशभक्तशील पहा ॥ ६ ॥

## देशभक्तमहिमा.

### अंजनीगीत.

अशोक पल्लव दाटि मनोहर
सर्व ऋतूंमधिं हिरवीगार
पाहुनि यातें दुःखित अंतर
शोकरहित होई ॥ १ ॥
अशोक नरोत्तम शीलमनोहर
निरपराधि आणि लोकहितकर
पाहुनि यातें दुःखित अंतर
शोकरहित होई ॥ २ ॥

---

## देशभक्तमहिमा.

### साकी.

पूगतरूचा तुरा मनोहर
रम्य सुगंधा देतो

उदास चित्तांतेंहि सुखवुनि
बहु उपकारी होतो ॥ १ ॥
देशभक्त नर निजगुण गंधें
प्रिय बहु लोकां होतो
निराश होती त्यांतें रिझवुनि
देशकार्यिं योजितो ॥ २ ॥

---

## सहज धुरीण कोण होतो ?

### अंजनीगीत.

देशपदीं निज स्वार्थ अर्पितो
प्राणप्रिय तो देशा होतो
जीव त्याचा एक होतो
देशजीवाशीं ॥ १ ॥
ऐसा जीव पुन्हा जन्मतो
सहज जनाला आकर्षितो
सहज जनाचा धुरीण होतो

सहज भाग्यवंत ॥ २ ॥
करणीविण जगिं कांहीं नाहीं
दिल्यावांचुनी मिळत नाहीं
हिशेब चोख जगाचा पाहीं
ठेवी जगदीश ॥ ३ ॥
स्वतः कुलक्षणि ह्मणुनि अभागी
पुण्यें होती महाभागी
जाणुनि जीव स्वार्थत्यागी
होती अनुतापें ॥ ४ ॥

---

## ( ज्याला उत्तम गृहसुख आहे असा देशभक्त. )

### साकी.

देशकार्यी द्रव्य वेंचुनि
द्रव्यरहित नर झाला
आप्त तयाचे मूढ तयातें
ह्मणुनी टोंचित त्याला ॥ १ ॥

दीनवदन तो गृहासि येई
कारण कांता जाणी
नित्यापेक्षां अधिक तियेची
प्रसन्न मुद्रा झाली ॥ २ ॥

कांत पुसे तिस प्राणवल्लभे
हर्षा कारण सांगें
वधूत्तमा ती सलज्ज बोले
आजि सुदैव उदेलें ॥ ३ ॥

नारी आह्मी शीलवती ज्या
द्रव्या मान न देऊं
सुयश पतीचें जीविताहुनि
प्रियकर चित्तीं मानूं ॥ ४ ॥

ऐकुनि ऐसे अमृत गोड
बोल प्रियकांतेचे
धन्य जाहला तो नर त्याचें
सुख वदवेना वाचे ॥ ५ ॥

## ( उत्तम गृहसुख ज्याला आहे असा देशभक्त )

### साकी.

फिरण्या गेला असतां देखे
देशभक्त जनदुःखें
कोमल हृदय त्याचें करपे
बांधवदुःखस्पर्शें ॥ १ ॥
गृहासि येतां पुसते कांता
कारण खिन्नतेचें
साश्रु नयन तो तिजला सांगे
वृत्त जें झालें तें ॥ २ ॥
सहचरि मग ती त्या धन्याची
प्रेमें सांत्वन करिते
निजदेहाचे अलंकार जे
काढुनि त्यातें देते ॥ ३ ॥
बोले नाथा द्रव्य पुरे कीं
अपुल्या कार्या जावें

वाटे कीं हीं मनुष्य नसुनी
देवी दास करीते ॥ २ ॥
प्रथम भेटिरूप सरस ज्रियेचें
प्रेम नित्य पति पाहे ॥
पतिपुण्याची जिवंत मूर्ती
जणुं गृहिं त्याच्या राहे ॥ ३ ॥
चित्तिं सर्वदा माता गणिती
परदारां जे कोणी
त्यातें जन्मांतरिं विधि देतो
पत्नि अशी सुखखाणी ॥ ४ ॥

---

## स्वदेशाभिमानी सती.

एक होती सुशील आर्या
परंतु कुवृत्ताची भार्या
विवेक धरुनी जीवितकार्या
करित सदा राही ॥ १ ॥

एके दिवशीं तिस पति सांगे
आज आपलें भाग्य उदेलें
संधि मिळाली स्वल्पकालें
श्रीमंत अह्मी होऊं ॥ २ ॥

पत्नी बोले ती विनयानें
भाग्य उदेलें शुभ जाहालें
काय गोष्ट घडली सांगावें
जरि वाटे उचित ॥ ३ ॥

पती बोले ऐक दयिते
आजि म्यां कारस्थान केलें
देश बुडविला परंतु आलें
भाग्य गृहीं अपुल्या ॥ ४ ॥

पत्नी बोले व्याकुलतेनें
चित्त तियेचें दुःखें भरलें
ह्मणतें नाथा पापें आलें
तें कधिं भाग्य नव्हे ॥ ५॥

भाग्य असलें घरीं घेतां

पुढति कुळक्षय होईल कांता
देउनियां बहु दृष्टांन्तां
पतितें समजावी ॥ ६ ॥
दुर्लक्षणि तो चित्तीं नुमजे
ह्मणे पुरे गे ज्ञान तूझें
चूल फुकावी काम स्त्रियांचें
तें तूं बघ आतां ॥ ७ ॥
पत्नी बोले प्राणनाथा
दुष्कर्में आणिती अनर्थां
कुळक्षय कां घरीं ओढितां
द्रव्यलोभानें ॥ ८ ॥
कुळक्षय तो अपुला होईल
स्वदेशाचें भाग्य जाईल
नांव अपुलें देशीं राहील
अधमाधम ह्मणुनी ॥ ९ ॥
पति आग्रह अपुला न सोडी
मग ती आर्या शांती टाकी

मंगलसूत्र धरुनी हातीं
बोलतसे पतिला ॥ १० ॥

मंगलसूत्र हें तोडीतें
विरक्त बनुनी रानीं रहातें
दुष्ट नराचे संगतीतें
छेदुनियां जातें ॥ ११ ॥

दुष्ट नर तो तेज तियेचें
पाहुनीयां धरितो लज्जे
चरणीं ठेउनि मस्तक बोले
मी पापी नीच ॥ १२ ॥

शरम वाटते मजला चित्तीं
पापी मी तुज शोभेना पति
वचन दीधलें आतां पुढती
सोडियलें पापा ॥ १३ ॥

तारक तूं मज आहलीस
धर्मदीप मज दाखविलास

उभयतांही निजदेहांस
देशकार्यि झिजवूं ॥ १४ ॥

---

## देशभक्त स्त्री.

### अंजनीगीत.

एक होता देशभक्त
सुगुणी आणि सुशिक्षित
विद्या अपुली पत्निस देत
तो नर बहुप्रेमें ॥ १ ॥

एक दीप दुसरा उजळी
तैसी ती वधू शिक्षित झाली
सर्व कार्यी चिंतूं लागली
देशहित आधीं ॥ २ ॥

प्रत्यहिं तीनें अन्य स्त्रियांतें
भेटावें धरुनी प्रेमातें

देवी ऐसें मना वाटतें
उपकृतनारिजनां ॥ ३ ॥

पतिपत्नी तीं प्रत्यहिं रात्रीं
मुलां घेउनी बोध शिकविती
अनुभव त्यांतें अपुला देती
देशकार्यिं आला ॥ ४ ॥

ऐशीं जोडपिं सर्वहि व्हावीं
ऐशी परिस्थिति राष्ट्रा यावी
जगच्चालका कृपा करावी
महाराष्ट्रावरती ॥ ५ ॥

---

# कोणी दुर्दैवी देशभक्त.

## अंजनीगीत.

भाषा माझी तीच बोलती
पोषाखाची तीच पद्धति

हवापाणी अन्न सेविती
जीं मी सेवितसें ॥ १ ॥

ऐसे जन जे त्यांच्या चित्तीं
माझे हेतु करोत वसती
एकाविचारें राष्ट्रप्रगति
आह्मां करिं होवो ॥ २ ॥

समान मजशीं बाह्याचारीं
परि आकांक्षा विरुद्ध अंतरिं
मनुष्य ऐसे माझ्या राष्ट्रीं
न कधीं जन्मोत ॥ ३ ॥

हेतुविषमता जनअंतरिंची
घातक झाली मम राष्ट्राची
लाही होउनि गेलि जिवाची
जगजीवन राया ॥ ४ ॥

नम्र विनंती देवराया
करिं माझ्यावरि कृपाछाया

संगति मजला सर्वकालिं द्या
चित्तोत्सवकारी ॥ ५ ॥

---

# कोणा दुर्दैवी देशभक्ताचे उद्गार.

## अभंग.

१,२,३ चें वारें ॥ देशीं बोकळलें
ह्मणुनि कळवळलें ॥ ममांतर ॥ १ ॥

२,३ × × × ज्यांत ॥ ऐसी × × × संस्था
चित्ती आलें नाथा ॥ स्थापावी कीं ॥२॥

कृपेच्या प्रसादें ॥ तुझ्या जगन्नाथा
"× × × × × संस्था" ॥ स्थापीयेली ॥३॥

आले येऊं दिले ॥ केले सहकारी
मत्सर अंतरीं ॥ न धरितां ॥ ४ ॥

यशः सिद्धीसाठीं ॥ केले फार कष्ट
स्थापनेचा हक्क ॥ धरिला नाहीं ॥ ५ ॥

पूर्वदोष फळें ॥ परि आड आलीं
कैकां बुद्धी झाली ॥ मज पीडावें ॥ ६ ॥
पीडा सोशीयेली ॥ सोशीतही आहें
सत्येश्वरा पाहें ॥ वाट तुझी ॥ ७ ॥
तुझिया कृपेची ॥ आशा मज आहे
ह्मणुनी सोशीताहें ॥ ऐशीं दुःखें ॥ ८ ॥
क्षमा करीं माझ्या ॥ व्यर्थ पीडकांसि
परि न अन्यांसि ॥ स्थिति हो ऐशी ॥ ९ ॥

---

## कोणा दुर्दैवी देशभक्ताचे उद्गार.

### अभंग.

काय दुःखें सोशीं ॥ देशकार्यासाठीं
नवल शत्रु होती ॥ देशबंधू ॥ १ ॥
मत्सरें हाणूनि ॥ पाडण्या पाहाती
छद्में करूं पहाति ॥ कमी कीर्ती ॥ २ ॥

दुष्टांच्या या द्वेषा ॥ पात्र नसें पाहीं
ऐसें असुनीही ॥ छळिती मज ॥ ३ ॥
राष्ट्रकार्यासाठीं ॥ १, २, ३, हें स्थान
नेमिलें मनन ॥ करुनीयां ॥ ४ ॥
ज्यांनीं माझे व्हावें ॥ मित्र साह्यकारी
तेच होती अरि ॥ सत्येश्वरा ॥ ५ ॥
सत्येश्वरा तूतें ॥ हाक मारीताहें
माझिया उपायें ॥ कांहीं नोहे ॥ ६ ॥
×, ×, ×, × आदि ॥ माझे शत्रु झाले
कारण नसतां ॥ वैर केलें ॥ ७ ॥
सत्येश्वरा तूज ॥ गुज निवेदिलें
पाहिजे पाहिलें ॥ पुढिल तुवां ॥ ८ ॥
तुजवरी पुढिल ॥ भार संपवूनि
तुझा भक्त ह्मणुनि ॥ स्वस्थ राहें ॥ ९ ॥
क्षमा करीं माझ्या ॥ व्यर्थ छलकांसि
पारि न अन्यासि ॥ छलुत ऐसे ॥ १० ॥

---

# कोणा दुर्दैवी देशभक्ताची १, २ चे + + + च्या × × × चे बातमीदाराविषयीं तक्रार.

## अभंग.

नृपांगणीं खळ ॥ तैसा वार्ताहर
झाला × × × कर ॥ + + + चा ॥ १ ॥
+ + + प्रसार ॥ सर्व राष्ट्रामध्यें
वार्ताहर जाणे ॥ हे तों नीट ॥ २ ॥
निष्कारण मज ॥ त्रास देऊनियां
मज छळुनीयां ॥ सुखी होई ॥ ३ ॥
कमी योग्यतेचे ॥ व्याख्यानें तयांचीं
लिही सविस्तरें ॥ + + + ला ॥ ४ ॥
मज छळण्यासाठीं ॥ माझीं जीं व्याख्यानें
देई नाममात्रें ॥ अथवा गाळी ॥ ५ ॥
सभे गेलों असतां ॥ नांवचि गाळावें
तेणें दुखवावें ॥ ममांतर ॥ ६ ॥

१, २ चा + + + ॥ त्यासि प्रिय संस्था
तोचि जगन्नाथा ॥ प्रिय मज ॥ ७ ॥

त्या प्रिय ह्मणुनि ॥ येथे कष्टताहे
मज छळिताहे ॥ वार्ताहर ॥ ८ ॥

किती केलीं येथ ॥ वर्णनीय कार्यें
बहुतेक यानें ॥ न कळविलीं ॥ ९ ॥

माझें भावी कार्य ॥ असे याच स्थळीं
ह्मणुनीयां होई ॥ घात माझा ॥ १० ॥

आणिकां पुढती ॥ आणितो वर्णूनी
मज गुंडाळूनी ॥ ठेवूं पाहे ॥ ११ ॥

सर्वस्व माझें मी ॥ देशकार्यासाठीं
अर्पिलें हें चित्तीं ॥ जाणतसे ॥ १२ ॥

पाहात हा कष्ट ॥ माझ्या आयुष्याचे
ऐसें असतां याचें ॥ कर्म ऐसें ॥ १३ ॥

सत्येश्वरा तुज ॥ दुःख कथियेलें
पाहिजे पाहिलें ॥ पुढिल तुवां ॥ १४ ॥

स्थळ प्रत

क्षमा करिं माझ्या ॥ व्यर्थ छलकासि
परि हा अन्यासि ॥ न छळु ऐसा ॥ १५ ॥

---

## कोणी दुर्दैवी राजा.

### अंजनीगीत.

पूर्वी पापें फार केलीं
तीं संप्रति हीं फळासि आलीं
जरी न धैर्यें अतां सोशिलीं
तरि पुढतीही दुःख ॥ १ ॥

शैलशिलांची कठिणशीलता
मम धैर्या दे देवा आतां
उत्तम धैर्य मज दुःखार्ता
मंदिर सौख्याचें ॥ २ ॥

स्वराज्य नाहीं कीर्ति नाहीं
बुद्धी नाहीं शक्ति नाहीं

स्वर्गीं गेली पत्नी तीहि
सुख आतां कैचें ॥ ३ ॥

मान नाहीं द्रव्य नाहीं
पुण्यसंग्रहीं विशेष नाहीं
पाप शोधूं जातां पाहीं
अजुनि चित्तीं फार ॥ ४ ॥

विश्वनाथा पावें पावें
मज पतितातें उद्धरावें
धैर्य उत्तम सदा द्यावें
श्रेष्ठपुण्यकारी ॥ ५ ॥

भक्ती तूझी अखंड व्हावी
शुद्धचित्तता सदा राहावी
देहकरणी सदा घडावी
सज्जन संमत ॥ ६ ॥

विश्वनाथा अपुल्या हातीं
घ्यावें मजला द्यावी शांति

विश्वासूनि तुजला चित्तीं
स्वस्थ राहातों ॥ ७ ॥

---

## पाप ही सुखवृक्षाला कीड आहे.

### अंजनीगीत.

वृक्षा अंतरीं कीड होई
वाढ त्याची खुटुनि जाई
संनिध संनिध वेळा येई
प्राणघातक ॥ १ ॥

पापकामना ज्यांतें होई
जाणा हतदैवी ते प्राणी
भाग्य त्यांचें सरुनी जाई
घोर दशा मग त्यां ॥ २ ॥

वृक्षा अंतरीं कीड लागली
परि कौशल्यें दूर केली

त्याचि संकटवेळा टळली
अकालघातक ॥ ३ ॥

पापकामना अंतरिं आली
मोह न पडतां झिडकारीली
त्यानें जाणावी मिळवीली
पुण्यें ईशकृपा ॥ ४ ॥

---

## सुखनाशाचीं कारणें.

### अभंग.

प्राणकोशीं वृक्षा ॥ कुरतुडी कीड ॥
त्याची रम्य वाढ ॥ होणें नाहीं ॥ १ ॥

व्यभिचारइच्छा ॥ अंतरीं जोंवरि ॥
सुखाची तोंवरी ॥ होळी पाहें ॥ २ ॥

परस्वापहार ॥ दुष्टेच्छा जोंवरी ॥
सुखाचि तोंवरि ॥ होळी पाहें ॥ ३ ॥

विश्वंभरभक्ति ॥ घडेना जोंवरी ॥
सुखाचि तोंवरि ॥ होळी पाहें ॥ ४ ॥
दुष्ट संगतींत ॥ जीवित जोंवरि
सुखाचि तोंवरि ॥ होळी पाहें ॥ ५ ॥
अनपराधी हिंसा ॥ करीत जोंवरि
सुखाचि तोंवरि ॥ होळी पाहें ॥ ६ ॥
निराशा गांजिते ॥ जिवासि जोंवरि
सुखाचि तोंवरि ॥ होळी पाहें ॥ ७ ॥
ऋणपीडा जीवा ॥ गांजीत जोंवरि
सुखाचि तोंवरि ॥ होळी पाहें ॥ ८ ॥
आळसें घेरिली ॥ कायाही जोंवरि ॥
सुखाचि तोंवरि ॥ होळी पाहे ॥ ९ ॥
अंतरात्मा रुष्ट ॥ टोंचित जोंवरि
सुखाचि तोंवरि ॥ होळी पाहें ॥ १० ॥

---

## भाग्यशत्रू कोण ?

### अभंग.

खंडें खंडें केलीं ॥ वृक्षाच्या देहाचीं
मग विस्ताराची ॥ वार्ता नोहे ॥ १ ॥
आळस कलह ॥ अनपराधी हिंसा
राष्ट्र भाग्या कैसा ॥ धोका देती ॥ २ ॥
परद्रव्यलोभ ॥ व्यभिचार दंभ ॥
असत्य अन्याय ॥ भाग्य शत्रु ॥ ३ ॥
नास्तिकता मद ॥ दुरहंकार दैन्य ॥
सदा राष्ट्रभाग्य ॥ हरिताति ॥ ४ ॥
मराठी राष्ट्राला ॥ जाग देत आहें ॥
विश्वंभरा पाहें ॥ कृपादृष्टि ॥ ५ ॥

---

## दुर्दैवी देशभगिनीचें समाधान.

### साकी.

शोक नको तूं करुं गे बाले
विवेक चित्तीं घेईं

पूर्वपुण्य तव सरलें ह्मणुनी
देव पतीतें नेई ॥ १ ॥

इंद्रियनिग्रह करुनियां तूं
गंगाशुद्ध असावें
ईशप्रार्थना नित्य करोनी
जीवातें सुखद्यावें ॥ २ ॥

शांतवृत्तिनें सदा राहिं तूं
क्षमाशील अद्वेषी
पुण्य संग्रहीं सदा वाढवीं
जें संमत धर्मासी ॥ ३ ॥

अनपराधिता यत्नें पाळीं
दक्ष सदा राहोनी
परामर्श घे यथानुशक्ति
दुःखिजिवां भेटोनी ॥ ४ ॥

अशी वागतां निज जन्माचें
सार्थक तूं करिशील

अंतीं तुजला इष्टोत्तम गति
देव खचित देईल ॥ ५ ॥

---

## वैभवनाशाचें कारण.

### अभंग.

समुद्राच्या लाटा ॥ घांसति शिळासि ॥
तेणें होय त्यांची ॥ रेती काळें ॥ १ ॥
पर्वता लाविती ॥ सुरुंग एकेक ॥
तेणें त्याचें पिष्ट ॥ होय काळें ॥ २ ॥
वृक्षाचे घांसणी ॥ अग्नि पडे सान ॥
तेणें होय वन ॥ दग्ध काळें ॥ ३ ॥
बुद्धिमंतां जरि ॥ राष्ट्रीं पडे वैर ॥
राष्ट्रविभवनाश ॥ होत काळें ॥ ४ ॥

---

# पाण्याचा झरा व सुखाचा झरा.

## अभंग.

झुळ झुळ झऱ्या ॥ वाहसि तूं आतां
पूर्वी काय कथा ॥ होती तुझी ॥ १ ॥
काय धरणीकंपें ॥ भूवरि आलासी ॥
काय ज्वालामुखीस्फोटीं जन्म ॥ २ ॥
कोठें तुझें मूळ ॥ पृथ्वीगर्भी असे ॥
रूप तुझें दिसे ॥ वरी गोड ॥ ३ ॥
मानवी सुखाचा ॥ झरा रम्य आहे ॥
परी लागताहे ॥ पूर्व तप ॥ ४ ॥
हाय हाय किती ॥ दिनरजनी जाती ॥
उसासे चालती ॥ दुःखपूर्ण ॥ ५ ॥
कैक वर्षे जाती ॥ कष्ट-तपांमध्यें ॥
तेव्हां व्यक्त सुखें ॥ पुढती होती ॥ ६ ॥
कैक सुखें तरि ॥ त्या जन्मीं अशक्य ॥
ह्मणुनीयां योग्य ॥ जन्म पुढें ॥ ७ ॥

जगाची चालना ॥ शोधूं जातां खोल ॥
जगदीश एक ॥ जाणताहे ॥ ८ ॥

---

## वायु व मनुष्य यांचा संवाद.

### साकी.

मंजुल वाहुनि उषःकालिं तूं
जगताला सुखवीशी
तोच कधीं कधीं वादळ बनुनी
कृतांतरूपा घेशी ॥ १ ॥

सकल जिवांचा प्राणाश्रय वा
पवना तूं झालासी
देहनाश कारण तूंचि
निधनसमयीं होशी ॥ २ ॥

जगदीशाचा सेवक आहें
मनुजा मी पवन

आज्ञा त्याची प्रमाण मजला
न करीं अनमान ॥ ३ ॥
विश्वेशाची तत्परतेनें
सेवा करितों ह्मणूनी
पूजिति भूवरि मनुष्य मजला
देवकला देऊनी ॥ ४ ॥

---

## संगतिप्रभाव.

### अंजनीगीत.

वकुलावरुनी वायू आला
तोहि सुगंधें सुखकर झाला
सज्जनसंगें कुणी राहिला
सहज भला होतो ॥ १ ॥
वायु तलावा वरुनी आला
तत्संगानें शीतळ झाला
सभाग्यसंगें दुःखी झाला
सहज भाग्यवंत ॥ २ ॥

पुनईपुष्पां उग्र गंधता
त्यां वरुनीयां वायु वाहतां
असह्य होइ स्पर्श करितां
जननासिकेनें ॥ ३ ॥

वण्यावरुनि वायु आला
तोही जीवां घातक झाला
कुसंगानें वांयां गेला
होतकरु तरुण ॥ ४ ॥

---

## सृष्टि अनलसता शिकविते.

### अंजनीगीत.

भरति ओहटी समुद्राची
दाहि दिशा गति नित्य वायुची
बाष्प बर्फ जल स्थिति पाण्याची
अनलस शिकवीते ॥ १ ॥

चक्रगिरकिगति सहा ऋतूंची
गति आकाशीं सदाग्रहांची
दैनंदिनगति तैशी त्यांची
अनलस शिकवीते ॥ २ ॥

घटिप्रहरांनीं गति कालाची
षडवस्थागति आयुष्याची
जीविष्णूता जीव शक्तिची
अनलस शिकवीते ॥ ३ ॥

आकर्षक शक्ती वस्तूंची
वैकर्षक शक्ती इतरांची
शक्ती तैशी प्रतिक्रियेची
अनलस शिकवीते ॥ ४ ॥

उत्पादक शक्ती मायेची
ज्ञानशक्ती चित्कलेची
सदा स्पष्ट शक्ती विलयाची
अनलस शिकवीते ॥ ५ ॥

नद्या वनें गिरि बोध करीती
 अनलसता आज्ञा ईशाची
चतुर्दशविधभूतसृष्टिची
 मति ऐशीच असे ॥ ६ ॥

अनलसता जगदीशें धरिली
 ह्मणुनि अतर्क्यंही जगति चालली
खूण ज्यांतें हृदयिं समजली
 ते बुध जाणावे॥ ७ ॥

---

## पुण्यसंग्रह.

### अंजनीगीत.

जलबाष्पें जरि भरला मेघू
 तरीच वृष्टीचा आनंदू
सांठा शक्तीचा तरि विक्रमु
 शक्य होई सकलां ॥ १ ॥

भाग्यवृद्धि जरी राष्ट्रीं व्हावी
पुण्यसंग्रहीं काळजी घ्यावी
मग राष्ट्रोद्धारक प्रजा यावी
जन्मा हा नेम ॥ २ ॥

चित्तें ही जन अव्यभिचारी
शुभकर्मोद्यत शुद्धाचारी
दक्ष सर्वदा तनुव्यायामीं
राहति तरी काळें ॥ ३ ॥

थोर महात्मे राष्ट्रीं जन्मति
संकटांतुनि राष्ट्रा तारिति
मग सकलांचीं चित्तें भरती
उत्तम आनंदें ॥ ४ ॥

---

## तपप्रभाव.

### अंजनीगीत.

वृक्ष वनस्पति उन्हें तापती

तेणें वाढे अंतःशक्ती
तेजस्वी पल्लव मग येती
सुसमयीं त्यातें ॥ १ ॥
ब्रह्मचर्य शास्त्रोक्त पाळिती
त्यांची वाढे तेजःशक्ति
विजयसंपदा शोधित येती
धन्य अशा लोकां ॥ २ ॥
तेजोबलगुण ज्या बीजांतरीं
त्याचा रोपा वाढे खडकीं
दुर्बल तेज जयाचें तें बीं
सुक्षेत्रीं नासे ॥ ३ ॥
तेज प्रखर जरी खेळे अंगीं
धैर्य चढे मग घोर संकटीं
दुर्बळ पापी वीर्यसंतती
घालवि भाग्यातें ॥ ४ ॥
प्रखरतराग्नी कानन जाळी
दुर्बळाग्नितें बालक तुडवी

जगीं प्रतिष्ठा सदा असावी
तेजस्वी त्यांची ॥ ५ ॥

---

## बालबोध.

### अंजनीगीत

नित्यप्रार्थना जगदीशाची
शुद्धशीलता टिकण्यासाठीं
गुरुकिल्ली ही सर्व शुभाची
योजावी बाळा ॥ १ ॥

स्वदेशकार्यी तनु वाहावी
निरपराधिता सांभाळावी
गुरुकिल्ली ही सर्व शुभाची
योजावी बाळा ॥ २ ॥

तुलसि चंदन बकुल मोगरी
देवमानवां प्रिय तीं झालीं

गुण ज्यापाशीं थोरवि त्याची
बाळा सर्वत्र ॥ ३ ॥

न्यायें वस्तू जी दुसऱ्याची
विष मानावी इच्छा तीची
वांछा धरितां परधनस्त्रीची
भाग्य दग्ध होतें ॥ ४ ॥

विश्व अनंत अपार आहे
प्रभु सत्यानें चालविताहे
कृपासाउली तो करिताहे
निजभक्तांवरती ॥ ५ ॥

---

## वीर्यप्रभाव.

### अंजनीगीत.

माती ती जड बीज सजीव
माती पासुनि वृक्ष अवयव

बनती हा तों वीर्यप्रभाव
स्पष्ट पहा दिसतो ॥ १ ॥

जन हे बहु अज्ञानी असतां
योजक त्यांतें योग्य मिळतां
राष्ट्र बनतें हां हां ह्मणतां
त्याच जनतेचें ॥ २ ॥

वट बीं खडकीं पाळ घेई
प्रचंड वृक्ष काळें होई
सुपीक भूमी नाशक होई
दुर्बल बजिांतें ॥ ३ ॥

उत्तम नेते राष्ट्रा तारिति
किति वाइट जरि देशस्थिति
वीर्यहीन ते धुळीस नेती
सुस्थित राष्ट्रातें ॥ ४ ॥

## ओज.

### अंजनीगीत.

वारा नसतां वृक्ष न हाले
  संकल्पाविण शरीर न चाले
वारा वाहे वृक्ष डोले
  तनु चाले संकल्पें ॥ १ ॥

उठाउठी जशि संकल्पांची
  खटपट तैशी शरीराची
शक्ति पाहिजे परि वीर्याची
  यशःसिद्धि येण्या ॥ २ ॥

वृक्ष पहा जे कुरचुक असती
  वादळ होतां ते चुरडति
चिवट असति ते दृढतर होती
  विस्तारति अधिक ॥ ३ ॥

क्षीणबल त्यां दगदग जाचे
  वीर्यवंत त्यां ती सुख देते

मूल विझवी दुर्बलाग्नितें
वारिल वणवा काय ॥ ४ ॥

---

## जिवंत असून मृत कोण ?

### अंजनीगीत.

'दीपशिखेवरि पतंग गेला
त्याचा तत्क्षणि नाश जाहला
पैशासाठीं ऋणी जाहला
तो नर त्याचपरी ॥ १ ॥
ऋणि दुसऱ्याचा जो जो वागे
जिवंत असुनी मेला पाहें
त्यातें सुख दिनरात्रीं नोहे
ऋण जोंवरि आहे ॥ २ ॥
दीपशिखेवरि पतंग गेला
त्याचा तत्क्षणिं नाश जाहला
सौख्यासाठीं पापीं पडला
तो नर त्याचपरी ॥ ३ ॥

अंतरात्मा टोंची ज्याला
तो नर जिवंत असुनी मेला
जोंवरि प्राण तोंवरि त्याला
जाचे पापविष ॥ ४ ॥

---

## पाप भोगणें आहे तों पुण्य फिकें पडतें.

### अंजनीगीत.

खड्डे असती जमिनीमध्यें
सपाट करण्या भरणी लागे
पापदोषफल शमण्या तैसें
बहु पुण्य जातें ॥ १ ॥
सपाट भूवरि माति टाकितां
त्वरित होतसे उंचवटा
तैसा निष्पापी नर झटतां
त्वरित भाग्य चढतें ॥ २ ॥

---

## पाप दुःखाचें मूळ आहे.

### अंजनीगीत.

मूषक लोहा भक्षूं जाई
दंतहीन मुख त्याचें होई
ईशदत्त परवस्तूलोभी
फोडी शिर अपुलें ॥ १ ॥

चणवा सागर भक्षूं जाई
तो जलकांठीं मरून जाई
कामव्यास व्यभिचारें होई
तो झिणवी अपणा ॥ २ ॥

काम सुखेच्छा धर्म सोडुनि
नर वा नारी जरि मनिं आणी
तद्भाग्यातें विधिकर हाणी
प्रचीति जनिं पाहा ॥ ३ ॥

परमात्मा हृदयांत राहातो
आज्ञा त्याची जो न ऐकतो
अंतर्वाणीविरुद्ध चालतो
आत्मघाति नर तो ॥ ४ ॥

बाह्यक्रिया जरि निर्मळ असती
परि कु-कामना मनीं चालती
कर्मावेक्षक विबुध समजती
पापिच त्या जीवा ॥ ५ ॥

ह्मणुनी नरनारी बांधव हो
मनीं शरीरीं शुद्ध राहा हो
मग भाग्याचा काळ पहा हो
लवकरी येईल ॥ ६ ॥

पापी अपराधांतें करिती
तेणें दुःखित पाप्यां शापिती
शिवाय त्यांतें योग्य दंडिता
ईश-अधिकारी ॥ ७ ॥

ज्यांनीं पूर्वीं दोष केले
त्यांचें आतां भाग्य गेलें
वागति संप्रति नीतीशीलें
सुखि पुढती होतील ॥ ८ ॥

अनुतापें बहु पुण्य केलें
परी न संप्रति फळा आलें
पूर्वपाप भोगणें राहिलें
तोंवरि कष्ट बहु ॥ ९ ॥

---

## देवाची आज्ञा.

### पद.

आज्ञा विष्णूची ॥ पृथ्वी अवघि सज्जनांची
इच्छा अपुली मर्यादावी कां सागरगिरिंनीं
अथवा नरपशु कुटिलाकांक्षाजालंकतंतूंनीं
सुखवावी महि जनहितवृद्धीसाठीं नित्य झटुनी
आज्ञा विष्णूची ॥ पृथ्वी अवघि सज्जनांची ॥ १ ॥

# ईशप्रार्थनामहिमा.

## अभंग.

जगन्नायकाची ॥ नित्य शुद्ध चित्तें
प्रार्थना नेमानें ॥ करी त्यासी ॥ १ ॥
सर्वश्रेष्ठाचें जें ॥ अपार सामर्थ्य
त्याचा दिव्य अंश ॥ प्राप्त होतो ॥ २ ॥
समर्थांचा अंश ॥ प्रकट ज्यांमध्यें
त्यांसि यश येणें ॥ साहजिक ॥ ३ ॥
प्रार्थनेचा मार्ग ॥ सुलभ उत्तम ॥
धरुनि हा नेम ॥ धन्य झाले ॥ ४ ॥
स्वतःच्या शब्दांनीं ॥ करावी प्रार्थना ॥
सांचा निज मना ॥ घालूं नये ॥ ५ ॥
सुखदुःख सर्व ॥ देवासि सांगावें ॥
तेणें जीव पावे ॥ समाधान ॥ ६ ॥
राष्ट्रविस्तारासि ॥ आणुनियां मनीं ॥
जगदीश ध्यानीं ॥ मन लावावें ॥ ७ ॥

राष्ट्रस्थिति बरीवाईट जी वाटे ॥
सर्व अनंतातें ॥ ती सांगावी ॥ ८ ॥

शुद्ध शीलासाठीं ॥ यत्नसिद्धीसाठीं ॥
मदत मागावी ॥ विश्वेशाची ॥ ९ ॥

जेव्हां बहुत जीव ॥ राष्ट्रभाग्यासाठीं ॥
सतत प्रार्थिती ॥ जगन्नाथा ॥ १० ॥

तेव्हां दिव्य तेज ॥ राष्ट्रीं प्रगट होय ॥
भाग्यवृद्धी होय ॥ त्या राष्ट्राची ॥ ११ ॥

मराठी राष्ट्राला ॥ जाग देत आहें ॥
विश्वंभरा पाहें ॥ कृपादृष्टी ॥ १२ ॥

---

## जीवाचें अमरत्व.

### साकी.

देह जातसे परंतु जीवा
नाश किमपि नाहीं ॥

संचित घेउनी जाई पुढती
प्रवासि तैसा पाहीं ॥ १ ॥

थांबे जैसा विश्रांतीस्तव
प्रवासि ठायीं ठायीं ॥
जीव त्यापरि निधनमिषानें
विश्रांतीतें घेई ॥ २ ॥

ह्मणुनी जनहो मरणभीतितें
समूळ तुह्मी टाका
दक्ष राहुनि सुकृत पदरीं
प्रतिदिनिं तुह्मी बांधा ॥ ३ ॥

---

## गच्ची.

### साकी.

प्रशस्त गच्ची प्रतिदिनिं मजला
गोड गोड सुख देशी

शीतल मंजुल पवनानें तूं
रमविसी मम प्राणासी ॥ १ ॥

अनंत निर्मल श्यामसुंदर
नभ हें वितान खासें ।
चंद्र तारका दीप लटकले
शांती सुरम्य असे ॥ २ ॥

येथें पडतां शीण जिवाचा
दूर निघूनी जाई ।
शुद्ध विचारां स्फूर्ति येथें
सहजचि चित्तीं येई ॥ ३ ॥

कार्ययोजना देशोन्नतिची
येथें उत्तम होते ।
ज्ञानदृष्टिचा मोह जाउनी
निर्मल येथें होते ॥ ४ ॥

---

## वारा पाउस.

### विद्युन्माला

वारा आनंदाचा आला
तप्तांगाला सुखकर झाला ॥
दुःखी पापी जन जे त्यांला
कुरवाळुनि देतो सौख्यांला ॥ १ ॥

आनंदाचा पाउस आला
सर्वांतें सुखकारी झाला ॥
सृष्टी घेते हिरवा शेला
पाहुनि होतें सुख नेत्रांला ॥ २ ॥

---

## मोगरी.

### अभंग.

अग अग मोगरी ॥ वेल झालीस कशी
काय तूं स्वर्गींची ॥ कुणी देवता ॥ १ ॥

देवतासांनिध्यें ॥ जें सुख मिळतें
तेंच सुख देतें ॥ तव पुष्प ॥ २ ॥
तव पुष्पमाला ॥ अमृताची वृष्टी
होते जीवतृप्ती ॥ श्रेष्ठ सुखें ॥ ३ ॥
कल्याण कल्याण ॥ कल्याण तव असो
सदा ईश वसो ॥ तुझ्या चित्तीं ॥ ४ ॥

---

## विस्मृति.

### साकी.

विस्मृति तूझ्यापासुनि दुःखें
मनुजांतें बहु होती
कार्यकर्ते नर जे कोणी
तुजला शत्रू गणिती ॥ १ ॥
समाधानपरि मानी तूं गे
मित्रही तूतें होती
पापी आणि दुःखी जे जे
तुजला ते पूजीती ॥ २ ॥

पापस्मृति पाप्यांची जाते
तेव्हां त्यां सुख होतें
दुःख जेव्हां विसरे दुःखी
त्यातें शांती येते ॥ ३ ॥

---

## गाढझोंप.

### अंजनीगीत.

गाढ निद्रा सौख्य देते
शीण जिवाचा हरून नेते
दुःखांचा ती विसर पाडिते
ब्रह्मकृपानिद्रा ॥ १ ॥

पाप्यातें निज पाप टोंची
गाढनिद्रा विस्मृति देई
पापी तोही सुखी होई
गाढनिद्रेनें ॥ २ ॥

निराश आणि जे सुखभागी
गाढनिद्रा सकलां आई
थोपटुनी प्रेमानें निजवी
न ह्मणे कमि अधिक ॥ ३ ॥

गाढ निद्रा जननि उदारा
सुखदायी अमृतधारा
तिजपासुनियां सौख्यथारा
सर्वां होत असे ॥ ४ ॥

---

## स्थित्यंतर.

### अंजनीगीत.

स्थित्यंतर दुःखातें देतें
तेंचि सुखातें चालत आणितें
गर्विष्ठांचा गर्व हरीतें
स्थित्यंतर पाहा ॥ १ ॥

स्थित्यंतर अनुताप देतें
स्थित्यंतर सन्मार्ग दावितें
सुखामध्यें दुःख दावितें
स्थित्यंतर पाहा ॥ २ ॥
सुखगोडी दुःखीं शिकवीतें
सुखांत सुखवृद्धीतें करितें
निरुत्साहि त्यां हिंमत देतें
स्थित्यंतर पाहा ॥ ३ ॥
स्थित्यंतर जन्म देतें
स्थित्यंतर वाढ करितें
स्थित्यंतर नाश आणितें
अवलोकीं सृष्टी ॥ ४ ॥

---

## मृत्युस्तुति.

### अंजनीगीत.

दुष्ट गांजिती ज्या प्राण्यांतें
बोलाविति ते स्वतः मृत्युतें

मृत्युस्मृति त्यां आशा देते
दुःखअंताची ॥ १ ॥

दुःखविषाचा घातक पेला
निराशेनें ज्यातें दिधला
आश्वासन दे मृत्यु त्याजला
भावी सौख्याचें ॥ २ ॥

मृत्यु आहे फार चांगला
जनहो निंदूं नका त्याला
जगदीशें हा मित्र दीधला
दीन अनाथांतें ॥ ६ ॥

---

## मृत्युस्तुति.

### अंजनीगीत.

मृत्यू आहे अभागिमित्र
निष्ठुर नोहे तो करुणार्द्र

पाडुनि पापांचा तो विसर
जन्म नवा देई ॥ १ ॥

जे मेल्यावर पिशाच होती
त्यांतें मात्र पूर्वस्मृति
तेहि तेथें जेव्हां मरती
विसरति पूर्व कथा ॥ २ ॥

जे मरुनीयां तत्कालचि
अन्य देहीं जन्मा जाती
पापांची त्यां पडुनि विस्मृति
शांति पावताति ॥ ३ ॥

ज्याला ज्याला पाप अंतरीं
टोंचिताहे दिवसरात्रीं
त्यातें मृत्यु कधीं नव्हे अरि
वाटतसे मित्र ॥ ४ ॥

## हिंसानिषेध.

### अंजनीगीत.

पर जीवांतें जे जाचीती
स्वसुखाची ते हानी कारिती।
शाप तयांचे ज्यांतें पीडिति
जाळिति भाग्यातें ॥ १ ॥

देह पीडितां पर जीवांचे
सौख्य भंगतें निजदेहाचें
मना जाचितां पर जीवांचे
निजमन सुख भंगे ॥ ६ ॥

---

## यशप्रातीला अवश्य गोष्टी.

### अंजनीगीत.

वीर्यरक्षणें शक्ति वाढते
ईशप्रार्थना तेज देते

दोन्हीं पाळिति मनुज दक्ष ते
भाग्यासि चढती ॥ १ ॥

धर्मविरुद्ध काम न धरणें
विवाहमार्गें कामा वरणें
विवाह अनुरूपांमधिं होणें
राष्ट्र भाग्यकारी ॥ २ ॥

विवेकानें संयम पाळुनि
शुद्धवीर्य राष्ट्रीं रक्षुनि
अनंत जगदीशातें ध्याउनि
व्हा अप्रतिहत विजयी ॥ ३ ॥

प्रबळाग्नीसीं वायु सहायता
जैसा मग तो वनसंहर्ता
ईश्वरभक्ती सुवीर्यवंता
तैशी यशदात्री ॥ ४ ॥

# शुद्धाचारसंबंधी जनबोध.

## अंजनीगीत.

विवेक नाहीं व्यसनीं होती
विवेक नाहीं पापें करिती
निर्मलशील तयांतें दूषिति
काय नवल पाहा ॥ १ ॥

विवेक नाहीं मद्य प्राशिती
विवेक नाहीं मांस भक्षिती
मद्यमांसवर्जकां दूषिती
काय नवल पाहा ॥ २ ॥

अमलशील जे ते इतरांशीं
अन्न शरीर संबंधांसि
वर्जिति नातरी घडेल त्यांसि
आचारीं पतन ॥ ३ ॥

शील दोष जरि त्यजवत नाहीं
थोर बरोबरि कैशी होई

द्वेषा करितां नाश होई
राष्ट्रभाग्याचा ॥ ४ ॥

थोर पदें जीं भूवरि असती
थोर सुखें जीं भूवरि मिळती
योग्य त्यांतें न्यायें असती
पुण्य थोर जे ते ॥ ५ ॥

---

## दुःखी कोण होतो.

### अभंग.

न्यायशुद्ध सुखें ॥ देवानें दीधलीं ॥
त्यांत न मानिली ॥ तृप्ति जेणें ॥ १ ॥

न मानुनि सौख्य ॥ त्यांत पाप करी ॥
करित विघडी ॥ परसौख्याची ॥ २ ॥

क्षणिक तृप्तीसाठीं ॥ अन्यायें स्वतःच्या ॥
परशुद्ध सौख्या ॥ घात करी ॥ ३ ॥

त्यावरि कोपोनी ॥ जाळी भाग्य त्याचें ॥
जगन्नाथ त्याचे ॥ हाल करी ॥ ४ ॥
शुद्ध सुखें त्याचे ॥ दैवीं देत नाहीं ॥
पाप करूं पाही ॥ तरि अनर्थ ॥ ५ ॥
दुःख भोगिताहे ॥ पूर्व पापांकरितां ॥
हें जाणत असतां ॥ पाप न करवे ॥ ६ ॥
दुःख दुःख दुःख ॥ सदा भोगिताहे ॥
मग दीन बाहे ॥ विश्वनाथा ॥ ७ ॥
विश्वनाथ जेव्हां ॥ अंतरीं बोलत ॥
करूं नको पाप ॥ न ऐकिलें ॥ ८ ॥
आतां ईशधांवा ॥ करी गांजलेला ॥
जगन्नाथ झाला ॥ करुणार्द्र ॥ ९ ॥
सुबुद्धि देतसे ॥ त्या दीन प्राण्यातें ॥
अधिक पापातें ॥ होऊं नेदी ॥ १० ॥
पूर्व पापक्षय ॥ होतांचि भक्ताला ॥
उत्तम सौख्याला पोंचावितो ॥ ११ ॥

पूर्वीच करिता ॥ जीव ईशस्मरण ॥
तरि पापा मरण ॥ मुळिंच होतें ॥ १२ ॥
सदा ध्यात प्रेमें ॥ प्राणी जो अनंता ॥
त्यासि तो रक्षिता ॥ करुणामूर्ती ॥ १३ ॥
सदा प्रार्थिताहे ॥ जगन्नाथकृपा ॥
त्याचा तो संगोपा ॥ सहज करी ॥ १४ ॥
मराठी बांधवां ॥ जाग देत आहें ॥
विश्वंभरा पाहें ॥ कृपादृष्टी ॥ १५ ॥

---

## सुखी कोण असतात.

### अंजनीगीत.

इंद्रियनिग्रह वीर्य देई
वीर्यरक्षणें हिंमत येई
विचारशुद्धी पुण्य देई
मनुज प्राण्यातें ॥ १ ॥
शुद्धविचारी शुद्धाचारी
धर्ममार्गें मितसुखभोगी

ईशकृपेनें होय संतति
भाग्यशील त्यांतें ॥ २ ॥
देशकार्यी तनु झिजवीति
परअन्याय मनें हि न करिति
ईशकृपेनें होय संतति
भाग्यशील त्यांतें ॥ ३ ॥
ईशप्रार्थना यान करूनि
प्रवास करिती भव–अटवींतूनि
पोंचति ते सुखरूप जाऊनी
सहज स्वर्गपुरितें ॥ ४ ॥

---

## अभागी कोण होतो व भाग्यवान् कोण होतो.

### अंजनीगीत.

पापें करुनी सुखें भोगितो
ऐसा प्राणी पुन्हा जन्मतो

आयुष्याचें तारू हांकितो
कुपरिस्थितिमध्यें ॥ १ ॥

जीवकर्मफलदायि दिव्यजन
करिती यातें भाग्यहीन
नाना यत्न करून करून
सर्व विफल होतें ॥ २ ॥

भक्तीचें मग बंदर करितो
काळ ईश्वर ध्यानिं योजितो
ईशप्रार्थना योग जाळितो
अघ त्या प्राण्याचें ॥ ३ ॥

प्राणी मग तो शुद्ध होतो
दिव्यजनांना प्रिय होतो
शुभकालीं मग जन्म घेतो
शुभ परिस्थितिमध्यें ॥ ४ ॥

ईशप्रार्थना शुद्धशीलता
सर्व मंगलदायिदेवता

यांतें तत्परतेनें भजतां
प्राणि धन्य होई ॥ ५ ॥

---

## कोणी अनुतापी.

### अंजनीगीत.

तुलना करितां मम इतरांशीं
अंतरिं गूढ विचार येती
अदृश्य कोणी मजला छळिती
कर्म-अनुबंधें ॥ १ ॥

पूर्वी कोणी म्यां दुखविले
शाप तयांचे शिरीं घेतले
ते हे आतां फळासि आले
मजला गांजीती ॥ २ ॥

ज्यांतें छळिलें तत्कैवारी
दिव्यजन मज विरुद्ध भारी
ह्मणुनी मजला होती वैरी
कारणही नसतां ॥ ३ ॥

आतां पुढती काय करावें
  जगदीशातें शरण रिघावें
दुःख निमूटपणिं सोसावें
  कर्में ओढवलें ॥ ४ ॥
नम्रपण सर्वांशि धरावें
  यत्नें सुशीलपणिं राहावें
पुण्य पदोपदिं संचित जावें
  पुढती शुभदायी ॥ ५ ॥

---

## कोणी अनुतापी.

### अंजनीगीत.

अंतरिं देवराणा आहे
  तो जीवाला बोधिताहे
त्या बोधानें चालताहे
  तो सुखि जीव सदा ॥ १ ॥
अंतरींची देववाणी
  जो उन्मत्तपणें अवमानी

तो करिताहे स्वसौख्यहानी
दुर्दैवी जीव ॥ १ ॥

अन्यायें जीं सुखें मिळविलीं
तीं पुण्याला घातक झालीं
ह्मणुनी जीवा कष्टद आली
स्थिति भावी काळीं ॥ ३ ॥

पूर्वकर्म आणि वर्तमान स्थिति
यांची कारण कार्यपद्धति
प्रकट जाहली माझ्या चित्तीं
दुःखाचें फल हें ॥ ४ ॥

दुःखाचें फल गोड आहे
करुणामूर्ती देव आहे
अन्य उपाय दुष्टा नोहे
ह्मणुनि देत दुःखा ॥ ५ ॥

मी दुष्टपणें पाप केलें
ह्मणुनि देवें दुःख दीधलें

दु:ख देउनी पुनीत केलें
कल्याणासाठीं ॥ ६ ॥

नाथ जगाचा मवाळु आहे
सुशील त्यांतें सुखकर आहे
दुष्टातेंहि दु:खद आहे
भावि सुखाकरितां ॥ ७ ॥

देवराया योग्य केलें
ममसौख्याचें पूज्य केलें
येणें करूनि पाप घातलें
दु:खभट्टिमध्यें ॥ ८ ॥

पाप माझें जळुनि जाइल
काळ सुखाचा पुढती येइल
देवकृपा मज सहजचि आणिल
मंगलइष्टसुखें ॥ ९ ॥

# स्वतःसंबंधीं.

## अभंग.

राष्ट्र आपत्कालीं ॥ स्वतंत्र जगणें
आणि विक्रम करणें ॥ कठिण बहु ॥ १ ॥

त्यांतही ज्याजवळी ॥ धनबळ नाहीं
त्याचे हाल पाहीं ॥ फार होतां ॥ २ ॥

विपत्ति इतुक्या ॥ मजला असतां
देवें ममदयिता ॥ कां मारीली ॥ ३ ॥

मारीली कां पत्नी ॥ विश्रांतीची मूर्ति
कैसी देशभक्ति ॥ करूं आतां ॥ ४ ॥

इतुक्याहि मध्यें ॥ शत्रू छळिताती
नवल मोठें कीं ॥ निष्कारण ॥ ५ ॥

ज्यांच्या भाग्यासाठीं ॥ सतत कष्टावें
तेच शत्रू व्हावे ॥ नवल थोर ॥ ६ ॥

आपत्ती इतुक्या ॥ जणु पुऱ्या नाहीं
ह्मणुनि मोह पाही ॥ देव धाडी ॥ ७ ॥

कारे देवराया ॥ माझा अंत घेसी
नाहीं कोण तुजसी ॥ विचारिता ॥ ८ ॥
बोलिलों उद्धट ॥ क्षमा करीं नाथा
पूर्वदोष माथां ॥ माझ्या असती ॥ ९ ॥
पूर्वदोष माझे ॥ पुढें आड आले
ह्मणुनि सर्व हें ॥ उलट झालें ॥ १० ॥

---

# ईशप्रार्थना.

## अभंग.

जगन्नाथा सर्व ॥ भाग्यां तूं आगम
आह्मां तुझें प्रेम ॥ भाग्यदायी ॥ १ ॥
तव प्रेम कैसें ॥ राहील अखंड
ही चिंता उदंड ॥ आह्मां नित्य ॥ २ ॥
प्रेमें तुझी भक्ती ॥ शीलाची शुद्धता
हीं नीट असतां ॥ प्रीती देशी ॥ ३ ॥
ऐसें संतजन ॥ आह्मां शिकवीती
परि दुर्बळमति ॥ मर्त्य आह्मीं ॥ ४ ॥

जाणुनीही पुन्हांपुन्हां पापें करूं
पुढील विचारू ॥ सांडोनीया ॥ ५ ॥
आतां तुझा धांवा ॥ निदानी उपाय
दुसरी न सोय ॥ ॥ दीनां आह्मां ॥ ६ ॥

---

## ईशप्रार्थना.

### अभंग.

यत्न करूं वेळोवेळां
परि तितुके जाती वायां ॥ १ ॥
पाप-इच्छा न सोडिती
आतां तारीं जगत्पति ॥ २ ॥
अशुभाचें मूळ पाप
पाप ह्मणुनि सर्व ताप ॥ ३ ॥
दुजे उपाय न चलति
आतां धांवें जगत्पति ॥ ४ ॥

---

# दिव्यजनप्रार्थना.

## अंजनीगीत.

अंतरिक्षगत दिव्यजनांनों
  मजवरि तुह्मी कृपा कराहो
पापवासना दूर धराहो
  माझ्यापासूनी ॥ १ ॥

सावध सावध असतां असतां
  होते अंतरिं विवेकशून्यता
मज हतभाग्या ऐसें घडतां
  कुविचारां फावे ॥ २ ॥

कुविचारें मन छिद्रित झालें
  तेणें पुण्य झिरून गेलें
पुण्यपात्र तें रितें जाहलें
  मज उशिरां कळलें ॥ ३ ॥

अनुतापी मन फार जाहलें
  कांहीं वेळ शुद्ध राहालें

पुन्हा त्यातें हाय झडपिलें
  दुष्ट चित्ततेनें ॥ ४ ॥
ह्मणुनि दीन मी तुह्मां प्रार्थितों
  मजवरि तुह्मी दया कराहो
अंतरिक्षगत दिव्यजनहो
  मजला सांभाळा ॥ ५ ॥

---

## स्वतःसंबंधी.

### अभंग.

( आर्यसंघस्थापना )

आर्यशील गेलें ॥ नांवहि लोपलें
भाग्याचें जाहालें ॥ भग्नतारूं ॥ १ ॥
राष्ट्रसंस्थापना ॥ करावी ह्मणूनि
संस्था स्थापीयेली ॥ आर्यसंघ ॥ २ ॥
शालीवाहन शक ॥ अठराशें सतरा
संवत्सर तेव्हां ॥ स्थापीयेली ॥ ३ ॥

संस्था स्थापूनीयां ॥ श्रीरामा अर्पिली
असे चालविली ॥ नियंतृवर्गें ॥ ४ ॥
धीर या जनांच्या ॥ नाहीं मनामध्यें
ह्मणती या संस्थेनें ॥ काय केलें ॥ ५ ॥
वर्षं शतें गेलीं ॥ शीलभ्रष्टतेंत
कैशी होईल त्वरित ॥ राष्ट्रोन्नति ॥ ६ ॥
कर्तव्य आपण ॥ करीत असावें
फळ योग्यवेळे ॥ येईल मग ॥ ७ ॥
जगन्नाथ आहे ॥ न्यायी सत्यरूप
जितुके आपण योग्य ॥ तितुका पावे ॥ ८ ॥

---

# स्वतःसंबंधीं.

## अभंग.

( आर्यशिक्षणसंस्थास्थापना. )

( आर्यन एज्युकेशन सोसायटी )

मित्र विनायक ॥ हरिश्चंद्र पुत्र
उपनाम ठाकूर ॥ त्याचें आहे ॥ १ ॥

वक्तृत्व सभेसि ॥ होतों सभासद
पुढती सहज ॥ मित्र झालों ॥ २ ॥

अधर्माचें वारें ॥ फैलावलें फार
म्हणूनि निर्धार ॥ ठरविला ॥ ३ ॥

शिक्षणांत धर्म- ॥ शिक्षण असेल
ऐशी पाहिजेल ॥ योग्य संस्था ॥ ४ ॥

आर्यशिक्षणसंस्था ॥ मुंबईत स्थापिली
ईशें कृपा केली ॥ यश दिलें ॥ ५ ॥

मुख्य श्रेय आहे ॥ विनायक मित्रा
झाला मुख्य कर्ता ॥ स्थापनेसी ॥ ६ ॥

जरी न भेटता ॥ चतुर विनायक
संस्थेचा उद्भव ॥ होता कठिण ॥ ७ ॥

शालीवाहन शक ॥ अठराशें एकूणीस
संस्थेचा उद्भव ॥ तेव्हां झाला ॥ ८ ॥

बहु विघ्नें आलीं ॥ ईशें दूर केलीं
संस्था रक्षीयेली ॥ संकटांत ॥ ९ ॥

मित्रजन मिळति ॥ संस्था चालविती
सुशिक्षित होतीं ॥ तरुणजन ॥ १० ॥

---

## स्वतःसंबंधी.

### अभंग.

( राष्ट्रीयप्रार्थनापुस्तक. )

देशभाग्यासाठीं ॥ प्रार्थना देवाची
आहे अवश्यचि ॥ कोणी जाणे ॥ १ ॥
दुष्टज्ञानबंड ॥ माजुनि देशांत
प्रार्थनेचा लोप ॥ देशीं झाला ॥ २ ॥
राष्ट्रीयप्रार्थना ॥ केलें म्यां पुस्तक
राष्ट्राचा उद्धार ॥ होण्यासाठीं ॥ ३ ॥
शालीवाहन शक ॥ अठराशें सव्वीस
या वर्षी पुस्तक ॥ रचीयेलें ॥ ४ ॥
सुजनातें फार ॥ आवडलें चित्तीं
टवाळी करीती ॥ खळ दुर्जन ॥ ५ ॥

दुर्जन जातील ॥ हळू हळू काळें
परि यांचीं बाळें ॥ सुधीं असूत ॥ ६ ॥

---

## स्वतःसंबंधीं.

### अभंग.

( राष्ट्रीय सनातनधर्मपुस्तक. )

जनासि धर्माचें ॥ ठामज्ञान नाहीं
राष्ट्रचित्तीं पाहीं ॥ बहु घोंटाळा ॥ १ ॥
ह्मणुनियां लिहिले ॥ शंभर सिद्धांत
दशवर्षें सतत ॥ खपूनीयां ॥ २ ॥
सनातनधर्म ॥ राष्ट्रीय पुस्तक
खपूनीयां फार ॥ लिहीयेलें ॥ ३ ॥
शंभर सिद्धांत ॥ राष्ट्रीयप्रार्थना
राष्ट्रसंस्थापना ॥ सृष्टिबोध ॥ ४ ॥
चार प्रकरणें ॥ करुनी एकत्र
धर्माचें पुस्तक ॥ राष्ट्रा दिलें ॥ ५ ॥

शालीवाहन शक ॥ अठराशें सव्वीस
तेव्हां हें पुस्तक ॥ रचीयेलें ॥ ६ ॥
पुस्तक सुमन ॥ देवासि अर्पिलें
मन शांत झालें ॥ तेणें गुणें ॥ ७ ॥
जगदीशकृपा ॥ रक्षू या पुस्तका
होवो सर्व लोकां ॥ तारक हें ॥ ८ ॥

---

## स्वतःविषयीं.

### अभंग.

( स्वदेशाभिमान संजीवन पुस्तक )
( मुलांचा स्वदेशाभिमान पुस्तक )
( स्त्रियांचा स्वदेशाभिमान पुस्तक )

शालीवाहन शक ॥ अठराशें सत्तावीस
त्यांत वैशाखमास ॥ तेव्हां रचिलें ॥ १ ॥
स्वदेशाभिमानसंजीवन पुस्तक
प्रौढ जनाप्रति ॥ संबोधोनी ॥ २ ॥

पुढील महिन्यांत ॥ ह्मणजे ज्येष्ठमासीं
आणिक दोन केलीं ॥ म्यां पुस्तकें ॥ ३ ॥

मुलांचा स्वदेशाभिमान हें एक
मुलां आवडत ॥ फार असे ॥ ४ ॥

स्त्रियांचा स्वदेशाभिमान हें दुजें
पुस्तक लिहिलें ॥ स्त्रियांसाठीं ॥ ५ ॥

---

## स्वतःविषयीं.

### अभंग.

( द्वितीयविवाह न करणेचा निश्चय. )

सव्विसाव्या वर्षी ॥ ऐन तारुण्यांत
दैवें झाला घात ॥ कांता मेली ॥ १ ॥

दुसरा विवाह ॥ करणें वर्जिलें
कां तुज ठाउकें ॥ हृषीकेशा ॥ २ ॥

शुद्ध हेतु थोर ॥ धरिला हृदयांत
ह्मणुनियां सुख ॥ टाकीयेलें ॥ ३ ॥

आप्तमित्र मज ॥ आग्रह करीती
संबंध ह्मणति ॥ करी तुजा ॥ ४ ॥
मनाच्या निग्रहें ॥ विषतुल्य दुःख
प्रतिदिन होत ॥ हेंहि खरें ॥ ५ ॥
या सर्व दुःखांत ॥ ध्यान तुझें देवा
एकचि विसावा ॥ जिवालागीं ॥ ६ ॥
सांभाळीं साभाळीं ॥ सर्व दुःखांमध्यें
सर्व मोहांमध्यें ॥ रक्षीं मज ॥ ७ ॥
तुझा भक्त ह्मणवीं ॥ मज शुद्ध ठेवीं
पुढती भेटवीं ॥ मज कांता ॥ ८ ॥

---

## स्वतःविषयीं.

### अभंग.

( दुर्जन शत्रूंस उद्देशून. )

अपराध नसतां ॥ शत्रू मज होती
माझे हाल करिती ॥ दुष्टपणें ॥ १ ॥

दुर्जन बाहेरी ॥ छळितात मज
माझे पूर्वदोष ॥ उभे ठेले ॥ २ ॥

माझे पूर्वदोष ॥ दुर्जनांच्या रूपें
दुःखदायी विघ्नें ॥ भाग्या होती ॥ ३ ॥

अंतरीं मजला ॥ छळिती दुरिच्छा
नानापरी क्लेशां ॥ अनुभविती ॥ ४ ॥

दुरिच्छा दमन ॥ आहे अमृतपान
अंतरात्मा खूण ॥ बोलतसे ॥ ५ ॥

दमन हें वाढे ॥ मना विषपान
आत्मा आणि मन ॥ झुंजताति ॥ ६ ॥

मन हें गाफिल ॥ इंद्रियां फितूर
दगा देई थोर ॥ मम हिता ॥ ७ ॥

मम अंतरात्मा ॥ मनासि भांडतो
दोष त्यासि देतो ॥ पुनः पुनः ॥ ८ ॥

ज्याचें मन त्याशीं ॥ शत्रुत्वानें वागे
कैसा रिपूंसंगें ॥ झगडे तो ॥ ९ ॥

बाह्य रिपूसंगें ॥ लढण्यासि बळ
कैसें त्या येईल ॥ दुश्चित्तासी ॥ १० ॥

---

## स्वतःसंबंधी.

### ( मनाचे दोषांस उद्देशून. )

जगदीशा दुःखें ॥ गांजलों पोळलों
वायां गेलों गेलों ॥ तारीं मातें ॥ ११ ॥
मम मनदोष ॥ मम इंद्रियदोष
मम तनु दोष ॥ नष्ट करीं ॥ १२ ॥
मन इंद्रियगण ॥ आणि तनु मम
सदा शुद्ध पूर्ण ॥ नाथा राखीं ॥ १३ ॥
सर्वकाल शुद्ध ॥ राखूनीयां यांतें
मज अभाग्यातें ॥ भाग्य देईं ॥ १४ ॥
कृपा करीं बाह्यशत्रू जे जे होती
त्यांसि जगत्पति ॥ करीं मित्र ॥ १५ ॥

---

## स्वत:संबंधी.

### ( आकांक्षेस उद्देशून. )

### अभंग.

पुण्यानें निर्बळ ॥ कर्तृत्वें निर्बळ
यशानें निर्बळ ॥ अभागी मी ॥ १ ॥
अशा अभाग्यातें ॥ आकांक्षा भाग्याची
नवल मजचि ॥ फार वाटे ॥ २ ॥
आकांक्षा आत्म्याची ॥ पतिव्रता पत्नी
जन्मजन्मीं त्यासि ॥ न सोडीच ॥ ३ ॥
देहवती पत्नी ॥ जीशीं झाली गांठ
जिनें धरिली वाट ॥ परलोका ॥ ४ ॥
काय ती आकांक्षा ॥ होती मूर्तीमंत
आतां पुन्हां गुप्त ॥ जाहालीसे ॥ ५ ॥
देहरूपें तरि ॥ गुप्त होवोनियां
चित्तीं बैसोनियां ॥ राहताहे ॥ ६ ॥
आकांक्षा या बहुपरिच्या असती
त्यांत कांहीं होती ॥ सत्यवंती ॥ ७ ॥

माझी आकांक्षा तों ॥ सत्यवंती आहे
यास साक्षी आहे ॥ जगदात्मा ॥ ८ ॥

राष्ट्रासहित माझी ॥ पुण्याई वाढावी
अखंड असावी ॥ भाग्यवृद्धी ॥ ९ ॥

ऐशी ही आकांक्षा ॥ सत्यवंती पत्नी
जिवाची प्रियकरिणी ॥ कां न व्हावी ॥ १० ॥

आकांक्षे मी तुज ॥ प्रामाणिक आहें
तुजसाठीं वाहें ॥ फार कष्ट ॥ ११ ॥

प्रेमानें तूं माझे ॥ कष्ट सांवरीशी
प्रतिदिनीं देशी ॥ धैर्यबळ ॥ १२ ॥

धैर्यबळ देशी ॥ अमृताचें पान
प्रेमें तुझे गुण ॥ वर्णू किती ॥ १३ ॥

विनयी वनिता ॥ शुद्ध पतिव्रता
अवश्य निजकांता ॥ प्राणप्रिया ॥ १४ ॥

प्राणप्रिय मम ॥ जिवा तूं झालीस
प्रेम हरीलेंस ॥ तूं आकांक्षे ॥ १५ ॥

जन्म जन्मीं तुझी ॥ गांठी मज आहे
आकांक्षे तूं राहें ॥ स्वस्थचित्त ॥ १६ ॥
संतुष्ट परस्पर ॥ तुह्मीं आह्मीं राहूं
जगदीशातें ध्याऊं ॥ भाग्यासाठीं ॥ १७ ॥

---

## जगत्कर्त्याशीं भाषणें.

( स्वतःविषयीं. )

**अभंग.**

(१)

दुर्दैवी प्राणी मी ॥ दुःखें भोगीताहें
फळा येत आहे ॥ पूर्वपाप ॥ १ ॥
जगन्नाथा ऐशा ॥ आपदांमध्यें मीं
शुद्ध राखीं स्वामी ॥ मज आतां ॥ २ ॥
आतां शुद्ध जरि ॥ असें तरि पुढें
इष्ट शुभसुखें ॥ मिळतील ॥ ३ ॥

मन हें दुर्बळ ॥ पापें करूं पाहे
आवरितां होय ॥ फार कष्टी ॥ ४ ॥
मन दुर्बलत्व ॥ हें गेलें पाहिजे
कृपा तुवां कीजे ॥ जगन्नाथा ॥ ५ ॥
मनाचें चांचल्य ॥ मनाचें दौर्बल्य
मोडोनि मज नित्य ॥ शुद्ध ठेवा ॥ ६ ॥

(२)

अधांतरीं जरी ॥ ग्रह चालविसी
कां न चित्ता देशी ॥ धैर्यतोल ॥ १ ॥
प्रचंड ग्रहमाला ॥ नियमें वर्तवीसी
माझ्या मनवृत्तींसी ॥ नियम द्यावा ॥ २ ॥
कैसा तुज भजूं ॥ काय नेम करूं
ह्मणजे कृपाळू ॥ तूं होशील ॥ ३ ॥
मागील दोषांचीं ॥ फळें भोगीताहें
ऐसें असूनि आहें ॥ चित्तदोषी ॥ ४ ॥
दुःखें भोगूनियां ॥ जर्जर जाहलों
परि शुद्ध न झालों ॥ चित्तामध्यें ॥ ५ ॥

चित्तदोष असती ॥ भावी दुःखबीज
यांचा कैसा नाश ॥ म्यां करावा ॥ ६ ॥

विवेक ज्याठायीं ॥ पंगू पडताहे
तेथें शूर आहे ॥ कर तूझा ॥ ७ ॥

तुझा कृपाकर ॥ शिरीं मम ठेवीं
प्रार्थना पुरवीं ॥ विश्वनाथा ॥ ८ ॥

---

# जगत्कर्त्याशीं भाषणें.

## ( स्वतःविषयीं. )

### अभंग.

( १ )

करिं जीवाची ॥ गांठोडी ॥
नैवेद्यासि ॥ देइ पुडी ॥ १ ॥

सर्व तपांचा ॥ तूं भोक्ता ॥
भज पावें ॥ विश्वनाथा ॥ २ ॥

माझें मन ॥ आणि इंद्रियें ॥
यांचे दोष ॥ संहरावे ॥ ३ ॥
संहारीं बा ॥ सर्व दोष ॥
ठेवूं नको ॥ विषशेष ॥ ४ ॥

(२)

सत्य सत्य सत्य ॥ तूं सर्वसमर्थ ॥
सत्य सत्य सत्य ॥ दयाळू तूं ॥ १ ॥
सत्य सत्य सत्य ॥ तूं भक्तवत्सल ॥
सत्य सत्य सत्य ॥ पावन तूं ॥ २ ॥
सत्य सत्य सत्य ॥ शरणागत त्राता ॥
आहेसि तूं नाथा ॥ संत साक्षी ॥ ३ ॥
संत साक्षी करुनी ॥ तुज निमंत्रितों ॥
तुजला अर्पितों ॥ जीवपुष्प ॥ ४ ॥
जीवपुष्प तुज ॥ प्रेमानें अर्पिलें ॥
पाहिजे ठेविलें ॥ प्रेमकरीं ॥ ५ ॥
अवमानिसि तरी ॥ होईल सत्यभंग ॥
याची तुज लाज ॥ विश्वनाथा ॥ ६ ॥

तुझें शील संतीं ॥ वर्णूनि ठेविलें ॥
संकट घातलें ॥ ह्मणुनि तूतें ॥ ७ ॥

तुजला दिधला ॥ हवाला जीवाचा ॥
विचार पुढचा ॥ तूंच पाहीं ॥ ८ ॥

अपुल्या ब्रीदाचा ॥ विचार तूं पाहीं ॥
जरि मी दोषी होईं ॥ लज्जा तुज ॥ ९ ॥

तुझी लज्जा विश्व ॥ व्यापुनी भरली ॥
तुवां सांभाळिली ॥ पाहिजे ती ॥ १० ॥

निर्धारें तुजसी ॥ जीव हा अर्पिला ॥
हवाला दीधला ॥ तुजकडे ॥ ११ ॥

आतां पुन्हां दोष ॥ मजकरवीं होतां ॥
उद्विग्नता चित्ता ॥ येईल माझ्या ॥ १२ ॥

भक्त झाले त्यांसि ॥ उद्विग्न न करिशी ॥
हें ब्रीद आह्मांसि ॥ तुझें ठावें ॥ १३ ॥

विश्वासुनि तुज ॥ जीव हा अर्पिला ॥
तुवां सांभाळिला ॥ पाहिजे कीं ॥ १४ ॥

( ३ )

देशसेवेसाठीं ॥ करीं आटाआटी
कां धन मम गांठी ॥ असों नये ॥ १ ॥
धन जवळी असतां ॥ करीन न्यायपरता
ऐसी माझी चिंता ॥ वाहासी काय ॥ २ ॥
विश्वनाथा ऐशी ॥ कांरे चिंता वाहसी
काय भीति तुसि ॥ पडलीसे ॥ ३ ॥
मज सधन करणें ॥ न्यायींहि ठेवणें
अशक्य काय हें ॥ तुला आहे ॥ ४ ॥
कीं ऐसा विचार ॥ निर्धन ठेवितां
होईल हा कर्ता ॥ उद्योगानें ॥ ५ ॥
निर्धनता ज्यासि ॥ उद्योग तयासि
अवश्य जिण्यासि ॥ पाहिजे तो ॥ ६ ॥
उद्योगी नसावें ॥ तरि वृथा जावें
उद्योगानें व्हावें ॥ कांहीं सुखी ॥ ७ ॥
उद्योगही सर्व ॥ सफल न व्हावा
कांहीं वायां जावा ॥ पाप फेडी ॥ ८ ॥

पूर्वपाप फेडी ॥ उद्योगांनीं व्हावी
कांहीं सिद्धी यावी ॥ आतां हाता ॥ ९ ॥
कांहीं उद्योग ते ॥ अफलसे व्हावे
पुढती पापावे ॥ पुण्यरूपें ॥ १० ॥
अशी काय तुझ्या ॥ अंतरीं योजना
दारिद्र्ययातना ॥ ह्मणुनी देशी ॥ ११ ॥

( ४ )

कांहीं हेतु माझे ॥ अपेशें मोडले
कांहीं नष्ट केलें ॥ दारिद्र्यानें ॥ १ ॥
कांहीं चूर्ण केले ॥ पत्नीच्या निधनें
शत्रूंनीं चुरडीले ॥ कांहींएक ॥ २ ॥
कांहींएक माझ्या ॥ दोषांनीं भंगिले
प्रतिकूल काळें ॥ कांहींएक ॥ ३ ॥
वादळें करीती ॥ नौकेचीं शकलें
तैसें माझें जिणें ॥ असे झालें ॥ ४ ॥
अशा या नौकेंत ॥ हा जीव प्रवासि
सुभाग्यदेशासि ॥ कैसा पावेल ॥ ५ ॥

परी तुझी सत्ता ॥ काय न करील
बुडत्या भेटवील ॥ कृपानौका ॥ ६ ॥
कृपानौका तुझी ॥ बुडत्या भेटुनि
त्यासि संरक्षुनी ॥ भय हरील ॥ ७ ॥
भय हरील त्याचें ॥ उत्साह देईल
त्यासि पोंचवील ॥ इष्टदेशा ॥ ८ ॥
तुझी कृपा मज ॥ संरक्षील आतां
ही दृढ ममचित्ता ॥ आशा आहे ॥ ९ ॥
आशा माझी ऐशी ॥ पुरवीं कृपागारा
दुःखाब्धीच्या पारा ॥ मज नेई ॥ १० ॥
दुःखाब्धीच्या पारा ॥ तूं मज नेशील
कृतार्थ करिशील ॥ कृपाळू तूं ॥ ११ ॥

( ५ )

आपत्तीचीं पुढें ॥ सैन्यें उभीं ठेलीं
सुखाची रोधली ॥ वाट तींहीं ॥ १ ॥
सैन्यें फोडूनीयां ॥ नीट जाणें पुढें
काय हें सोपारें ॥ दुर्बळांसि ॥ २ ॥

जरी त्यां समर्थ ॥ पाठीशीं घालील
शक्य त्यां होईल ॥ पुढें जाणें ॥ ३ ॥
तैसी माझी स्थिति ॥ झालीसे समर्था
काय तूं अनंता ॥ न जाणासि ॥ ४ ॥
आतां तुज पुढें ॥ करूनि चालेन
संकटांचें चूर्ण ॥ तूंच करीं ॥ ५ ॥

( ६ )

जीव दिला तुझे ॥ हातीं नम्रपणें
मज तेणें झालें ॥ सुख फार ॥ १ ॥
उन्हानें तापला ॥ जैसा स्नान करी
तैसें मज होई ॥ दुःखतप्ता ॥ २ ॥
आतां मज दृढ ॥ हातीं धरीं बापा
शुद्ध रम्य सोपा ॥ मार्ग दावीं ॥ ३ ॥
ऐशिया मार्गानें ॥ मज भाग्या नेईं
हेतु माझे पुरवीं ॥ जगदंबे ॥ ४ ॥
विश्वाचा तूं बाप ॥ विश्वाची तूं अंबा
तूझी आज्ञा सर्वां ॥ शिरसावंद्य ॥ ५ ॥

माझीं सर्व ऋणें ॥ पापें भयें दुःखें
मोहांचीं संकटें ॥ निरसावीं ॥ ६ ॥
तयांपासुनीयां ॥ मजला सोडवा
सदा सुखी ठेवा ॥ संरक्षूनी ॥ ७ ॥
संरक्षूनीं मज ॥ अशुभांपासुनी
कर्तव्याचरणीं ॥ धैर्य द्यावें ॥ ८ ॥
शुद्ध धैर्य द्यावें ॥ शुद्ध पुण्य व्हावें
शुद्ध यश यावें ॥ मज नित्य ॥ ९ ॥
शुद्ध मनोगतें ॥ माझे मनीं ठेवीं
सफलता द्यावी ॥ सदा त्यांसि ॥ १० ॥

( ७ )

जगाचा आटोप ॥ तुवां पसरीला
आह्मांसी तो झाला ॥ भीतिप्रद ॥ १ ॥
ह्मणुनि तुज आलों ॥ शरणागत आह्मीं
आह्मांसि रक्षुनी ॥ अभय द्यावें ॥ २ ॥
आहों दोषी आह्मी ॥ क्षुद्र मर्त्यप्राणी
तारक तूं ह्मणुनी ॥ प्रार्थूं तूतें ॥ ३ ॥

जगच्चालकाहो ॥ अमुतें शुद्ध ठेवा
कृपेचा कर द्यावा ॥ आह्मांकरीं ॥ ४ ॥
कृपाकरें आह्मां ॥ सांवरा सांवरा
सर्वेश्वरा तारा ॥ दीना आह्मां ॥ ५ ॥

(८)

जें जें पाहावें तें ॥ तुवां निर्मीयेलें ॥
काय तुज द्यावें ॥ विश्वनाथा ॥ १ ॥
तुझेंचि तुजला ॥ देणें हें नवल ॥
कैसा पूज्यभाव ॥ तुज दावूं ॥ २ ॥
जीवभाव तोहि ॥ तुवांच दीधला ॥
उपचार उरला ॥ न दिसे कांहीं ॥ ३ ॥
स्थिति ऐसी झाली ॥ संभ्रमें मनाची ॥
आतां पूजा तुझी ॥ कैसी करूं ॥ ४ ॥
बापाचिया वस्तु ॥ मूल देई त्यासि ॥
तैसें काय तुजशीं ॥ करूं नातें ॥ ५ ॥
बापासि मुलाची ॥ प्रीति फार प्रिय ॥
काय देऊं तुज ॥ जीव प्रेम ॥ ६ ॥

अव्यक्त तूं नाहीं ॥ बोलत मजशीं ॥
आतां मच्चित्तासी ॥ मार्ग दावीं ॥ ७ ॥

(९)

काय ह्मणूनीयां ॥ दुष्टस्वप्न पाहें ॥
काय होईल खरें ॥ पाहिलें तें ॥ १ ॥
जरी त्याचें फळ ॥ नाहींच कांहींहि ॥
कां तें आलें तरी ॥ स्वप्नभेटी ॥ २ ॥
स्मृति त्या स्वप्नाची ॥ भय उपजवीते ॥
चिंता करुनी होतें ॥ मन कष्टी ॥ ३ ॥
आतां तुझें ध्यान ॥ अनंत सुंदर ॥
श्याम मनोहर ॥ सनातन ॥ ४ ॥
नम्र शुद्ध चित्तें ॥ करीन प्रेमानें
निरसेल तेणें ॥ सर्व भय ॥ ५ ॥
जगाच्या चालका ॥ संरक्षीं संरक्षीं
सर्व भयांतुनी ॥ पार पाडीं ॥ ६ ॥
क्षण क्षण माझें ॥ वाढेल मंगल
ऐशी कृति विमल ॥ होवो माझी ॥ ७ ॥

(१०)

मंगलांचें ॥ तूं मंदिर
मज देईं ॥ मंगलवर ॥ १ ॥

अमंगळें जीं ॥ मजमध्यें
त्यांसि हरुनि ॥ दे मंगलें ॥ २ ॥

शुद्धतेचें ॥ तूं निधान
मज ठेवीं ॥ शुद्ध पूर्ण ॥ ३ ॥

सत्तेचें तूं ॥ परंधाम
मज देईं ॥ सत्ताधाम ॥ ४ ॥

आनंदाचा ॥ तूं आश्रय
मज देईं ॥ शुद्धानंद ॥ ५ ॥

# परलोकवासिनी पत्नी जवळ आहे असें कल्पून.

## सूर्यास्तसमय.

( १ )

### साकी.

सरस्वती प्रियपत्नी स्मरुंया
अंतरिं जगदीशातें
अतर्क्य जगती निर्मुनि पाळी
सदा दक्ष ऐशातें ॥ १ ॥
दिनान्त पाहा किती रम्य हा
सकलां श्रमपरिहारी
सौम्य किरण हे रविचे होती
श्रांतांचे कैवारी ॥ २ ॥
अशा वेळीं या सहजचि होते
स्मृति सृष्टीकर्त्यांची
आपुल्या राष्ट्रासाठीं प्रार्थूं
नित्य कृपा ईशाची ॥ ३ ॥

## मजूल वायू.

### ( २ )

मंजुल वायू तव कर तैसा
सुख दे माझ्या देहा
नकळे कैसा दुःख हरितो
समजेना प्रभुलीला ॥ १
प्रेमस्पर्शामध्यें जयानें
अमृतगुण ठेवीले
काय तयानें वायुतरंगां
तेचि गुण दीधले ॥ २ ॥
कीं हा वायू शिकवी आह्मां
शुद्धसुखदप्रीति
प्रीती पाहा सृष्टिंत भरली
सकलां सौख्य दे ती ॥ ३॥
मम यौवनभर असतां कांते
गेलिस तूं परलोका

पूर्वदोषकृति तव विरहाच्या
देती ऐशा दुःखा ॥ ४ ॥
जीव आपले शाश्वत असती
विरहान्तीं आह्मि भेटूं
रम्यदिनान्तीं ऐशा बसुनि
प्रेमें गोष्टी बोलूं ॥ ५ ॥

---

बाग.

( ३ )

अति रमणीय या बागेची
शोभा मन रिझवीते
जैशी स्मृति तव वदनस्मिताची
चित्तातें सुखवीते ॥ १ ॥
मूर्तीमती तुज कल्पुनि जवळी
प्रेमें तुजशीं बोलें
उपवन शोभा अधिक रम्य कीं
स्मित तव मजला सांगें ॥ २ ॥

तुझ्या मुखातें जेणें दिधली
शोभा रम्य स्मिताची
त्याच ईश्वरें केली सृष्टी
मूर्ती सौंदर्याची ॥ ३ ॥

अपराधी मी जगदीशाचा
ह्मणुनि दंडितो मातें
त्याची शिक्षा सरतां पुनरपि
काय भेटविल तूतें ॥ ४ ॥

तव अप्रिय जें असेल केलें
कांते विसरुनि जावें
जगदीशातें अपुल्या भेटी—
साठीं त्वां विनवावें ॥ ५ ॥

सुखें बसूंया बागेमध्यें
पुनरपि होतां भेटी
स्मृती मागचि नसेल ह्मणुनि
होतें मन्मन दुःखी ॥ ६ ॥

---

# परलोकवासिनी पत्नीस उद्देशून शोक.

## विद्युन्माला.

प्रियकर कांता स्वर्गी गेली
काय पापें पूर्वी केलीं ॥
जरि आतांहि पापें झालीं
भावि सुखाशा सर्व बुडाली ॥ १ ॥
आतां स्मरणामध्यें कांता
नाहीं गृहसौख्याची वार्ता ॥
प्रेत सजीव मम तनु आतां
नेइल केव्हां विश्वनिहंता ॥ २ ॥
निधनापूर्वी पत्नी बोललि
अंतघटिका समीप आली ॥
सर्व सुखाशा नष्ट जाहली
यमराजाची चिठ्ठी आली ॥ ३ ॥
मी गेल्यावरि कैसें होईल
नेत्रीं अपुल्या पाणी येईल

बोलें मी तव स्मृति धृति देईल
जोंवरि जीव तनूसह राहील ॥ ४ ॥
प्रियकरि स्वर्गी सुखें राहावें
मम शीलातें संरक्षावें ॥
अंतीं मज नेण्यासि यावें
तोंवरि स्वप्नीं मज भेटावें ॥ ५ ॥

---

## परलोकवासिनी कन्या कृष्णाबाई हिला उद्देशून.

### अभंग.

एक अपत्य मज ॥ कृष्णे तूं झालीस
स्वर्गी तूं गेलीस ॥ अल्पकालें ॥ १ ॥
वर्ष वय होतां ॥ तुवां त्याजियेलें
पुढती वर्षानें ॥ पत्नी जाय ॥ २ ॥
दुःखपरंपरा ॥ आली मम दैवीं
पूर्वदोषकरणी ॥ फळा आली ॥ ३ ॥

---

# परलोकवासिनी पत्नीस उद्देशून शोक.

## अंजनीगीत.

स्वर्गी गेलिस मजला त्यजुनी
प्रेमसुखाचा अनुभव दाउनि
वियोग तूझा ऐन यौवनीं
कैसा मी सोसूं ॥ १ ॥

प्रेम तुझें जरि उत्तम नसतें
दुसरें लग्न केलें असतें
बोलुं शकेना स्मृति तव देते
सुख वा दुःख अतां ॥ २ ॥

लग्न दुजें तरि करणें नाहीं
तारुण्याची पीडा होई
तेव्हां सुखिजन दुसरे पाहीं
दुःखें मन झुरतें ॥ ३ ॥

विवेक वारंवार करितसें
पुनरपि अंतर मलिन होतसे

पाहुनि स्थिति मम काय येतसे
भाव तुझ्या हृदयीं ॥ ४ ॥

लोकांतरिं तूं गेली नसतिस
सदेह मजपाशीं असतीस
मूर्ती तूझी मम हृदयास
होती पुण्यझरा ॥ ५ ॥

आतां स्मृतिमात्रें तूं भेटसि
अथवा कधिं कधिं स्वप्नीं येसी
मलीन मन मम पाहुनि होशी
खचिताचि तूं दुःखी ॥ ६ ॥

जरी शरीरें शुद्ध राहिलों
परि चित्तानें मलीन झालों
नाहीं कां मीं अपात्र ठरलों
तव शुद्ध प्रेमा ॥ ७ ॥

अवगुण हा तों मजला कळतो
परि दुःखाचा वेग न सहतो

विवेक मोडुनि बलिष्ट होतो
  चित्त पापमोह ॥ ८ ॥

अशुद्ध अंतःकरणें होईं
  तितुक्यामध्यें तवस्मृति येई
वाटे कीं तुज दुःखी पाहीं
  अपराधें माझ्या ॥ ९ ॥

कांते मजला क्षमा करावी
  दीनस्थिति मम लक्ष्यीं घ्यावी
मजकरितां तूं भक्ति करावी
  जगच्चालकाची ॥ १० ॥

स्वर्गीं जे तव पालक असती
  त्यांतें सांगें मम दुःखस्थिति
माझ्यासाठीं नित्य विनंती
  करिं त्या दिव्यजना ॥ ११ ॥

मागें मजसाठीं निर्मलता
  देहीं नेत्रीं तैशी चित्ता

केवल स्मृति तव मज विरहार्ता
    शुद्ध सुखद होवो ॥ १२ ॥

अमरलोकगत प्रियकर पत्नी
    अमरांतें मजसाठीं प्रार्थी
मजला व्हावी उत्तम भक्ती
    जगच्चालकाची ॥ १३ ॥

देवदेवतांतें प्रार्थी
    मजला व्हावी स्वदेशभक्ति
सत्यकार्यीं निर्मल कीर्ती
    मजला नित्य मिळो ॥ १४ ॥

प्रियकरि प्रार्थी माझ्यासाठीं
    असो चित्तीं तुजशीं ममगांठीं
भिन्न लोकीं राहुं तथापि
    जीव एक असो ॥ १५ ॥

प्रिये सरस्वति स्वर्गीं राहुनि
    काळजी घेईं माझी निशिदिनिं

दक्ष रहा मम भाग्यरक्षणीं
ईशप्रार्थनेनें ॥ १६ ॥

स्वर्गांच्या नियमांतें पाळुनि
समाधानचित्तानें असुनि
सांभाळीं मज संनिध राहुनि
जरि न दिससि मला ॥ १७ ॥

विवाहकालीं तुजला दयिते
**सरस्वती** हे नांव ठेविलें
दुजें नांव मग प्रेमें दिधलें
तुज विजया ऐसें ॥ १८ ॥

प्रियकरि तूझें शील पाहिलें
ह्मणुनि **विजया** नाम ठेविलें
त्याचें स्वर्गी सार्थक केलें
तुवां पाहिजे कीं ॥ १९ ॥

सदा जगदीशातें प्रार्थी
विजये माझ्या भाग्यासाठीं

विजयरूप मी वसुनी जगतीं
सुखवावी पुण्यें ॥ २० ॥

---

## परमेश्वरभेट.

अमृतवपु तो अनंत आत्मा
त्यातें भेटी लीनपणें ॥
क्षणमपि होतां दुःख हरोनी
आनंदाचें ये भरतें ॥ १ ॥
दया तयाची न्याय तयाचा
स्मरतां हृदयीं हर्ष भरे ॥
दुःखी पापी असती त्यांतें
अमल सुखाशा मनिं उपजे ॥ २ ॥
तळमळ हळहळ जाय जिवाची
जीव होतो गार सुखें ॥
जनहो प्रत्यहिं अमृत घ्या हें
स्वर्गी देवां जें प्रिय तें

---

# शेवटीं जगत्कर्त्यालाच गुरु केला.

## अभंग.

जगदीशा मज ॥ तूंचि सत्य गुरु
तूं मज आधारु ॥ ज्ञानासाठीं ॥ १ ॥

गुरु ह्मणविणारे ॥ श्रद्धेनें पाहिले
परि न मिळालें ॥ समाधान ॥ २ ॥

जया व्हावें सोनें ॥ तया हीण दिलें
कैसें होइल तेणें ॥ समाधान ॥ ३ ॥

व्यर्थ कष्ट केले ॥ अपमान सोशिले
अनुभव घेतले ॥ नानापरि ॥ ४ ॥

नानापरि दुःख–अनुभव घेतले
निदानीं कल्पिलें ॥ तुज गुरु ॥ ५ ॥

तूंच सत्यगुरु ॥ जगाच्या कारणा
पूर्ण समाधाना ॥ तूंचि दिलें ॥ ६ ॥

## ईश्वरास मनोवृत्ति अर्पिल्या.

### अभंग.

मनोवृत्तिफुलें ॥ प्रेमानें गुंफिलीं
माला समर्पीली ॥ ईश्वरातें ॥ १ ॥

माला ईश्वरानें ॥ हृदयीं धरीली
हींच मज झाली ॥ कृतकृत्यता ॥ २ ॥

दुष्टइच्छा आतां ॥ मावळुनि गेल्या
उदय पावल्या ॥ शुद्धवृत्ति ॥ ३ ॥

शुद्धवृत्तीतारा ॥ मनगगनीं आल्या
त्याचि कविता झाल्या ॥ अभंगांत ॥ ४ ॥

---

## ईश्वरास कविता अर्पिल्या.

### अभंग.

कविता लिहील्या ॥ आहेंहि लिहित
लिहिन तशाच ॥ ज्या पुढती ॥ १ ॥

जगदीशा कल्पीं ॥ सुमनाच्या माळा
प्रथम त्या घ्याव्या ॥ अपुल्याकंठीं ॥ २ ॥

तुवां कंठीं धरिल्या ॥ ज्या ज्या सुमनमाळा
त्या त्या सर्व इतरां ॥ होती वंद्य ॥ ३ ॥

---

# ईशकृपा व समाधानप्राप्ति.

## अभंग.

सुरक्षित पेढी ॥ जगाच्या पुण्याची
तुझी भक्ति साची ॥ जगन्नाथा ॥ १ ॥

शुद्धहेतुधन ॥ तेथें रुजू केलें
तेणें जिवा झालें ॥ समाधान ॥ २ ॥

समाधानव्याज ॥ अखंड मिळतें
मुद्दल आहे तें ॥ अढळचि ॥ ३ ॥

व्यर्थ कां करावी ॥ चिंता सुखासाठीं
अशी ही सुखाची ॥ सोय असतां ॥ ४ ॥

---

# ईशकृपा–आनंदप्राप्ति

## अभंग.

आनंदी आनंद ॥ जग हें आनंद
ह्मणति पुण्यमंद ॥ दुःख आहे ॥ १ ॥

मीहि बहुवेळां ॥ पूर्वीं ह्मणीतलें
आतां न या वेळे ॥ तैसें ह्मणें ॥ २ ॥

कारण या तरि ॥ असे तुझी कृपा
तुवां मार्ग सोपा ॥ सुखा केला ॥ ३ ॥

तव कृपाबळें ॥ दुःख तें भंगलें
सुख हें वर्षलें ॥ जिवावरि ॥ ४ ॥

जिवावरि सुख ॥ यथेच्छ वर्षलें
तेंच हें वाहलें ॥ अभंगांत ॥ ५ ॥

---

# अखंड आनंदस्थितीसाठीं प्रार्थना

## अभंग.

अनुभवीं स्थिति ॥ आतांचिया क्षणीं
तीच सुखखाणी ॥ राहो सदा ॥ १ ॥
आतां वाटे पूर्वतळमळ स्वप्न
सद्यस्थिति हीच ॥ पुढें असो ॥ २ ॥
मनाचें जें सुख ॥ आतां घेत आहें
अखंड मज द्यावें ॥ जगन्नाथा ॥ ३ ॥

---

# आशियाचे उन्नतीसाठीं झटण्याविषयीं दृष्टान्त.

## अभंग.

जगदीशा तुशीं ॥ प्रेमभावें बोलें
उत्तर दीधलें ॥ पाहिजे कीं ॥ १ ॥
दृष्टान्तीं दाविशी ॥ मजला जें गुज
कां त्याचा प्रत्यय ॥ अजुनी नाहीं ॥ २ ॥

कोठें ते दुसरे ॥ माझे साह्यकारी
किंवा जन्मांतरीं ॥ भेट त्यांची ॥ ३ ॥

आशिया आमुचें ॥ प्रिय जन्मखंड
त्यासाठीं उदंड ॥ श्रम घेणें ॥ ४ ॥

उचित शिक्षण ॥ जनाप्रति देणें
उन्नति साधणें ॥ आशियाची ॥ ५ ॥

श्रमान्तीं उत्तम ॥ यश प्राप्ति येणें
हें सर्व तव देणें ॥ कृपागारा ॥ ६ ॥

दृष्टान्तीं दाविसी ॥ प्रत्यक्ष कधिं देशी
तोंवरी काळासि ॥ कैसा काढूं ॥ ७ ॥

परिस्थिति तरि ॥ निराशेची दिसे
जे मित्र व्हावे ते ॥ शत्रु होती ॥ ८ ॥

ज्यांच्यासाठीं सर्व ॥ कष्ट श्रम घेणें
त्यांनीं शत्रु होणें ॥ नवल मोठें ॥ ९ ॥

नवल मोठें माझा ॥ छळ हे करिती
कैसे न जाणती ॥ माझा भाव ॥ १० ॥

मत्सरें छळित ॥ मजला बांधव
कर्तव्य व्यवसाय ॥ करूं कैसा ॥ ११ ॥

पदोपदीं माझे ॥ उद्योगाचे पाय
तोडण्याची सोय ॥ रिपु पाहाती ॥ १२ ॥

अशा या स्थितींत ॥ जगूं तरि कैसा
आशियासाठीं कैसा ॥ कष्ट घेऊं ॥ १३ ॥

आज्ञापीं मजला ॥ स्वस्थ मी राहावें
नाहीं तरि द्यावें ॥ मित्रबल ॥ १४ ॥

जे जे शत्रु असती ॥ उदास जे असती
त्यांतें जगत्पति ॥ करीं मित्र ॥ १५ ॥

देऊनीयां मित्र ॥ सदा संरक्षावें
कर्तव्य करुनि घ्यावें ॥ सत्य मार्गें ॥ १६ ॥

आशिया-उन्नति ॥ आमच्याकडूनि
सन्मार्गीं सेवुनि ॥ करुनि घ्यावी ॥ १७ ॥

## मूढ आक्षेपकांस उद्देशून.

### अभंग.

( १ )

महाराष्ट्रासाठीं ॥ प्रार्थी विश्वनाथा
घेताति आक्षेपां ॥ ह्मणुनी कोणी ॥ १ ॥
ह्मणति महाराष्ट्र ॥ आर्यावर्तभाग
चित्तीं तोचि मात्र ॥ कां धरावा ॥ २ ।
आर्यावर्त सकल ॥ मजही प्रिय आहे
त्याचें हित पाहें ॥ चित्तामध्यें ॥ ३ ॥
महाराष्ट्र त्याचा ॥ आहे जीवप्राण
ऐसी अंतरीं खूण ॥ मज वाटे ॥ ४ ॥
महाराष्ट्र-उन्नति ॥ जेधवां होईल
आर्यभू होईल ॥ सुखी तेव्हां ॥ ५ ॥
ऐसें माझें मज ॥ सांगतें मजला
सूज्ञ जे त्यांजला ॥ हेंचि वाटे ॥ ६ ॥
आर्यसंस्कृतीचें ॥ महाराष्ट्र निधान
प्रस्तुत अन्यस्थान ॥ तैसें नाहीं ॥ ७ ।

महाराष्ट्रसंस्कृति ॥ ती आर्यसंस्कृति
विचारूनि चित्तीं ॥ पहा तुह्मीं ॥ ८ ॥
महाराष्ट्रा आर्यावर्ता ॥ भेद नाहीं
दोन्ही एक पाहीं ॥ मी चित्तानें ॥ ९ ॥

---

( २ )

महाराष्ट्र आर्यदेश ॥ आशियाखंड
यांसि भावीकाल ॥ सम पाहें ॥ १ ॥
महाराष्ट्र–उन्नति ॥ तीच आर्योन्नति
आशिया–उन्नति ॥ तीच असे ॥ २ ॥
आशिया–उद्धार ॥ आर्यदेशोद्धार
महाराष्ट्र–उद्धार ॥ एक आहे ॥ ३ ॥
महाराष्ट्र–आपदा ॥ आर्यदेशापदा
आशिया–आपदा ॥ एकरूप
आपदा या सर्व ॥ जनाज्ञानामुळें
योग्य शिक्षणानें ॥ हरतील ॥ ५ ॥

---

( ३ )

पृथ्वीचें हित तें ॥ आशियाचें हित
मानावें चित्तांत ॥ प्रत्येकानें ॥ १ ॥

पृथ्वीचें हित तें ॥ आर्यदेशहित
मानावें चित्तांत ॥ प्रत्येकानें ॥ २ ॥

पृथ्वीचें हित तें ॥ महाराष्ट्रहित
मानावें चित्तांत ॥ प्रत्येकानें ॥ ३ ॥

पृथ्वीचें हित तें ॥ निजज्ञातिहित
मानावें चित्तांत ॥ प्रत्येकानें ॥ ४ ॥

पृथ्वीचें हित तें ॥ निजकुलहित
मानावें चित्तांत ॥ प्रत्येकानें ॥ ५ ॥

पृथ्वीचें हित तें ॥ उत्तम स्वहित
मानावें चित्तांत ॥ प्रत्येकानें ॥ ६ ॥

# स्वदेशधोरण संभाळण्याविषयीं जनास बोध.

## अभंग.

### ( १ )

जगदीशें जन्म ॥ ज्या देशीं दीधला
तो त्यासि नेमिला ॥ कार्यासाठीं ॥ १ ॥
इतर देशांचा ॥ न व्हावें अपराधी
सेवा ते करावी ॥ स्वदेशाची ॥ २ ॥
जगत्‌-हित मुख्य ॥ तें न बुडविणें
तत्पर राहाणें ॥ स्वदेशार्थी ॥ ३ ॥
करूनीयां ऐसा ॥ अंतरीं विचार
स्वकार्यी तत्पर ॥ असों आह्मीं ॥ ४ ॥

---

### ( २ )

जगाद्धित आह्मां ॥ प्रिय असे खरें
परि अविरोधें ॥ स्वदेशार्थी ॥ १ ॥

अन्य देशीयांचे ॥ अनुभव घेऊं
परि नच सांडूं ॥ स्वधोरण ॥ २ ॥

स्वदेशधोरण ॥ सोडूनि वागणें
ह्मणजे राष्ट्र नेणें ॥ नाशपथा ॥ ३ ॥

ख्रिस्तीपंथ फ्रीमेसन्री थिआसफी
आर्यबंधु तुह्मीं ॥ नका धरूं ॥ ४ ॥

अनादि शुद्ध जो ॥ सनातनधर्म
ज्याचें कथिलें वर्म ॥ शत सिद्धांतीं ॥ ५ ॥

निर्मत्सरचित्तें ॥ वाचा ते सिद्धांत
होऊं नका अंध ॥ मायामोहीं ॥ ६ ॥

---

## गैरसमजानें छळणाऱ्या दुर्जनांस उद्देशून.

### अभंग.

( १ )

स्वराष्ट्रधोरण ॥ सोडुनि तुह्मीं हो
मज छळितां कां हो ॥ देशबंधु ॥ १ ॥

स्वदेशधोरण ॥ सोडीत मी नाहीं
ह्मणुनी माझ्यापाहीं ॥ द्वेष करा ॥ २ ॥

जीव मर्म तुटे ॥ ऐसे अपमान
तुह्मीं करा मम ॥ नानापरी ॥ ३ ॥

तुह्मारूपें कैशीं ॥ विघ्नें राहती उभीं
राष्ट्रभाग्य मार्गीं ॥ तैसीं माझ्या ॥ ४ ॥

निरपराधी असतां ॥ कांरे मज छळितां
कैसा वैरी करितां ॥ जगदीश ॥ ५ ॥

जगदीश माझा ॥ आहे साह्यकारी
त्यासि तुह्मीं अरी ॥ करूं नका ॥ ६ ॥

( २ )

ब्राह्मणेतरांचा ॥ मी तों द्वेषी नाहीं ॥
कां हे मज छळिती ॥ अब्राह्मण ॥ १ ॥

स्वराष्ट्रासि मनें ॥ एकरूप आहें
सर्वज्ञाति पाहें ॥ अवयव ॥ २ ॥

मजला द्वेषितां ॥ राष्ट्रासि द्वेषाल
जगदीश कराल ॥ अपुला वैरी ॥ ३ ॥

जगदीश आहे ॥ माझा साह्यकारी
त्यासि तुह्मी अरी ॥ करूं नका ॥ ४ ॥

( ३ )

मत्सरीब्राह्मण ॥ कांरे मज छळितां
अपराध कोणता ॥ तुमचा केला ॥ १ ॥

स्वराष्ट्रासि एक जीवरूप आहें
यांत काय गेलें ॥ तुमचें सांगा ॥ २ ॥

ब्राह्मणेतरांसि ॥ प्रेमें सुधारणें
न त्यांसि हिणवणें ॥ अपुलें शील ॥ ३ ॥

अपुलें शील मी ॥ करीत असतां
मजला द्वेषितां ॥ मूढ तुह्मीं ॥ ४ ॥

# कर्तव्य चुकणाऱ्या पुढाऱ्यांस उद्देशून.

## अभंग.

देशोन्नतिसाठीं ॥ ह्मणुनी यत्न करिती
परी बहु चुकति ॥ यत्नामध्यें ॥ १ ॥

जनतेच्या अंगीं ॥ कर्तृत्वाचे गुण
आणणें झटून ॥ हें न करिती ॥ २ ॥

अहोरूपमहोध्वनि तैशा परि
जनस्तुति करिती ॥ महतीसाठीं ॥ ३ ॥

कोणत्या दोषांनीं ॥ देशभाग्य गेलें
कोणत्या गुणांनीं ॥ मिळेल तें ॥ ४ ॥

विचार करूनि ॥ जना न शिकविती
कल्होळ करिती ॥ अभिमानाचा ॥ ५ ॥

स्वदेशाभिमान ॥ नव्हे दुरभिमान
दुष्ट अभिमान ॥ राष्ट्रघाती ॥ ६ ॥

खरोखरी भलें ॥ तेंचि संरक्षावें
वाइटासि भलें ॥ कष्टें करूं ॥ ७ ॥

ऐसा अभिमान ॥ पाहिजे देशांत
दुरभिमानें मूर्ख ॥ राष्ट्र होतें ॥ ८ ॥

दुरभिमानें मूर्ख ॥ जे जे जन झाले
सत्वरि ते गेले ॥ नाशपंथा ॥ ९ ॥

नाश पंथा जरि ॥ आपणा न जाणें
निजदोष शोधणें ॥ अवश्य आहे ॥ १० ॥

राष्ट्रीं जें वाइट ॥ शोधूनि काढावें
वाइट ह्मणावें ॥ स्पष्ट त्यासि ॥ ११ ॥

वाइट असे तें ॥ यत्नें करूं नीट
ऐसा तो निश्चय ॥ स्तुत्य आहे ॥ १२ ॥

ऐसा सुनिश्चय ॥ तारीतो राष्ट्रासी
झांकणें दोषांसि ॥ राष्ट्रघात ॥ १३ ॥

# कर्तव्य चुकणाऱ्या पुढाऱ्यांस उद्देशून.

## अभंग.

जन आहे तरि ॥ मुलाचिये परि
जो जो स्तुति करि ॥ तया वळे ॥ १ ॥

असत्य स्तुतीनें ॥ जन बिघडविती
दुरभिमानी होती ॥ तेणें जन ॥ २ ॥

जनासह तुह्मी ॥ अधोगति जाल
जरि न टाकाल ॥ निजदोष ॥ ३ ॥

जरिं राष्ट्र पुढें ॥ जगीं टिकविणें
जरि न त्या नेणें ॥ नाश पंथा ॥ ४ ॥

शोधारे शोधारे ॥ अवनति कारणें
दोष दूर करणें ॥ व्रत धरा ॥ ५ ॥

अपुल्या हस्तीं या ॥ कंकणातें बांधा
राष्ट्रहित साधा ॥ निजयत्नें ॥ ६ ॥

## पद.

चला जाऊंया ॥ भाग्याचा शोध घेऊंया
शोधूं सगळ्या ॥ दिशा चलाहो
सत्यप्रकाशें ॥ शोधूंयाहो
भाग्यवस्तुतें ॥ मिळवूं चलाहो
चला जाऊंया ॥ भाग्याचा शोध घेऊंया ॥ १ ॥

---

## ( फटका. )

सृष्टी सगळी सरळ चालली
किमपि न कोठें दोष वसे
ईशभक्ति मनिं धरुनी वागे
त्यातें किमपि कमति नसे ॥ १ ॥

स्थिरमति करुनी धैर्य धरोनी
देशकार्यां प्रवर्त व्हा
ईशस्मरा मनिं सत्यें चाला
देशासाठीं स्वार्थ त्यजा ॥ २ ॥

कराल आजि कष्ट विवेकें
    तरीच आशा पुढति असे
लाज धरा निज दुःस्थिति बघुनि
    जगती तुह्मां हंसत असे ॥ ३ ॥

---

# रत्नागिरीस लहानपणीं १३ ते १७ वर्षपर्यंत शिकण्यासाठीं होतों त्या कालासंबंधी.

## मध्यरात्र.

चाल फटका.

मध्यरात्रिचा सुमार आहे
    नगरी सगळी स्वस्थ असे
लाटमिऱ्याच्या कांठांवरती
    थाड् थाड् खळ् वाजतसे ॥ १ ॥

शब्द कांहींही दुसरा कानीं
स्वल्पहि माझ्या येत नसे
पश्चिमाब्धिची लाट सारखी
थाड् थाड् खळ् वाजतसे ॥ २ ॥

वर्षें पंधरा वयास तेव्हां
मनीं निराशा मुळिंहि नसे
कालाब्धीची आशा वीची
चित्ततटावरि वाजतसे ॥ ३ ॥

विचार दुःखद चित्तीं माझ्या
तेव्हां येऊं शकत नसे
मनप्रदेशीं आशा वीचि
थाड् थाड् खळ् वाजतसे ॥ ४ ॥

( २ )

## अंजनीगीत.

बाळपणीं मज दुष्ट संगती
झाली पाहा गति दैवाची

तेणें निर्मलता चित्ताची
लोपुनियां गेली ॥ १ ॥

कुविचार रिपु चित्तीं शिरले
मम पुण्याला बाधक झाले
मम जीवाला जखमी केलें
सुकृताच्या मर्मी ॥ २ ॥

पुण्य आहे सौख्यकारण
सौख्य आहे जीवनिधान
मलीनता मनीं शिरतां जाण
पुण्यघात होय ॥ ३ ॥

बाळपणीं मज कुसंग झाला
असा न होवो कुणा मुलाला
जगन्नायका तुला दयाळा
नम्र प्रार्थना ही ॥ ४ ॥

# श्रीमहाकाली जन्मग्रामदेवता हिला उद्देशून.

## अंजनीगीत.

कर्मदोष मम त्यांच्या योगें
जेव्हां आलीं दुष्टसंकटें
कृपा करोनी तुवां रक्षिलें
श्रीदेवी सदये
जगदीशाची कृपा तीच ही
दिव्यमूर्ती श्रीमहाकाली
जी वसताहे जागृत देवी
आडिवरें ग्रामीं
जगदीशकृपा मजला संकटिं
आर्यादुर्गारूपें भेटलि
पुण्यनौका संरक्षीली
जीनें करुणेनें
दुर्गे कृतज्ञ आहें तूतें
निवारिलीं त्वां दुष्टसंकटें

जय श्रीमहाकाली शब्दें
जंयं बोलूं तूझा

---

## भवसमुद्र.

### साकी.

समुद्राच्या लाटा दुरुनी
नेत्रां ज्या सुखवीती
त्याच नौका वादळिं पडतां
अंतक रूपा घेतीं ॥ १ ॥

संसाराच्या ज्या ज्या गोष्टी
वाटति दुरुनी गोड
त्यांचि संगती संकटकाळीं
होतें दुःखद फार ॥ २ ॥

अशा कालिं जो धैर्य सुकाणू
धरुनी चतुराईनें

शांतीनौका अभंग राखी
ज्ञान जाणिलें त्यानें ॥ ३ ॥

---

## स्वतंत्रतेचा झरा.

### पद.

स्वतंत्रतेचा झरा वाहतो
विचार सरणीमध्यें सदा
अज्ञानाचे मल केव्हांहि
स्पर्श न करिती मना जरा ॥

झरा बरा हा थांबुनि होई
डबक्यापरि मन तरी पहा
फुकट जातसे बुद्धिदेणगी
प्रभुनें दिधली मर्त्य नरा ॥ १ ॥
स्वतंत्रतेचा ॥

---

# हिरवा डोंगर.

## साकी.

हिरवा डोंगर दुरुनि दिसे हा
रम्य फार नयनांतें
वर्षाकालीं आनंदानें
शेला जणुं महि घेते ॥ १ ॥

चाऱ्यामध्यें फुलें गोजिरीं
दाविति नकशी शोभा
सुचवित निर्झरशब्द महीच्या
आनंदोत्सवगाना ॥ २ ॥

अशा स्थळातें पाहुनि मजला
दुःखमिश्र सुख होई
स्मृति पत्नीची दुःखद ऐशी
हा भूशेला देई ॥ ३ ॥

# वहाळ.

## विद्युन्माला.

खळ खळ शब्दें वहाळ वाहातो
मम श्रवणातें हर्षें भरितो
शेतांतें उपकारी होतो
शीतळता पवनातें देतो ॥ १

शांतगतीनें झुळझुळ वाही
सृष्टिप्रदेशा शोभा देई
तरुवल्लींना सुखकर होई
पशुपक्ष्यांना पाणपोई ॥ २ ॥

शांत ज्ञान्यासम कुणाकुणाचा
आयुःक्रम होई पुण्याचा
पुण्य सदा दे संग अशांचा
भूलोकीं हा स्वर्ग सुखाचा ॥ ३॥

# पिंपळ.

## विद्युन्माला.

पिंपळाच्या झाडामध्यें
पवित्रता सुखकारी वसते
ह्मणुनी तेथें बसणारातें
पवित्र शांति सहजचि मिळते ॥ १ ॥
पिंपळाच्या झाडामध्यें
शुद्धतेज खेळत असतें
ह्मणुनी तेथें बसणारातें
शुद्धविचारस्फूर्ती येते ॥ २ ॥
पिंपळाचीं सुंदर पानें
मंद मंदशीं हालति पवनें
ह्मणुनी तेथें बसुनी प्रेमें
घेती जन विश्रांति सुखानें ॥ ३ ॥
गुण ज्यापाशीं तो सुखराशी
त्याची संगति दुःखें नाशी

होतो सुखकर तो जीवांसी
  वंदिति जन ह्मणुनी ऐशासि ॥ ४ ॥

---

## ओसाड देश.

### विद्युन्माला.

निर्जन देशा उदास दिससी
  काय पूर्विल स्थिति आठवसि
जेव्हां येथें निबिड अरण्यें
  पसरलिं होतीं सृष्टिकरानें ॥ १ ॥

किंवा स्मरसी एकाकालीं
  येथें होतीं पुरें वाढलीं
राहत होते ज्यांत प्रतापी
  धीर वीर नर भाग्यशाली ॥ २ ॥

किंवा स्मरसी पूर्वी येथें
  ऋषिमुनिसाधूआश्रम होते

धर्माचें जणु प्रिय हें स्थान ॥
भूवरिचें वैकुंठ निधान ॥ ३ ॥

किंवा विचित्र रम्य उपवनें
होतीं शोभत पूर्वी येथें
अथवा समृद्धधान्यशेतें
देत होतीं उत्तम पीकें ॥ ४ ॥

किंवा स्मरसी एकाकाळीं
रणें भयंकर येथें झालीं
वीररक्तें पृथ्वी न्हाली
राष्ट्रतरूची खच्ची झाली ॥ ५ ॥

स्मरसी पूर्वी कधिं मम जीवा
मम देहांतरिं पाहियलें त्वां
वागत होतों कैशा रीती
सांग तुजला जरि ती स्मृति ॥ ६ ॥

निर्जन देशा जाणसि कीं रे
पुढती येईल जी स्थिति तुज रे

धैर्य धरोनी काला क्रमिशी
नकळे तुज स्थिति होईल कैशी ॥ ७ ॥

निर्जनदेशा वैभवमत्तां
जागृति देई तव स्थिति मित्रा
मत्त कोणिहि येथें येतां
गर्व सोडितो त्याच्या चित्तां ॥ ८ ॥

निर्जनदेशा उत्तम शिक्षक
तूं आहेसि मत्तां दापक
निरोप घेतों तूझा प्रेमें
मिळो तुला सुख ईशकृपेनें ॥ ९ ॥

जीं जीं ध्यानें भावि सुखाचीं
सदा अंतरीं करीत राहसी
होऊ सफलता त्या ध्यानांची
सरो आपदा दुर्दैवांची ॥ १० ॥

निर्जन देशा समान स्थितिनें
सहजची पाहें तुजला स्नेहें

होउ सफलता त्या ध्यानांची
सरो आपदा दुर्दैवांची ॥ १० ॥

निर्जन देशासमत्व स्थितिनें
सहजचि पाहें तुजला स्नेहें

मजलाही तूं शुभ चिंतावें
जैसें म्यां तुज नच विसरावें ॥ ११ ॥

---

## एक पश्चात्तापी कवी.

### अंजनीगीत.

पूर्वी पापें जीं म्यां केलीं
दुःखस्वरूपें फळासि आलीं

जरि इतरांतें समजाविन ही
कारणकार्यस्थिति ॥ १ ॥

सावध होतिल इतर माणसें
वागतील चांगल्या विवेकें

पुण्यें नानापरिचीं दुःखें
टाळुनि सुखि होतील ॥ २ ॥
यासाठीं मज कवित्व द्यावें
राष्ट्रबांधवां म्यां बोधावें
वाग्यज्ञानें पुनीत व्हावें
दोषांपासूनी ॥ ३ ॥
इच्छा ही तुज निवेदीली
करुणामूर्ते तुवां ऐकिली
आतां पाहिजे सफल केली
विश्वाच्या नाथा ॥ ४ ॥

---

## कर्मफल.

### पद.

स्थळीं सुखाच्या असति परंतु
आत्मा टोंचि मना ॥
दुष्टकरणी करिती त्यांची
स्थिति ऐशी जाणा ॥

ईश्वरन्यायें फळासि येती
पुढती तीं पापें ॥
एकाएकीं घात होती
नासति सर्व सुखें ॥
स्मशानापरि जिणें तयांचें
उदास सर्वपरि ॥
अश्रू नेत्रीं शून्यदृष्टि
म्लानहि मुखकान्ती ॥
हृदयामध्यें दुःख ज्वाला
भडकुनि रहाती सदा ॥
मस्तकामध्यें असंख्य चिंता
घालिताति पिंगा ॥
जगे परंतु मरण बरें तो
ह्मणतो दुर्दैवी ॥
पुण्यभागी सुखी तयांना
स्थिति नकळे त्याची ॥

स्वतः सुखी त्यां दुःख पराचें
प्रायः कळत नसे ॥
एकादा कुणि परदुःखानें
दुःखी होत असे ॥
क्षणिक कळवळा दावुनि पुनरपि
स्वसुखीं मग्न वसे ॥
प्राणी अपुल्या कर्मदशेला
भोगि एकटाला ॥
सुखांमध्यें मिळति सर्वही
दुःखि त्यजिति त्याला ॥
ह्मणुनि बांधव दक्ष राहुनि
पुण्य सदा साधा ॥
मन इंद्रिय तनु क्रियांसि अपुल्या
सत्यमार्गिं योजा ॥ १ ॥
स्थळीं सुखाच्या ॥

---

# जनस्थितिनिरूपण.

## अभंग.

### ( १ )

अन्हेरीतें जग ॥ दुःखभागी त्यासि
त्याचिया दोषांसि ॥ शोधिताहे ॥ १ ॥
पुण्यभागी त्यासि ॥ सर्व जग ओढे
त्याचे गुण पाहे ॥ झांकी दोष ॥ २ ॥
निजदोष ज्यांचे ॥ दुःखफळा आले
त्यांसि होति भले ॥ तेहि शत्रु ॥ ३ ॥
विश्वनायकासि ॥ त्यांनि दुखविलें
ह्मणुनि त्यांवरि फिरे ॥ सकल विश्व ॥ ४ ॥
विश्वाचा चालक ॥ ज्यांचा मित्र आहे
त्यांसि विश्व आहे ॥ सौख्यपूर्ण ॥ ५ ॥
विश्वाचा चालक ॥ आहे फार थोर
मी तों क्षुद्रमर्त्य ॥ हतभागी ॥ ६ ॥
कैसा मज सखा ॥ होइल तो ईश
शंकेचा या लेश ॥ धरूं नको ॥ ७ ॥

जगताचा नाथ ॥ करुणामूर्ती आहे
प्रेमदृष्टी पाहे ॥ निजभक्तां ॥ ८ ॥

ईशभक्तीसाठीं ॥ शुद्धता पाहिजे
पापी कधीं नोहे ॥ ईशभक्त ॥ ९ ॥

सुशील राहावें ॥ ईश्वरा भजावें
तेणें संपादावें ॥ त्याचें सख्य ॥१०॥

( २ )

पूर्वी कधीं कोठें ॥ नाना कर्मे केलीं
तीं हा स्मरत नाहीं ॥ क्षुद्र जीव ॥ १ ॥

परि सृष्टिकर्ता ॥ सर्व कांहीं जाणे
जीवासि नियमें ॥ फल देई ॥ २ ॥

त्याच स्थळीं अथवा ॥ कोठें अन्यस्थळीं
देहींच त्या अथवा ॥ देहान्तरीं ॥ ३ ॥

फसवूं शकेना ॥ कोणी त्या ईश्वरा
धरावें हें चित्ता ॥ जन तुह्मीं ॥ ४ ॥

---

# जलधारा.

## साकी.

जलधारांनीं सौख्य होतसे
वृक्षवेलिंना भारी ॥
नवीन कोमल टोंवर येती
दृष्टीतें सुखकारी ॥ १ ॥

वर्षाकालीं सुखी जनांचीं
मनें हर्षित होती ॥
असुखी त्यांतें रम्यकालिंया
अधिक दुःख ये चित्तीं ॥ २ ॥

अहा जगाचा नाथ कैसा
प्रियजन सौख्या रक्षी
दुःखस्मृति हि न व्हावि त्यांना
ऐशी देतो स्थिति ॥ ३ ॥

असो कोणता ऋतु वर्षांचा
अथवा वासहि कोठें

त्यातें भक्तवत्सल ईश्वर
देत सदा शुभसौख्यें ॥ ४ ॥

अनपराधिता सत्यशीलता
कष्ट जगद्धितकार्यी
यांचा आश्रय सदा वर्तनीं
करिती जीं नरनारी ॥ ५ ॥

अशीं वागुनी नम्रमनानें
प्रार्थिति जगदीशातें
वेळोवेळीं त्यातें ह्मणती
देई सद्बुद्धीतें ॥ ६ ॥

जगन्नायका संरक्षूनि
सकलां द्यावें सौख्य
अगाध तूझी विश्वरचना
देऊ न आह्मां दुःख ॥ ७ ॥

अशीं माणसें मंगलअंकूर
शोभति विश्वतरूला

काळजि त्यांची विश्वपालका
असते करुणागारा ॥ ८ ॥

लोकांतरगत प्रियकरपत्नीं
राहू जिवानें एक
जगच्चालका प्रेमें भजुनि
सहन करूं निजदुःख ॥ ९ ॥

जगद्धितास्तव सत्यपथानें
आपण कष्ट करूंया
जगच्चालका अपुल्या निर्मल
शीलानें तोषूंया ॥ १० ॥

करुणामूर्ती भक्त सखा तो
मग होईल प्रेमार्द्र
नवनीरघन वर्षे तैसा
अपणातें पावेल ॥ ११ ॥

काल अनंत जीव सनातन
जाणुनि धैर्य धरूंया

भावि सुखास्तव संप्रति दुःखें
धैर्यानें सोसूंया ॥ १२ ॥

---

## सुखकारी वायु.

( अनियमित )

पद.

मला सौख्य किती
देशि पवनारे ॥
दुष्टदुःखें जीवा गांजिति
निष्ठुर छळितीरे ॥
मला सौख्य ॥ १ ॥

किती सौख्य मला
देशि पवनारे ॥
दया आहे तुझ्या
चित्तीं पवनारे ॥
होऊ तुझें कल्याण सदा

सखया पवनारे ॥
मला सौख्य ॥ २ ॥

किती रम्य तुझा
स्पर्श पवनारे ॥
दु:खविसर कसा
होई आतांरे ॥
मला सौख्य ॥ ३ ॥

सुखभागि जना
फार प्रिय तूंरे ॥
दु:खी त्यांसि तरि
सुधास्पर्श तूंरे
मला सौख्य ॥ ४ ॥

प्रिया स्वर्गी जरि
तुला दिसलीरे ॥
कळवीं क्षेम तिला

माझें मित्रांरे ॥
मला सौख्य ॥ ५ ॥
आहे तूझी गति
स्वर्गलोकींरे :
मला सौख्य किति
देशि पवनारे ॥ ६ ॥
प्रियाक्षेम मला
आणिं मित्रांरे
सकळांसि तूं बा
हितकर्तारे
मला सौख्य किति ॥ ७ ॥

---

## नभस्तुति.

### पद.

रूप तूझें नभा पाहुनि
जीव गर्वा सोडितसे ।

चंद्रतारका फिरतां बघुनी
हर्ष यातें होत असे ॥ १ ॥
निर्मल कोमल श्यामसुंदर
प्रभुचें रूपचि तूं नभा ।
तूझा महिमा देत नाहीं
मोद कुणाच्या जिवा पहा ॥ २ ॥
अहा सुखद किती उच्च पसरलें
नभ हें मोजिरवाणें ।
पाहुनि यातें जाती दुःखें
जीव हर्षे अमृत सुखें ॥ ३ ॥

---

## कै० पुरुषोत्तम नारायण दाते यास उद्देशून.

### स्मारक अभंग.

उपनाम दाते ॥ नाम पुरुषोत्तम
पितयाचें नाम ॥ नारायण ॥ १ ॥

आर्यशिक्षणसंस्थेमध्यें सातव्यावर्गी
सद्गुणी विद्यार्थी ॥ एक होता ॥ २ ॥

बुद्धीनें कुशाग्र ॥ स्वभावें गंभीर
शिक्षकांसि फार ॥ तोष देई ॥ ३ ॥

सत्यप्रिय शांत ॥ ईश्वराचा भक्त
देशकार्यनिष्ठ ॥ होतकरू ॥ ४ ॥

भाषा इतिहास ॥ गणित प्रभृति
सर्वेहि विषयीं ॥ होता पटु ॥ ५ ॥

संस्कृत मराठी ॥ कवनीं निपुण
आलेख्य, वादन कला जाणें ॥ ६ ॥

देशकार्यासाठीं ॥ शरीर सुदृढ
असावें ह्मणून ॥ करि कसरत ॥ ७ ॥

बक्षिसें बहुत ॥ मिळवी परिक्षांत
गुरूंसि संतोष ॥ सदा देई ॥ ८ ॥

एकाएकीं त्यासि ॥ मृत्यु मूळ धाडी
सहज पुण्यासि ॥ गेला असतां ॥ ९ ॥

शालीवाहन शक ॥ अठराशें सत्तावीशी
चैत्र कृष्णपक्षीं ॥ ताप आला ॥ १० ॥
ताप येऊनीयां ॥ नेई त्या परलोका
सकलांच्या दु:खा ॥ पार नाहीं ॥ ११ ॥
तयाचें स्मारक ॥ ह्मणुनि स्थापिली
तयाच्या मित्रांची ॥ एक संस्था ॥ १२ ॥
आर्यत्वप्रसारक मंडळी हें आहे
नाम त्या संस्थेचें ॥ ठेवियलें ॥ १३ ॥
ज्येष्ठ पौर्णिमेस ॥ संस्था स्थापियेली
मित्र सहकारी ॥ चित्रे होता ॥ १४ ॥

---

## रा. परशुराम दिनकर चित्रे.

### ( आर्यन एज्युकेशन सोसायटीपैकीं. )

### अभंग.

चित्रे उपनाम ॥ परशुराम नाम
पितयाचें नाम ॥ दिनकर ॥ १ ॥

आर्यशिक्षणसंस्थेंत ॥ सहकार्यकारी
सत्यनिष्ठा पुरी ॥ त्याची असे ॥ २ ॥

शुद्ध ईशभक्ति ॥ शुद्ध देशभक्ति
तयाच्या अंतरीं ॥ राहताहे ॥ ३ ॥

राष्ट्रोन्नति कांहीं ॥ खचित हा करील
सज्जनां तोषवील ॥ वाटतसे ॥ ४ ॥

अजाण जनांसि ॥ ज्ञानामृत द्यावें
त्यांसि सोडवावें ॥ व्यसनांतूनी ॥ ५ ॥

मद्यादि व्यसनें ॥ राष्ट्रक्षय करिती
पाहुनीयां चित्तीं ॥ झुरतसे ॥ ६ ॥

स्वतः कष्टतसे ॥ तनमनधनें
देशार्थ न ह्मणे ॥ त्रासदुःख ॥ ७ ॥

# कै० तीर्थरूप रामचंद्र प्रभाकर जोशी व कै० तीर्थस्वरूप गोविंद प्रभाकर जोशी यांस उद्देशून स्मारक.

## अभंग.

पिता रामचंद्र ॥ वर्षांचा असतां
मम पितामह ॥ जाय स्वर्गी ॥ १ ॥

प्रभाकर मम ॥ पितामह नाम
अकस्मात शिवधामा जाई ॥ २ ॥

पितृव्य गोविंद ॥ पित्याहूनि मोठा
बंधु उभयतां ॥ मातृभक्त ॥ ३ ॥

रत्नागिरी नगरीं ॥ भिक्षा मागूनीयां
प्रेमें राहूनीयां ॥ विद्या करिती ॥ ४ ॥

मग पुणेंनगरीं ॥ बहु कष्ट करुनी
उच्चतरज्ञान ॥ संपादीति ॥ ५ ॥

पुढें धारवाडीं ॥ पितृव्य राहिला
उद्यमा काढिला ॥ छापखाना ॥ ६ ॥

सन्मार्गदर्शक ॥ नाम त्याचें होतें
बहुत ग्रंथ तेथें ॥ छापीयेले ॥ ७ ॥

छापूनि ज्ञानाचा ॥ करीत प्रसार
गोविंद अपार ॥ कष्ट करी ॥ ८ ॥

बत्तिसाव्या वर्षी ॥ एकाएकीं झाला
परलोक पाहुणा ॥ कर्मवशें ॥ ९ ॥

मग पिता मम ॥ बेळगांवीं काढी
छापखाना ॥ आणि वृत्तपत्र ॥ १० ॥

बेळगांवसमाचार तया नाम
झटूनीयां श्रम ॥ फार करी ॥ ११ ॥

प्रकृति आरोग्य ॥ जाय पितयाचें
मग येत असे ॥ जन्मग्रामीं ॥ १२ ॥

छापखाना पत्रं ॥ यांतील स्वहक्क
सहकारी मित्र ॥ तया विकी ॥ १३ ॥

आडिवरें क्षेत्रीं ॥ येई जन्मग्रामीं
येथें श्रीमहाकाली ॥ जागृत राहे ॥ १४ ॥

शांतपणें काढी ॥ आयुष्य राहिलें
देई अपत्यांतें ॥ सुशिक्षण ॥ १५ ॥

अंतीं निरोपिलें ॥ स्मारक करावें
गोविंद बंधूचें ॥ आणि अपुलें ॥ १६ ॥

उभय बंधूंच्या ॥ प्रेमाचें द्योतक
एकत्र स्मारक ॥ करावें म्यां ॥ १७ ॥

उभयतांसि देशकल्याण बहु प्रिय ॥
होतें हें जाणून ॥ रचीयेलें ॥ १८ ॥

मुलांचा स्वदेशाभिमान पुस्तक
उभय आत्म्यांस ॥ अर्पीयेलें ॥ १९ ॥

उभयतां आत्मे ॥ गोविंद पितृव्य
आणि रामचंद्र ॥ मम पिता ॥ २० ॥

संतुष्ट होऊत ॥ माझिया सेवेनें
तुलसीपत्र प्रेमें ॥ अर्पीयेलें ॥ २१ ॥

जगदीशा प्रार्थी ॥ तयां हें स्मारक
होईल मान्य, प्रिय ॥ ऐसें करीं ॥ २२ ॥

---

# स्वराष्ट्रीय जनांस उद्देशून.

## अभंग.

### ( १ )

माझे राष्ट्रजन ॥ हांका मारीं तुह्मां
खोटी श्रद्धा टाका ॥ ऐका माझें ॥ १ ॥

जगाचा जो कर्ता ॥ जगा चालविता
जगाचा संहर्ता ॥ त्यासि भजा ॥ २ ॥

भजण्यासि योग्य ॥ एक तोच ईश
सकल गुणेश ॥ ईश्वर तो ॥ ३ ॥

अन्य कोणी नाहीं ॥ तयाचे समान
अन्यासि ह्मणून ॥ भजूं नका ॥ ४ ॥

( २ )

माझें राष्ट्रजन ॥ हांका मारीं तुह्मां
ऐका ऐका ऐका ॥ शांतपणें ॥ १ ॥
सध्यांचा हा काळ ॥ काळसर्प आहे
घात चिंतीताहे ॥ आपणातें ॥ २ ॥
आपल्या राष्ट्राचें ॥ निर्मूळचि व्हावें
ध्यान आहे ऐसें ॥ याचे चित्तीं ॥ ३ ॥
अरे हा आपणासंनिध असतां
कैसी चैन करितां ॥ अविवेकें ॥ ४ ॥
अरे या ओळखा ॥ चैनसि थांबवा
एकत्र ठरवा ॥ प्रतिकार ॥ ५ ॥
या दुष्टकाळाचा ॥ प्रतिकार करा
मग सुखें नांदा ॥ स्वस्थपणें ॥ ६ ॥

( ३ )

माझे राष्ट्रजन ॥ हांका मारीं तुह्मां
विवेकानें पहा ॥ शांतपणें ॥ १ ॥

अपुल्या राष्ट्रदेहीं ॥ किती कांटे असती
ह्मणुनी ही स्थिति ॥ आपदांची ॥ २ ॥

अरे या कांट्यांतें ॥ सावधपणें काढा
परि जीवा धका ॥ लावूं नका ॥ ३ ॥

( ४ )

माझे राष्ट्रजन ॥ हांका तुह्मां मारी
भेदांसि सोडुनि ॥ एक व्हाहो ॥ १ ॥

सगळ्या पृथ्वीच्या ॥ हास्यासि कारण
झालां आजवर ॥ पुरे तितुकें ॥ २ ॥

जातिद्वेष, कुलद्वेष वंधुद्वेष
परस्पर द्वेष ॥ टाका टाका ॥ ३ ॥

राष्ट्रनाश कसा ॥ होत आहे पहा
सुविचार करा ॥ निज चित्तीं ॥ ४ ॥

( ५ )

माझे राष्ट्रजन ॥ औदासिन्य टाका
आळसातें सोडा ॥ व्हा हुशार ॥ १ ॥

काय चालताहे ॥ तुमच्या सभोंतीं
डोळे उघडूनि ॥ नीट पाहा ॥ २ ॥

राष्ट्रसौख्यगृहा ॥ आग लागलीहे
बंधू तुह्मी कैसे ॥ स्वस्थ बसा ॥ ३ ॥

यारे यारे सर्व ॥ व्हारे व्हारे एक
अभाग्य वन्हीस ॥ विझवा हो ॥ ४ ॥

( ६ )

माझे राष्ट्रजन ॥ हांका तुह्मां मारीं
प्रतिहांक द्यावी ॥ सुजनहो ॥ १ ॥

पशु तरि बरे ॥ ऐसे आपुले हाल
अभाग्यें होतात ॥ नीट पाहा ॥ २ ॥

जरी जगणें तरी ॥ सन्मानें जगावें
नाहीं तरी जावें ॥ अव्यक्तासि ॥ ३ ॥

अन्न नाहीं नाहीं कीर्ती आणि मान
ऐसे हें जीवन ॥ विटंबना ॥ ४ ॥

कांरे अझुनि तुह्मी ॥ जाग घेत नाहीं
कांरे टाकित नाहीं ॥ औदासिन्य ॥ ५ ॥

कांरे देशकलह ॥ नच सोडा तुह्मी
कांरे अधोगति ॥ जात असा ॥ ६ ॥

( ७ )

माझे राष्ट्रजन ॥ संबोधीत तुह्मां
धरुनीयां प्रेमा ॥ लक्ष्य द्यावें ॥ १ ॥

कावळे अधमाधम दुष्टप्राणी
तेहि ऐक्य करुनि वागताति ॥ २ ॥

त्यांहुनि अधम काय आपण आहों
ह्मणुनी भांडताहों ॥ नाशासाठीं ॥ ३ ॥

आजवरी नाश ॥ होत आला आहे
पुरा काय नोहे ॥ अजुनी झाला ॥ ४ ॥

ईश्वरें दीधल्या ॥ बुद्धीचा उपयोग
करा बंधूजन ॥ प्रार्थना हे ॥ ५ ॥

( ८ )

माझे राष्ट्रजन ॥ संबोधीत तुह्मां
कांरे व्यर्थ जातां ॥ जगूनीयां ॥ १ ॥
एक दिवस गेला ॥ दुसरा पुढें येत
राष्ट्रसौख्य जात ॥ अधोगति ॥ २ ॥
पित्याहूनि पुत्र ॥ अभागी अधिक
नातू तरि होत ॥ करंटा पैं ॥ ३ ॥
ऐशी अधोगति ॥ प्रत्यक्ष दीसते
ऐसें असतां कांरे ॥ झोंपा तुह्मी ॥ ४ ॥
इतर राष्ट्रांच्या ॥ उद्योगांसि पाहा
वाढवा स्वभाग्या ॥ व्हा कृतार्थ ॥ ५ ॥

( ९ )

माझे राष्ट्रजन ॥ मरतां उपाशीं
कां न व्यापारासी ॥ करा तुह्मीं ॥ १ ॥
परके हे जन ॥ करूनि व्यापार
संपत्ति अपार ॥ कमावीति ॥ २ ॥

कोष्याधीश येथें ॥ होऊनीयां जाति
निज देशाप्रति ॥ सुख घेण्या ॥ ३ ॥
जसे ते करीति ॥ कला उद्यम येथें
नाना यत्न अपुले ॥ कां न व्हावे ॥ ४ ।
अंधांमागें अंध ॥ तैसे कां पडतां
व्यर्थ कां हो जातां ॥ हमालींत ॥ ५ ॥
श्वानवृत्ति करुनी ॥ काय ती प्रतिष्ठा ॥
स्वावलंबें धंदा ॥ कां न करा ॥ ६ ॥
कलाधंदे जीं जीं ॥ राष्ट्र करिताति
त्यातें श्रेष्ठस्थिति ॥ प्राप्त होते ॥ ७ ॥
प्रत्यक्ष पाहातां ॥ इतिहास शिकतां
मग कांहो जातां ॥ तुह्मीं वायां ॥ ८ ॥

( १० )

माझे राष्ट्रजन ॥ शांतपणें ऐका
अंतरीं विवेका ॥ धरा कांहीं ॥ १ ॥
धर्मशाळेंतल्या ॥ वाटसरूं परी
तुह्मी वागा तरि ॥ राष्ट्र कोठें ॥ २ ॥

काय राष्ट्र पृथ्वीवरील दगड
अथवा पशुसंघ ॥ अथवा पक्षी ॥ ३ ॥

काय वृक्षवल्ली ॥ होत असे राष्ट्र
काय कृमि कीटक ॥ राष्ट्र आहे ॥ ४ ॥

एक विचारांचे ॥ एक आकांक्षाचे
एकजीव ज्यांचे ॥ प्रेमें असती ॥ ५ ।

एकसुख एकदुःख ज्यांचें होय
त्यांचा संघ होय ॥ मनुष्यराष्ट्र ॥ ६ ।

आपणासि ऐसें ॥ राष्ट्र पुन्हा होणें
हें तुह्मी धरणें ॥ नीट चित्तीं ॥ ७ ॥

(११)

याहो याहो सर्व ॥ आर्यजन तुह्मीं ॥
एकत्र मिळूनि ॥ द्वेष टाका ॥ १ ॥

पाण्यामध्यें पाणी ॥ जैसें जात मिळुनी ॥
तैशीं करा तुह्मीं ॥ अंतःकरणें ॥ २ ॥

सर्व करा तुह्मीं ॥ अंतःकरणें एक ॥
जमहो तरीच ॥ राष्ट्र तुह्मी ॥ ३ ॥

राष्ट्र बनूनीयां ॥ श्रम करूनीयां ॥
आकांक्षानौका न्या ॥ भाग्यदेशीं ॥ ४ ॥

शक्ति बुद्धि थोर राष्ट्रजना असती ॥
त्याच तुह्मांप्रति ॥ ईशें दिधल्या ॥ ५ ॥

ऐसें असुनी कां रे ॥ दैन्यामध्यें आहां ॥
दुःखपंकीं लोळा ॥ कृमी तैसे ॥ ६ ॥

कर्तृत्व करुनि ॥ साधाहो उद्धार ॥
मिळवा कीर्ती थोर ॥ जनामध्यें ॥ ७ ॥

( १२ )

क्षुद्रकर्तृत्वाचा ॥ अभिमान ज्यांतें ॥
त्यांसि सांगतसें ॥ पाहा गगन ॥ १ ॥

असंख्य जगतें ॥ गगनीं पसरलीं
त्यांतचि ही पृथ्वी ॥ अणुमात्र ॥ २ ॥

ऐसें कर्तृत्व हें ॥ थोर ज्या देवाचें ॥
विसरतां कैसे ॥ तयाप्रति ॥ ३ ॥

( १३ )

पहा अंतरिक्ष देशीं ॥
किती जगतें असती ॥ १ ॥

संख्या तयांची ॥ होईना ॥
कैशीं वागती ॥ कळेना ॥ २ ॥

तयां तोचि ॥ कर्ता आहे ॥
जो ही धरा ॥ धरिताहे ॥ ३ ॥

गगनीं ही ॥ पृथ्वी जेणें ॥
निर्मियेली ॥ लीलाभरें ॥ ४ ॥

तोचि विश्वाचा ॥ जनिता ॥
तोचि तया ॥ चालविता ॥ ५ ॥

तोचि सर्वांचें ॥ निधान ॥
तया भजा ॥ सर्व जन ॥ ६ ॥

( १४ )

ईश्वराचा तुह्मी ॥ न्याय मनीं स्मरा ॥
मार्ग सदा धरा ॥ सत्य शुद्ध ॥ १ ॥
जगताचा कर्ता ॥ सर्व स्थळीं आहे ॥
सदा पाहताहे ॥ अपुलें कर्म ॥ २ ॥
असा भाव सदा ॥ दृढ धरा मनीं
बांधा प्रतिदिनीं ॥ पुण्य गांठी ॥ ३ ॥
सकल प्रेमभावें ॥ नीतिशुद्ध वागा
राष्ट्रहित साधा ॥ दक्षपणें ॥ ४ ॥
राष्ट्र हित जेव्हां ॥ यत्नें वाढवाल
तेव्हां तुह्मी व्हाल ॥ कृतकृत्य ॥ ५ ॥

( १५ )

राष्ट्रभाग्य कैसें ॥ वाढेल ही चिंता
सदा धरा चित्ता ॥ जन तुह्मी ॥ १ ॥
राष्ट्रहित मुख्य ॥ व्यक्तिहित गौण
नेम ऐसा धरूनि ॥ चाला तुह्मी ॥ २ ॥

ऐसा नेम धरूनि ॥ निश्चयें चालाल
तरीच संरक्षाल ॥ भाग्यनौका ॥ ३ ॥

राष्ट्रभाग्य जे जे ॥ जीव वाढवीति
ते ते अनुभवीति ॥ थोर सुखें ॥ ४ ॥

जन्मासि ते येति ॥ शुद्ध थोर कुलीं
वर्षे तयांवरि ॥ ईशकृपा ॥ ५ ॥

( १६ )

अहो धनवंत ॥ ऐका हितबोध ॥
राष्ट्रकार्यी द्रव्य ॥ वेंचा तुह्मीं ॥ १ ॥

राष्ट्रकार्यी जे जे ॥ श्रम करिताति
तुह्मी तयांप्रति ॥ मदत द्यावी ॥ २ ॥

राष्ट्रापासूनीयां ॥ तुह्मा धन मिळे
राष्ट्रभक्तां द्यारे ॥ सहाय्य उचित ॥ ३ ॥

राष्ट्रहित्त विसरूनि ॥ सुखें घेति
तयांसि पुढति ॥ अधोगति ॥ ४ ॥

( १७ )

विरोधाचे हेतु ॥ धरिती पुढारी
ह्मणुनि राष्ट्रोन्नति ॥ होत नसे ॥ १ ॥
एकएकां वैर ॥ नेत्यांसि पडतां
भ्रम जनचित्ता ॥ होत असे ॥ २ ॥
कांहीं एका मिळुनि ॥ कांहीं अन्याप्रति
पक्ष झुंजताति ॥ शत्रुत्वानें ॥ ३ ॥
जातिपक्ष मतपक्ष राष्ट्रीं पडुनि
थोर राष्ट्रहानी ॥ होत असे ॥ ४ ॥

( १८ )

माझे राष्ट्रजन ॥ विनवितों तुह्मां
विरोधासि सांडा ॥ ऐक्य करा ॥ १ ॥
आळसातें सोडा ॥ दीर्घ यत्न धरा
निराशा दवडा ॥ चित्तांतूनि ॥ २ ॥
इतिहासज्ञान उपयोग करा
व्यर्थ जाऊं नका ॥ मनुष्य असुनी ॥ ३ ॥
मनुष्यासि देवें ॥ दिधल्या ज्या शक्ति
त्यांचें सार्थक करुनी ॥ धन्य व्हाहो ॥ ४ ॥

( १९ )

भरूं राष्ट्र ॥ एकचित्तें
सत्यन्याय ॥ घेऊं शस्त्रें ॥ १ ॥

पाप शत्रूला ॥ संहारूं
पुण्योदय ॥ पुन्हा करूं ॥ २ ॥

जगदीश ॥ अमुचा सखा
अमुचा मार्ग ॥ करील सोपा ॥ ३ ॥

उद्योगाचे ॥ मोर्चे लावूं
दारिद्र्याचे ॥ किल्ले पाडूं ॥ ४ ॥

दैन्य अज्ञान ॥ शत्रूंचें
करुं सत्वरि ॥ दमन साचें ॥ ५ ॥

शांतीदेवी ॥ प्रेमें पाहूं
पुण्यश्रीची ॥ भेट घेऊं ॥ ६ ॥

होऊं कृतज्ञ ॥ जगदीशा
जेणें पुरविल्या ॥ शुभाशा ॥ ७ ॥

# पोपट.

## अंजनीगीत.

नरनारीजन तुह्मां प्रार्थितों
पंजरिं पोपट ठेवुं नकाहो
त्यातें दुःखी करितां कांहो
अनपराधी जीवा ॥ १ ॥
तुह्मां जरि कुणि पकडुनि नेलें
बंदीवासामध्यें टाकिलें
होईल काय चित्तामध्यें
सुख तुह्मां सांगा ॥ २ ॥
प्रियकर ते जन दूर राहिले
कारागृह निजदैवीं आलें
ऐसें पाहुनि जीव ओझें
खचित तुह्मां होईल ॥ ३ ॥
जीव जैसा प्रियकर तुह्मां
तसाच प्रियकर असे पोपटा

शाप तयाचे कांहो घेतां
अविचारें तुह्मीं ॥ ४ ॥
पोपटातें बंदिंत टाकुनि
परदुःखातें शीतळ मानुनि
अपराधी ईशाचे होउनि
जोडितसां पापा ॥ ५ ॥
ऐशा पापा करूं नकाहो
पोपट बंदिंत ठेवुं नकाहो
दुःखें अंतर कळवळतें हो
ह्मणुनि तुह्मां प्रार्थीं ॥ ६ ॥

---

## स्वतः

### पद.

कधीं कुणाला ठेवियलें मी
दुःखामध्यें कण्हत कसे
ह्मणुनी मजला त्याचें फळ
आज भेटुनि छळीतसे ॥ १ ॥

आरोग्य नसे संपत्ति नसे
शत्रुजनाची कमति नसे
मित्रवर्ग तो माझ्यासारिखा
धनसत्तांनीं रहित असे ॥ २ ॥

स्वराष्ट्रसेवा व्हावी ह्मणुनी
रात्रंदिन मी कष्टतसें
उलट परिस्थिति जनचित्ताची
मम उत्साहा चुराडितसे ॥ ३ ॥

जो तो स्वार्थी सदैव पाही
राष्ट्रार्थातें पाहात नसे
माझ्यापरि कुणि असती त्यांचा
छळ नानापरि होत असे ॥ ४ ॥

गुणरूपवती साध्वी पत्नी
दुःख पतीचें नुरवितसे
अशी पत्नि मज जरी लाभली
वियोग तीचा पीडितसे ॥ ५ ॥

वर्षीं विसाव्या अपुल्या पत्नी
  मनुष्यलोका सोडितसे
शीलवती सौभाग्यवती मम
  अमरजनांच्या लोकिं वसे ॥ ६ ॥
सव्वीसाव्या वर्षापासुनि
  स्मशान माझें जिणें असे
पूर्वपाप शिक्षा ह्मणुनी
  आयुष्यातें काढितसें ॥ ७ ॥
कधीं ईश्वरा करुणा येइल
  वाट ऐशी पाहतसें
अझुनी करुणा आली नाहीं
  ऐसा अनुभव वाटतसे ॥ ८ ॥

---

## जीव व ईशकृपा.

### साकी.

उत्तम सौख्यें बहुत असती
  सर्व मनेच्छित कालीं

मिळती ज्यातें जीव धन्य तो
ईशकृपा त्या सांभाळी ॥ १ ॥

कांहीं सौख्यांमध्यें असुनी
उणीव इतर सुखांची
ज्यातें चित्तीं पीडा देते
तो न ह्मणो सुखराशी ॥ २ ॥

तळतळ स्वल्पहि नसे जयाला
तोच खरा सुखराशी
सर्व सुखें ज्या तो तरि ऐसा
अथवा पूर्ण विदेही ॥ ३ ॥

हाही नाहीं तोही नाहीं
मध्यम जो तो दुःखी
ईशकृपेविण सुखस्थिति नाहीं
नित्य प्रचीती येते ॥ ४ ॥

असें असूनी तुला ईश्वरा
विसरूं आह्मीं मूढ

सदा बुद्धि दे अंतरिं आह्मां
तव भजनाची शुद्ध ॥ ५ ॥

---

## दुर्जन छळकांस उद्देशून.

### अभंग.

व्यर्थ व्यर्थ व्यर्थ ॥ मज छळितसां
व्यर्थ दवडीतसां ॥ अपुला काल ॥ १ ॥
व्यर्थ व्यर्थ तुमचे ॥ श्रम हे होणार
ईशभक्तछळ ॥ व्यर्थ व्यर्थ ॥ २ ॥
व्यर्थ व्यर्थ माझा ॥ द्वेष करितां कांरे
माझिया चित्तीं रे ॥ तुमचें हित ॥ ३ ॥
मज छळुनीयां ॥ मज दुखवूंनीयां
पालकां माझिया ॥ आणितां क्रोध ॥ ४ ॥
माझे जे पालक ॥ असती दिव्यजन
ते तुह्मां शासन ॥ करितील ॥ ५ ॥
जगांत न्यायाला ॥ सदा जय आहे
मनीं सर्वदा हें ॥ तुह्मीं धरा ॥ ६ ॥

सोसकपणें मीं ॥ जरि सोशीं छळ
काय क्षमा करिल ॥ तुह्मां ईश ॥ ७ ॥
ईश जो सत्याचा ॥ सुदक्ष कैवारी
त्यासि तुह्मीं अरि ॥ करूं नका ॥ ८ ॥

---

## स्वतःस उपदेश लीनतेबद्दल.

### पद.

जग हें चाले ॥
तुजवांचुनि कधिं ना थांबे ॥
ह्मणवुनि ठेवीं लक्ष्य ईश्वरीं ॥
कर्तृत्वीं मीपणासि न धरीं
नीति रक्षुनी शांतीतें वरि ॥
हित तें सांगें ॥
तुजवांचुनि जग हें चाले ॥
जग हें चाले
तुजवांचुनि कधिं ना थांबे ॥ १॥

---

# जीव व कर्म.

## साकी.

देह जाई परंतु जीवा
कर्में सोडित नाहीं
जिवंतपणिंचे कर्मगुंते
देव बरोबर देई ॥ १ ॥
दुसऱ्या जन्मीं स्मरण पूर्वींचें
प्राण्या होत नसे
ह्मणुनी त्यातें अनेकवेळां
अति आश्चर्य वाटे ॥ २ ॥
पहा पहा मी कष्ट करीतों
मजला सुयश मिळेना
ऐसें प्रांणी दुःखें वदतो
पूर्वदुरित स्मरेना ॥ ३ ॥
पूर्वदुरितें क्षयासि जातां
पुण्यउदय होतो

स्वल्प यत्नही थोर फलातें
देउनियां सुखवीतो ॥ ४ ॥

जशी व्यक्तिची तशि राष्ट्राची
स्थिति नेहमीं आहे
राष्ट्रकुकर्में फळासि येतां
त्या अवदशा पाहे ॥ ५ ॥

राष्ट्रकुकर्मैं क्षयासि जातां
पुण्योदय होतो
निर्विघ्नपणें स्वल्पंहि यत्ना
थोर लाभ तो होतो ॥ ६ ॥

मला तशी मम राष्ट्रासंप्राति
दुष्कृतफलस्थिति आहे
धैर्य धरोनी सुमार्ग क्रमितां
येइल शुभास्थिति काळें ॥ ७ ॥

# दिव्यजनांस प्रार्थना

## पद.

( अनियमित. )

स्थळपाल तुह्मीं
  दिव्यजनानों ॥
मला सौख्यस्थिति
  सदाकाल द्याहो ॥
मला संप्रति बहु
  चिंता जाचिती हो ॥
कृपामूर्ती तुह्मीं
  मला सोडवा हो ॥
माझ्या देहा मना
  सुखशांति द्याहो ॥
मला प्रेमें पहा
  ईश अधिकारी हो ॥
माझ्या मेंदूमध्यें
  दुःखभडाका हो ॥

तया दूर करा
  सदा शांति द्याहो ॥
मला कोण सदा
  जाच करिती हो ॥
मला सर्वस्थळीं
  कोण छळिती हो ॥
काय अपराध म्यां
  केले तयांचे हो ॥
स्थळपाळ तुह्मीं
  मला सौख्य द्याहो ॥
मला सौख्यस्थिति
  सदाकाल द्याहो ॥
पहा यत्न किती
  सदा करिं मीहो ॥
मला यश पहा
  कसें येत नाहो ॥
मला सौख्यस्थिति

सदाकाल वाहो ॥
कृपामूर्ती तुझी
दिव्यजनानीं ॥ १ ॥

---

## मनाच्या शुद्धतेसंबंधानें.

### अभंग.

हत्तीतें गंगेच्या ॥ जळानें धुवावें
त्यानें आरंभावें ॥ पूर्वकर्म ॥ १ ॥
तैसें विवेकानें ॥ शुद्ध केलें मन
परि तें मलीन ॥ झालें काळें ॥ २ ॥
अखंड शुद्धता ॥ मना कैशी मिळे
चिंतेनें या पोळे ॥ जीव माझा ॥ ३ ॥
मनाची शुद्धता ॥ पुण्याची जननी
पुण्य भाग्यखाणी ॥ ऐसा नियम ॥ ४ ॥
मनअशुद्धता ॥ पापाची जननी
पाप दुःखखाणी ॥ ऐसा नियम ॥ ५ ॥

बहुदु:खें भोगीं ॥ पूर्वपापफळें
परि पापमुळें ॥ मनीं असती ॥ ६ ॥

पापाचीं हीं मुळें ॥ कशीं नष्ट व्हावीं
जगन्नाथा तुझी ॥ कृपा नसतां ॥ ७ ॥

सर्वव्यापका ॥ हे जगाच्या चालका
मनिंच्या पापबीजा ॥ नष्ट करीं ॥ ८ ॥

---

# होतकरू कवी व स्वदेशभक्त मित्रवर्य कै० दत्तात्रय कोंडो घांटे यांचे स्मरणार्थ.

## अभंग.

घांटे उपनाम ॥ दत्तात्रय नाम
पितयाचें नाम ॥ कोंडोराव ॥ १ ॥

विश्वविद्यालयीं ॥ शिक्षणांत असतां
माझा मित्र होता ॥ दत्तात्रय ॥ २ ॥

शांतमूर्ती प्रीति ॥ अंतारें साजिरी
भक्ती परमेश्वरीं ॥ परमोत्तम ॥ ३ ॥

मराठी कविता ॥ करी प्रासादीक
ऐसा दत्तात्रय ॥ मित्र भला ॥ ४ ॥

विश्वविद्यालयक्रम संपल्यावरी
थोर हेतु धरी ॥ राष्ट्रकार्यी ॥ ५ ॥

अकालीं कालाचें ॥ मूळ येऊनीयां
स्वर्गी दत्तात्रेया ॥ जाणें झालें ॥ ६ ॥

देशकार्यहेतु ॥ तसेच राहिले
चित्त दुखावलें ॥ सन्मित्रांचें ॥ ७ ॥

आतां दत्तात्रेया ॥ माझ्या प्रियमित्रा
केव्हांरे मजला ॥ भेटशील ॥ ८ ॥

काय भेटशील ॥ मज जन्मांतरीं
अथवा स्वर्गधामीं ॥ देशिल भेटी ॥ ९ ॥

कोठें दत्तात्रय ॥ शुद्ध आत्मा असेल
काय करित असेल ॥ मनीं येई ॥ १० ॥

स्वपत्नीशिक्षणासाठीं दत्तात्रयें
परिश्रम घेतले ॥ मजला सांगे ॥ ११ ॥

पत्नीपासूनीयां ॥ मित्रांपासूनीयां
कोठें दूर कायीं ॥ दत्त गेला ॥ १२ ॥

कोठें विश्वनाथें ॥ दत्तात्रय नेला
आमुतें दिधला ॥ कां वियोग ॥ १३ ॥

जगन्नाथा पुढें ॥ मित्रासि भेटवीं
प्रीतितें वाढवीं ॥ अधिकाधिक ॥ १४ ॥

---

## राष्ट्रीयधोरणासंबंधानें.

### अभंग.

(१)

राष्ट्रभाग्यासाठीं ॥ स्वतः जे कष्टति
तेचि धन्य होती ॥ योग्यकालें ॥ १ ॥

जे जे अन्यावरी ॥ विश्वासूनि गेले
ते ते पुढें बनले ॥ त्यांचे दास ॥ २ ॥

ऐसा इतिहासीं ॥ सर्वत्र अनुभव
ह्मणुनि बांधव ॥ विवेकी व्हा ॥ ३ ॥
मिळेना या जगीं ॥ फुकट कांहींही
नसती कोणीही ॥ साधूराष्ट्रें ॥ ४ ॥
राजनीतिमध्यें ॥ सर्व स्वार्थपर
कोणी कमी थोर ॥ स्वार्थी असती ॥ ५ ॥
पर-अंजुळीनें ॥ पाणी पिऊं ह्मणति
तयांची फजिती ॥ सदा होते ॥ ६ ॥
जाणुनि हें तुह्मी ॥ व्हा रे व्हा सावध
आजवरि घात ॥ पुरे झाला ॥ ७ ॥

( २ )

असोत कोणीहि ॥ जपानी वा चिनी
अथवा जर्मनीवाले लोक ॥ १ ॥
असोत दुसरे ॥ अन्य कोणी जन
दाउत मित्रत्व ॥ त्यांची खुषी ॥ २ ॥
आपण कुणाचा ॥ घात न करावा
परि न सोडावा ॥ स्वदेशार्थ ॥ ३ ॥

विश्वासावें तुह्मी ॥ आपणासि मात्र
तैसें न अन्यत्र ॥ द्यावें प्रेम ॥ ४ ॥
जैसें प्रत्येकाचें ॥ आपणावरि प्रेम
तैसें प्रेमस्थान ॥ अन्य नाहीं ॥ ५ ॥
सृष्टीचा नियम ॥ अनादिसिद्ध हा
त्यासि कोणी कदा ॥ सोडूं न शके ॥ ६ ॥
सोडिला दाविती ॥ ते खरे नसती
ते ठक असती ॥ परघाती ॥ ७ ॥

( ३ )

पदोपदीं इतिहासीं अनुभव ॥
जे जे भोळे लोक ॥ ते फसती ॥ १ ॥
बाह्यरूप गोड ॥ शठ सदा घेती
चित्तीं कपटनीति ॥ सदा त्यांच्या ॥ २ ॥
कपटनीतीनें ॥ भोळीं राष्ट्रें फसती
लवकरि जाती ॥ पूर्णनाशा ॥ ३ ॥
ऐशीं आजवरि ॥ बहुत नष्ट झालीं
तीच सध्यां पाळी ॥ दिसे कितिकां ॥ ४ ॥

ऐशा भोळेपणें ॥ माझ्या आर्यदेशीं
आजवरि धक्के ॥ बहुत खाल्ले ॥ ५ ॥
परि ईशकृपा ॥ वेळोवेळीं झाली
ह्मणुनि टळली ॥ नष्ट वेळा ॥ ६ ॥
जगदीशा माझ्या ॥ राष्ट्र जाग देई ॥
भोळेपण काढीं ॥ जें नाशक ॥ ७ ॥
स्वतःवरि मात्र ॥ ठेवुनि विश्वास
होवो माझा देश ॥ नीतिचतुर ॥ ८ ॥
पूर्णनीतिचतुर ॥ होवो आर्यदेश
करुनीयां कष्ट ॥ होवो थोर ॥ ९ ॥
ईशकृपा आर्यदेशभाग्य रक्षो
सर्वदा वाढवो ॥ शुद्ध यश ॥ १० ॥
आर्यदेश जगामध्यें थोर होवो
परि न घात करो ॥ कधिं कुणाचा ॥ ११ ॥

---

## प्रियपत्नीचें स्मारक.

### अभंग.

फार इच्छा मनीं ॥ होती कीं पत्नीसि
निजदेशभक्ति ॥ शिकवावी ॥ १ ॥

पत्नीच्या अकाल मृत्यूनें चुरडीला
माझा हेतु भला ॥ अकस्मात ॥ २ ॥

स्त्रियांचा स्वदेशाभिमान पुस्तक
हेतूचें स्मारक ॥ केलें आहे ॥ ३ ॥

पुस्तक फुकट ॥ स्त्रियांतें वांटिलें
नारीजनां झालें ॥ फार प्रिय ॥ ४ ॥

---

## स्वतःचे कुलासंबंधी वगैरे थोडी माहिती

### अभंग.

ईश्वरकृपेनें ॥ महाराष्ट्रदेशीं
जन्म विप्रवंशीं माझा झाला ॥ १ ॥

रत्नागिरी प्रांतीं ॥ राजापूर भागीं
आडिवरें गांवीं ॥ जन्मस्थळ ॥ २ ॥
आडिवरें ग्रामीं ॥ माता प्रसवली
जेथें **श्रीमहाकाली** ॥ नांदताहे ॥ ३ ॥
जन्मस्थळ भाग ॥ पूर्व कोणसर
गृह नवेदर ॥ पूर्वभागीं ॥ ४ ॥
शालीवाहन शके ॥ सतराशें पंचाणव
श्रीमुख संवत्सर ॥ जन्मवर्ष ॥ ५ ॥
मातेच्या माहेरीं ॥ मम जन्म झाला
शुद्ध दशमीला ॥ कार्तिकांत ॥ ६ ॥
वार्षिक पालखी ॥ **श्रीसत्येश्वराची**
जेधवां अंवशीं ॥ फिरत होती ॥ ७ ॥
मातामहगृहावरुनीयां गेली ॥
देवाची पालखी ॥ त्याच वेळे ॥ ८ ॥
नांव **वामन** ऐसें ॥ पितयानें ठेविलें
पुढती प्रिय झालें ॥ तेंच जना ॥ ९ ॥

( २ )

**महादेव** मम ॥ मातामह नाम
रानडे उपनाम ॥ तया कुला ॥ १ ॥

शांतमूर्ती त्याची ॥ जेव्हां मनीं येते
तेव्हां सुखी होतें ॥ माझें मन ॥ २ ॥

वेदाभ्यासरत ॥ ईश्वराचा भक्त
शुद्धाचारनिष्ठ ॥ विप्र होता ॥ ३ ॥

( ३ )

गोत्र श्री**शांडिल्य** ॥ उपनाम जोशी
ऐशिया कुळासि ॥ जन्मा आलों ॥ १ ॥

**जानकी** मातेचें ॥ माझ्या नाम आहे
पितयाचें नाम ॥ **रामचंद्र** ॥ २ ॥

सत्यशील शुद्ध ॥ उदार धार्मिक
दक्ष पुण्यवंत ॥ पिता मम ॥ ३ ॥

**सत्येश्वर**पदा ॥ गेला गतवर्षी
शुद्ध प्रतिपदेसि ॥ माघमासीं ॥ ४ ॥

शालीवाहन शके ॥ अठराशें सव्वीशीं
क्रोधी संवत्सरीं ॥ जाय पिता ॥ ५ ॥

( ४ )

शालीवाहन शक ॥ अठराशें अकरांत
वैशाखमासांत ॥ विवाह झाला ॥ १ ॥
लग्नसमयीं वर्ष ॥ सोळावें मज होतें
दहावें वर्ष होतें ॥ पत्नीप्रति ॥ २ ॥
**सरस्वती** नाम ॥ पत्नीचें ठेविलें
पुढती प्रेमें दिलें ॥ नाम **विजया** ॥ ३ ॥
पत्नी सुख झालें ॥ पूर्वपुण्यें कांहीं
पुण्य संपतां पाहीं ॥ जाय पत्नी ॥ ४ ॥
पत्नीसुख मज ॥ झालें तें कोंकणीं
आडिवरें ग्रामीं ॥ निजगृहीं ॥ ५ ॥
मुंबई शहरीं ॥ पत्नीचे करींचें
अन्न न सेविलें ॥ एकहि दिन ॥ ६ ॥
बिऱ्हाड करण्या ॥ ह्मणुनि मुंबईसीं
आणिली पत्नीसी ॥ परि दुर्दैवें ॥ ७ ॥

पत्नीची प्रकृति ॥ तापानें विघडली
पुढती क्षयें केली ॥ फार पीडा ॥ ८ ॥
शालीवाहन शके ॥ अठराशें एकविशीं
श्रावण वद्यपक्षीं ॥ चतुर्थीसीं ॥ ९ ॥
गुरुवारीं दोनप्रहरीं मुंबईंत
पत्नीचा देहान्त झाला असे ॥ १० ॥

( ५ )

आडिवऱ्यापासोनी ॥ तीन कोसांवरि
जैतापुराजवळी ॥ दळेंगांव ॥ १ ॥
तेथें नेनेकुळीं ॥ ममपत्नी जन्मली
नांव होतें **भली** ॥ माहेरींचें ॥ २ ॥
पत्नीच्या पितयाचें ॥ **गंगाधर** नाम
तया होतें प्रेम ॥ ईश्वरभजनीं ॥ ३ ॥
सरळ सत्यनिष्ठ ॥ होता सदाचारी
अंतकाळीं करी ॥ काशीयात्रा ॥ ४ ॥
काशीयात्रे गेला ॥ परत न आला
निजसंनिध केला ॥ **विश्वेश्वरें** ॥ ५ ॥

# ईश्वराची प्रार्थना.

## ( चित्तशुद्धता अखंड असण्यासाठीं. )

### अभंग.

झाले जे जे दोष ॥ पूर्ण दूर करीं
सदा शुद्ध ठेवीं ॥ जगदीशा ॥ १ ॥
हानी आजवरि ॥ दोषांमुळें झाली
दुःखराशी आली ॥ दोषांमुळें ॥ २ ॥
दोष सर्व होत ॥ चित्त अस्थिरत्वें
नोतिस्थिरचित्तें ॥ पाप नोहे ॥ ३ ॥
सर्व सृष्टीला तूं ॥ अससी आधार
तुजहूनि थोर ॥ कोणी नाहीं ॥ ४ ॥
तुजला शरणागत ईशा आलों
जेधवां जाहलों ॥ अनुतापी ॥ ५ ॥

( २ )

अनुताप तुला ॥ सर्व भावें भजें
मज अभय द्यावें ॥ विश्वनाथा ॥ १ ॥

विश्वनाथा ईशा ॥ जगाच्या चालका
करीं तुझा धांवा ॥ संरक्षावें ॥ २ ॥
शुद्धता मनाची ॥ संरक्षावी सदा
द्यावी मना सदा ॥ शुद्धशांति ॥ ३ ॥
शरीर तूं माझें ॥ सदा संरक्षावें
नीतिशुद्ध सुखें ॥ मला द्यावीं ॥ ४ ॥
तुजवांचूनीयां ॥ कोठेंहि विश्वास
माझा न राहत ॥ खरें सांगें ॥ ५ ॥
स्वतः माझ्यावरि ॥ माझा न विश्वास
माझें अस्थिरत्व ॥ मज कळे ॥ ६ ॥
अनंता अच्युता ॥ सत्यमूर्ते ईशा
मजचंचलचित्ता ॥ करीं स्थिर ॥ ७ ॥
स्थिरता नीतींत ॥ ममचित्ता द्यावी
सदा संरक्षावी ॥ पुण्यनाका ॥ ८ ॥

( ३ )

जरि तूं चित्तांत ॥ धरिशी कैवार
जनही हा सर्व ॥ वळेल मज ॥ १ ॥

नाहीं तुझी कृपा ॥ ह्मणुनि द्रव्याभाव
शत्रूचा सुकाळ ॥ याच योगें ॥ २ ॥
तुजला संतोष ॥ कैसा मी देईन
कैशी संपादीन ॥ तुझी कृपा ॥ ३ ॥
संपादूनि कृपा ॥ केव्हां सुखी होईन
केव्हां दैन्य जाईल ॥ पूर्णनाशा ॥ ४ ॥
ऐसा ध्यास चित्तीं ॥ मजला लागला
तेणें जीव झाला ॥ बहु उदासी ॥ ५ ॥
वाटे मनीं कीं जें ॥ कर्म मी करीत
काय तें होईल ॥ प्रिय ईशा ॥ ६ ॥
मनें संशय घेतां ॥ बहुदुःखी होई
वारंवार होई ॥ कष्टी जीव ॥ ७ ॥
ह्मणुनि सर्वेशा ॥ सर्व भावें तुला
शरणागत आला ॥ हा **वामन** ॥ ८ ॥
मज संभाळावें ॥ अभय मज द्यावें
सर्व दुःख न्यावें ॥ पूर्णनाशा ॥ ९ ॥

# मांसमद्याहारी जनास बोध.

## अभंग.

### ( १ )

नकारे नकारे ॥ करूं अपुला नाश
नका नका मांस ॥ सेवूं तुह्मीं ॥ १ ॥
आत्म-अधोगती ॥ होते मांसाशनें
मनीं हें धरणें ॥ तुह्मीं सदा ॥ २ ॥
कोणाहि प्राण्याचें ॥ खाऊ नये मांस
त्याचें मिळतें पाप ॥ मांसाशनें ॥ ३ ॥
देह सर्वां प्रिय ॥ त्याचा करूनि अंत
कांहो जीव शाप ॥ तुह्मीं घेतां ॥ ४ ॥
कोणी ह्मणती आह्मीं ॥ स्वतः न मारितों
प्राण्यासि भक्षितों ॥ अन्यहतां ॥ ५ ॥
जाणसी हें न कीं ॥ पापासि कारण
होताति आपण ॥ सदाकाळ ॥ ६ ॥
जरी मांसाशनी ॥ लोक जगीं नसती
काय होईल ती ॥ प्राणिहत्या ॥ ७ ॥

भक्ष्यासाठीं प्राणीहत्या करितातिं
अथवा करवीती ॥ दोषी उभय ॥ ८ ॥
परि दुष्टहिंसा ॥ जगद्धितासाठीं
ही तों समजावी ॥ भूतदया ॥ ९ ॥

( २ )

नकोरे नकोरे ॥ मद्यपान करूं
अंतरीं विचारू ॥ धरा कांहीं ॥ १ ॥
व्यर्थ बुद्धीदेहनाश कां करितां
अधोगती नेतां ॥ कांरे जीव ॥ २ ॥
ईश्वरें निर्मळ जळ ॥ उत्तम पेय
केली आहे सोय ॥ तृषेसाठीं ॥ ३ ॥
ईश्वरें उत्तम ॥ फळें मुळें धान्यें
यांसि निर्मायेलें ॥ क्षुधेसाठीं ॥ ४ ॥
अभक्ष्य पदार्थ ॥ सेवन कां करितां
कांरे नाश करितां ॥ स्वपुण्याचा ॥ ५ ॥
नका नका मद्यमांसाशनी होऊं
प्रेमें हितबोधु ॥ तुह्मां सांगें ॥ ६ ॥

# भाग्यदेवतांची प्रार्थना.

## पद.

( अनियमित. )

मला सुप्रसन्न व्हा
भाग्यदेवताहो ॥
दुःखपाशांतुनि
मला सोडवाहो ॥
जगदीशाधि-कृत
दिव्यदेवताहो ॥
सर्व दोष मम
नष्ट करा हो ॥
पुण्य प्रिय कीं तुह्मीं
भाग्यदेवता हो ॥
मला पुण्यवृद्धि द्या
प्रतिप्रतिक्षणीं हो ॥

क्षमा करा मजला
पूर्व अपराध हो ॥
पूर्ण निरपराधिता
सदा मला द्याहो ॥
सर्वकालीं तसें
सर्व स्थळीं हो ॥
संरक्षावें मला
भाग्यदेवताहो ॥
जगन्नाथस्मृति
मला सदा द्याहो ॥
जगत्पालकाची त्या
सदा भक्ति द्याहो ॥
कृपासाउली मला
द्यावि देवता हो ॥
सत्यन्यायप्रिय तुह्मी
भाग्यदेवता हो ॥

सत्यन्यायपूर्ण मम
शील ठेवा हो ॥
सदा विजय मजला
द्यावा देवताहो ॥
भावना आपली
उचित करुनि घ्याहो ॥
मला सर्वपरि
निजपदरिं घ्याहो ॥
मला दुःखमुक्त करा
भाग्यदेवताहो ॥
मला शुद्धशांति द्या
सदा अंतरींहो ॥
तुह्मीं कनवाळु हो
दिव्यदेवतांनो ॥
तुह्मीं अव्यक्त परि
सत्य तुह्मीं आहांहो ॥

तुमची कृपा नसतां
फार फार हाल हो ॥
ईशभक्त शुद्ध जो
तुह्मां प्रिय तो हो ॥
देशभक्त सुजन जो
तुह्मां प्रिय तो हो ॥
मम पूर्वदोष ते
नष्ट करा सर्व हो ॥
पूर्ण शुद्धता मला
सदाकाल द्याहो ॥
तुह्मां शरणागत हा
मनुज वामन हो ॥
पदरीं यातें तुह्मीं
कृपा करुनि घ्याहो ॥
मला प्रेमें पहा
भाग्यदेवतांनों ॥

तुह्मीं थोर अहा
भाग्य देवतांनो ॥
नम्र आहें तुह्मां
मला संरक्षाहो ॥
फार ताप सोशितों
दया दाखवाहो ॥
ताप सर्व हरा
मला सौख्य द्याहो ॥
काय जास्त वदूं
माझे विविध हालहो ॥
कष्टदायी जिणें
मला वाटतें हो ॥
तुह्मां दुःख पहा
सांगें भक्तीनें हो ॥
मला सांभाळा तुह्मी
भाग्यदेवता हो ॥

मम भाग्य कुठें
लुप्त झालेंहो ॥
मला पुन्हां भाग्य द्या
दिव्यदेवताहो ॥
माझी स्थिति बदला
दिव्यदेवताहो ॥
सौख्य स्थिति मज द्या
भाग्यदेवताहो ॥
पहा दुःखें कशीं
मला गांजिती हो ॥
पहा शत्रू कसे
मला छळिती हो ॥
पहा झोंप कशी
येत नसे हो ॥
पहा जगुनि मृतसा
मी आहें हो ॥

मला तारा तारा
भाग्यदेवता हो ॥ १ ॥

---

## स्वराष्ट्रबांधवांस हितबोध.

### अभंग.

### (१)

बुद्धिदास्य टाका ॥ स्वतः शोधूं लाग।
सत्यासत्य भेदा ॥ जन तुह्मी ॥ १ ॥
ईश्वरें तुह्मांला ॥ बुद्धी जी दीधली
कार्यासि लाविली ॥ तरी भलें ॥ २ ॥
बुद्धीचा उपयोग ॥ स्वतः जे न करिती
ते ते बंदे होते ॥ दूसऱ्यांचे ॥ ३ ॥
व्यर्थ मांसगोळे ॥ वाढावें कशाला
व्यर्थ जन्म गेला ॥ पशुपरी ॥ ४ ॥
सदुपयोग जे जे ॥ बुद्धीचा न करिती
त्यांतें सदा स्थिति ॥ पशुसम ॥ ५ ॥

ह्मणुनि मानवबांधवहो ऐका
उपयोग करा ॥ स्वबुद्धीचा ॥ ६ ॥

( २ )

वृक्षवेली कृमि ॥ मच्छ पशुपक्षी
वाढती मरती ॥ सर्व प्राणी ॥ १ ॥

त्यांचिया योग्य ते ॥ जाती जे मानव
त्यांचें जिणें व्यर्थ ॥ मनुष्यरूपें ॥ २ ॥

माझ्या राष्ट्रीं सध्यां ॥ मनुष्यरूपें वृक्ष
असती पशुसंघ ॥ मनुष्यरूपें ॥ ३ ॥

जन्मा आले पुढें ॥ वाढले व मेले
नच कांहीं केलें ॥ देशहित ॥ ४ ॥

आयुष्य उनाडपणें व्यर्थ गेलें
अथवा व्यर्थ नेलें ॥ आळसांत ॥ ५ ॥

देशहित मनीं ॥ कधीं न आणिलें
कष्ट न सोशिले ॥ देशासाठीं ॥ ६ ॥

इंद्रियांची तृप्ति ॥ सदा करण्यासाठीं
कांहीं अब्रूनीति ॥ न पाहिली ॥ ७ ॥

धर्माचे निर्वंध ॥ निःशंक मोडिले
मनीं न निवडीलें ॥ पुण्यपाप ॥ ८ ॥

ऐसे मनुष्य बहुत ॥ आहेत या देशीं
ह्मणुनि हा सोशी ॥ अवदशा ॥ ९ ॥

( ३ )

कर्त्या पूर्वजांचे ॥ स्वर्गीं आत्मे असती
ते तुह्मां पाहती ॥ दुःखाचित्तें ॥ १ ॥

जे जे पूर्वीं होते ॥ देशकार्यनिष्ठ
त्यांचे तळमळत ॥ असती जीव ॥ २ ॥

ज्यांच्या वंशीं तुह्मी ॥ जन्म घालवीतां
त्यांसि सदा देतां ॥ फार दुःख ॥ ३ ॥

देशस्थिति अपुली ॥ पूर्वज पाहाति
दुःखांत क्रमिति ॥ अपुला काळ ॥ ४ ॥

व्हारे व्हा सावध ॥ व्हारे देशभक्त
कष्टें देशहित ॥ वाढवाहो ॥ ५ ॥

न्यायमार्गें कष्टा ॥ पूर्वजां तोषवा
देशोन्नति साधा ॥ धन्य व्हारे ॥ ६ ॥

( ४ )

देश तुह्मां असे ॥ सर्वांसि समान
क्षुद्र अभिमान ॥ तुह्मीं टाका ॥ १ ॥

देशभाग्य संपादन हाचि धर्म
सकल मानून ॥ कां न वागा ॥ २ ॥

ईशभक्ति देशभक्ति करा सर्व
माना गोष्टी इतर ॥ क्षुद्र गौण ॥ ३ ॥

क्षुद्रगोष्टींप्रति ॥ महत्व न द्यावें
नच वाढवावें ॥ देशीं वैर ॥ ४ ॥

क्षुद्र गोष्टींप्रति ॥ देतात महत्व
ह्मणुनि वाढत ॥ कलह देशीं ॥ ५ ॥

देशांत कलह ॥ वागतो ह्मणुनी
आपुली भाग्यहानी ॥ चाललीसे ॥ ६ ॥

अजुनि तरि बंधु ॥ व्हारे व्हा सावध
नका पडूं धुंद ॥ अभिमानांत ॥ ७ ॥

सर्व एकचित्त करूनीयां वागा
देशहित साधा ॥ व्हारे धन्य ॥ ८ ॥

( ५ )

अनंत दशदिशां ॥ पसरला पैस
तोचि जगदीश ॥ जाणा तुह्मीं ॥ १ ॥

तोचि जगा सदा ॥ न्यायें पाळीताहे
त्यातें भजताहे ॥ तोचि धन्य ॥ २ ॥

त्यातें तुह्मीं भजा ॥ एकचित्त असा
देशहित साधा ॥ सत्यमार्गें ॥ ३ ॥

सत्यमार्गें जातां ॥ कंटक जे असती
तयांची फजिती ॥ करा नीट ॥ ४ ॥

न्याय पाळुनियां ॥ नीति रक्षूनीयां
ईश करुनीयां ॥ सखा आपुला ॥ ५ ॥

अकारण विघ्नें ॥ जे जे कोणी करिती
त्यांसि शिक्षागति ॥ द्यावी चोख ॥ ६ ॥

नीतीनें वागावें ॥ सत्यानें श्रमावें
सुखातें मिळवावें ॥ न्यायमार्गें ॥ ७ ॥

स्वतः सुख घ्यावें ॥ परांसि सुखवावें
अन्याय करावे ॥ न कोणाचे ॥ ८ ॥

दुष्ट ते मर्दावे ॥ संत ते पुजावे
सरळ करावे ॥ कुटिल त्यांतें ॥ ९ ॥

अनाथांसि द्यावा ॥ प्रेमानें आधार
क्रूर छद्मीनर ॥ त्यां दंडावे ॥ १० ॥

थोर थोर संघ ॥ आर्यांचे करावे
तेणें वाढवावें ॥ जगद्धित ॥ ११ ॥

आर्यदेश जगीं ॥ अग्रणी करावा
परी न बुडवावा ॥ परदेश ॥ १२ ॥

( ६ )

भले भले कोणी ॥ ह्मणवीत आहां
सर्व एकत्र व्हा ॥ देशासाठीं ॥ १ ॥
देशासाठीं क्षुद्र ॥ भेदांतें विसरा
एकचित्त करा ॥ सुविवेकें ॥ २ ॥
सुविवेक धरा ॥ बुद्धीदास्य टाका
सत्यासत्य विवरा ॥ अंतरांत ॥ ३ ॥
अंतरांत शोधा ॥ अभाग्य कारणें
शोधूनियां त्यांतें ॥ दूर धरा ॥ ४ ॥
दूर धरा देशहानीच्या त्या गोष्टी
भाग्यप्रद गोष्टी ॥ धरा जवळी ॥ ५ ॥

( ७ )

पुनः पुन्हां तुह्मां ॥ विनवूं मी काय
भावीकालसोय ॥ मनीं आणा ॥ १ ॥
आतांचा जो क्षण ॥ तो मात्र पाहुनि
क्षुद्रसुखें फसुनि ॥ जाऊं नका ॥ २ ॥

तोंडावरि गोड बोले तोचि सखा
ऐसा निश्चय देखा ॥ नका करूं ॥ ३ ॥
दूरवर पहा ॥ अंतरीं विचार
बुद्धीचा उपयोग ॥ करूनीयां ॥ ४ ॥
दूरदृष्टि धरुनि ॥ विचार करितां
दिसे योग्य चित्ता ॥ तोंचि वरा ॥ ५ ॥
भावीकाल सदा ॥ मनीं धरा तुह्मी
जीव हा अविनाशी ॥ मनीं जाणा ॥ ६ ॥
तुमचे जीव तसे ॥ तुमच्या संततीचे
सुखी होतील कसे ॥ मनीं विवरा ॥ ७ ॥
उगाच बैसतां ॥ खेळतां फिरतां
कैसे व्यर्थ जातां ॥ तुह्मीं जन ॥ ८ ॥
बुद्धीमंत तुह्मीं ॥ असूनीयां कांरे
फुकट जातांरे ॥ माझे बंधु ॥ ९ ॥

( ८ )

माझे आर्यबंधु ॥ विनवीं तुह्मांसि
राष्ट्रघटनेसि ॥ मदत करा ॥ १ ॥

एकजीवापरि ॥ राष्ट्र केल्याविण
राष्ट्रोन्नति जाणा ॥ कधीं नोहे ॥ २ ॥

वाचीत हें तुह्मीं ॥ सदासर्वकाळीं
कैशी बुद्धि अपुली ॥ फुकट नेतां ॥ ३ ॥

एकदिवशीं तुह्मां ॥ मृत्यु हा नेईल
जबानी घेईल ॥ चरित्राची ॥ ४ ॥

काय त्यांतें सांगाल ॥ तुह्मीं जबानींत
काय देशहित ॥ तुह्मीं केलें ॥ ५ ॥

प्रत्येकानें असें ॥ सर्वदा वागावें
कीं अंतीं त्या ॥ व्हावें समाधान ॥ ६ ॥

समाधान अंतीं ॥ व्हावें कीं आपण
कर्तव्य जगून ॥ केलें आहे ॥ ७ ॥

शक्य तें कर्तव्य ॥ केलें असे सदा
मरणाची पर्वा ॥ नसे मज ॥ ८ ॥

असें अंतसमयीं ॥ जो ह्मणूं शकेल
तो सत्य जाईल ॥ श्रेष्ठधामा ॥ ९ ॥

( ९ )

माझी जन्मभाषा ॥ तेजयुक्त होवो
सर्व दिशां जावो ॥ पसरत ॥ १ ॥

सनातन धर्मतेज भरो जनीं
पसरो भुवनीं ॥ दाही दिशा ॥ २ ॥

कलाउद्यमनिष्ट ॥ महेशबांधव
अपार धनयुक्त ॥ सदा असुत ॥ ३ ॥

पृथ्वीवरि सर्व देशांत व्यापार
करुनि समृद्ध ॥ सदा असुत ॥ ४ ॥

पुण्यसूर्य तपसूर्य नरसूर्य
माझ्या राष्ट्रीं असुत सदाकाल ॥ ५ ॥

धर्माचें भवन ॥ प्रताप निधान
माझें राष्ट्रस्थान ॥ सदा असो ॥ ६ ॥

शुद्ध वैभवतेज ॥ शुद्ध विद्यातेज
माझ्या राष्ट्रीं सहज ॥ सदा असो ॥ ७ ॥

( १० )

जीं जीं कर्मे आह्मीं प्राणी करीतसों
त्यांचा संचय होतो ॥ स्वमूर्तींत ॥ १ ॥

जीं जीं कर्मे राष्ट्ररूपें करीतसों
त्यांचा संचय होतो राष्ट्रतनुंत ॥ २ ॥

कर्मबीज कालक्षेत्रीं जें पेरावें
तें तें फळा यावें हा नियम ॥ ३ ॥

आह्मीं जें पेरिलें ॥ त्याचीं फळें घेतों
आतां जें पेरितों ॥ फळेल पुढती ॥ ४ ॥

जीं जीं सुखें आह्मां ॥ पुढें पाहिजेत
त्यांचें आतां बीज ॥ पेरणें उचित ॥ ५

आतांचा हा काळ ॥ वांयां दवडूं तरि
पुढति दैन्यास्थिति ॥ हेंचि फळ ॥ ६ ॥

आतांच्या काळाचें ॥ करूं सार्थक तरि
पुढतीं स्थिति बरि ॥ खचित पाहूं ॥ ७

विचार हा करुनि ॥ आळस टाकूंया
कर्तव्य करूंया ॥ सुविवेकें ॥ ८ ॥

---

# स्वराष्ट्रास भावी स्थिति कशी असावी.

## अभंग.

भूवरि कोठेंहि ॥ जातां मद्बांधव
तयांचा गौरव ॥ पाहिन केव्हां ॥ १ ॥

सर्व राष्ट्रांप्रिय ॥ सर्व राष्ट्रांमान्य
केधवां पाहीन ॥ माझें राष्ट्र ॥ २ ॥

पितृगृहीं सौख्यें ॥ जन वसती तैसे
कोठेंहि भूवरते ॥ राहू केव्हां ॥ ३ ॥

समुद्र पर्वत ॥ नद्या वनें पुरें
आह्मां सुखकरें ॥ कैशीं होतिल ॥ ४ ॥

दैन्यस्थिति आज ॥ आहे जी राष्ट्रासि
जाउनि ती कैशी ॥ होऊं सुखी ॥ ५ ॥

विचार हे ऐसे ॥ मनीं सदा असती
तयां जगत्पति ॥ रक्षीताहे ॥ ६ ॥

---

# स्वराष्ट्रास आशीर्वाद.

## अभंग.

शाश्वतत्वगुण ॥ परमेश्वराचा
माझिया राष्ट्राचा ॥ गुण होवो ॥ १ ॥
शक्ति अधिष्ठान ॥ गुण आकाशाचा
माझिया राष्ट्राचा ॥ गुण होवो ॥ २ ॥
महावेग गुण ॥ असे जो पवनाचा
माझिया राष्ट्राचा ॥ गुण होवो ॥ ३ ॥
सुप्रकाश गुण ॥ जो असे अग्नीचा
माझिया राष्ट्राचा ॥ गुण होवो ॥ ४ ॥
आनंद हा गुण ॥ जो असे जलाचा
माझिया राष्ट्राचा ॥ गुण होवो ॥ ५ ॥

सृष्टीपोषकत्व ॥ गुण हा पृथ्वीचा
माझिया राष्ट्राचा ॥ गुण होवो ॥ ६ ॥

---

## स्वतःच्या पुढील जन्मासंबंधानें.

### अभंग.

मरणानें पूर्वविस्मरण पडे
नवा जन्म मिळे ॥ पुढें प्राण्या ॥ १ ॥

तैशी मज पुढें ॥ विस्मृति पडेल
कांहीं न राहील ॥ पूर्वस्मृति ॥ २ ॥

सध्यांचे जे कष्ट ॥ मज होत असती
त्यांचि पुढें स्मृति ॥ नसेल कांहीं ॥ ३ ॥

परि कदाचित ॥ असेंहि घडेल
माझे ग्रंथ वाचीन ॥ पुढील जन्मीं ॥ ४ ॥

माझेच ग्रंथ मी ॥ वाचीन पुढतीं
तेव्हां मनस्थिति ॥ होइल कैशी ॥ ५ ॥

जे जे हेतु माझे ॥ अपुरे या जन्मीं
राहातील त्यांची ॥ जागृति पुढें ॥ ६ ।

मनीं माझ्या सहजाचि होऊनीयां
पुन्हां देशकार्या ॥ लागेन मी ॥ ७ ॥

सध्यांचें हें नांव ॥ देहासह जाईल
परि न मन जाईल ॥ देहासवें ॥ ८ ।

मन देहासवें ॥ अन्यदेहीं जाईल
बरोबरी नेइल ॥ सर्व हेतु ॥ ९ ॥

हेतु जे या जन्मीं ॥ पूर्व दुष्कर्मानें
यशास न आले ॥ मनिंच ठेले ॥ १०

तेच शुभ हेतु ॥ दीर्घप्रयत्नानें
ईश्वरमदतीनें ॥ नेइन सिद्धी ॥ ११ ॥

# सत्यहेतूंचें सामर्थ्य.

## अभंग.

सत्य हेतु मनीं ॥ प्रथम उद्भवति
मग परिस्थिति ॥ मिळे योग्य ॥ १ ॥
कैसे सत्य हेतु ॥ इष्ट परिस्थिति
जगीं बनवीति ॥ परमगूढ ॥ २ ॥
सत्यहेतु महाशक्तीरूप असती
सजहाचि होती ॥ सृष्टीकर्ते ॥ ३ ॥
हेतु जरि अपुले ॥ गूढ त्यांचें रूप
त्यांचा नीट थांग ॥ नच लागे ॥ ४ ॥
ज्या ज्या योग्यतेचे ॥ शुद्ध हेतु असती
त्याच योग्यतेची ॥ परिस्थिति ॥ ५ ॥
मिळते क्रमानें ॥ जीवा हा अनुभव
सर्वकाळीं येत ॥ प्रत्येकाला ॥ ६ ॥
सत्याचा अभिमान ॥ आहे जगदीशा
सत्यमार्ग सोपा ॥ तोचि करीं ॥ ७ ॥

दुःखें जीं भोगिती ॥ जगामध्यें प्राणी
त्यांचें कारण तुह्मीं ॥ मनीं शोधा ॥ ८ ॥

ईश्वरी नियमाविरुद्ध वर्तन
हें दुःख कारण ॥ सत्य असे ॥ ९ ॥

---

## मित्रांस उद्देशून.

( स्वतःच्या स्मारकासंबंधानें
स्वतःच्या राष्ट्रीयहेतूंसंबंधानें. )

### अभंग.

देह अशाश्वत ॥ ह्मणुनि सांगतों
माझे सन्मित्रहो ॥ तुह्मांप्रति ॥ १ ॥

माझ्या मरणामागें ॥ शोक करूं नका
टिपें काढूं नका ॥ डोळ्यांतूनि ॥ २ ॥

जात नसें कोठें ॥ येथेंचि राहाणार
सफल करणार ॥ शुद्धहेतु ॥ ३ ॥

माझे गद्य पद्य ग्रंथ प्रेमें वाचा
प्रसारहि करा ॥ प्रेमें त्यांचा ॥ ४ ॥
माझें स्मारक करणें ॥ तरि हेंच करा
पुतळा धोंडा वाडा ॥ मज नको ॥ ५ ॥
हेतुमाझे असती ॥ तेच मनीं धरा
हाचि मार्ग खरा ॥ स्मारकाचा ॥ ६ ॥
भजणें तें योग्य ॥ एक परमेश्वरा
त्यातें भजा मला ॥ भजूं नका ॥ ७ ॥
जे जे ईशभक्त ॥ स्वदेशाचे भक्त
शुद्ध धर्मनिष्ठ ॥ भले जन ॥ ८ ॥
तेचि माझे सखे ॥ त्यांचा सखा मीहि
करिन सहाय्य मी ॥ त्यांसि सदा ॥ ९
ईश्वरकृपेनें ॥ सज्जनसाहाय्यें
दुष्टांसि सद्बोधें ॥ वळवूं आह्मीं ॥ १०
योग्य उपायांनीं ॥ दुष्ट सुष्ट करूं
सर्व राष्ट्रा आणूं ॥ एकजीव ॥ ११ ॥

राष्ट्र सर्व एकजीव ॥ ऐसें करूं
थोर हेतु भरूं ॥ राष्ट्रामध्यें ॥ १२ ॥

राष्ट्राचे अवगुण ॥ काढूनीयां टाकूं
राष्ट्रकीर्ति नेऊं ॥ दिगंतरीं ॥ १३ ॥

उत्तर उदधि ॥ दक्षिण उदधि
पूर्वेचा उदधि ॥ पश्चिमाब्धि ॥ १४ ॥

यांसह या सर्व ॥ पृथ्वीला भरोनी
नेऊं त्रिभूवनीं ॥ आर्यमहिमा ॥ १५ ॥

प्रिय आर्यराष्ट्र ॥ भूललाम करूं
कल्याणआधारु सर्वराष्ट्रां ॥ १६ ॥

# मित्रांस उद्देशून माझीं स्मारकें मी करून ठेविलीं आहेत तींच चालवा.

## अभंग.

माझीं स्मारकें मीं ॥ मनाजोगीं केलीं
पुस्तकें लिहिलीं ॥ राष्ट्रासाठीं ॥ १ ॥
तैशा कांहीं योग्य ॥ संस्थाहि काढिल्या
असती चालविल्या ॥ मित्रांसह ॥ २ ॥
माझ्या पुस्तकांचा ॥ करणें प्रसार
संस्थांचा उत्कर्ष ॥ नीट करणें ॥ ३ ॥
हींचि तुम्हीं माझें ॥ समजा स्मारक
तेणें माझा जीव ॥ तृप्त होईल ॥ ४ ॥
स्मारकें मजला ॥ दुसरीं नकोत
निरर्थक कष्ट ॥ घेऊं नका ॥ ५ ॥

# दुष्ट छलकांस उद्देशून.

## अभंग.

दुष्टवीर्योन्मत्त ॥ दुर्जनखळहो
थोडी अवधी हो ॥ तुमच्या छळा ॥ १ ॥

जगदीशापुढें ॥ अर्जी गुदरली
तयानें ऐकिली ॥ विनंति माझी ॥ २ ॥

तुमचा आमचा खटला ॥ त्यापुढें निघेल ।
पुरावा घेईल ॥ जगदीश ॥ ३ ॥

माझा पुरावा मी ॥ त्यापुढें मांडीन
तुह्मी छळकजन ॥ आपुला मांडा ॥ ४ ॥

निकाल होईल ॥ त्यासि तयार व्हा
ना तरि विवेका ॥ धरा अझुनी ॥ ५ ॥

---

# अविवेकी राष्ट्रबांधवांस उद्देशून.

## अभंग.

अविवेकी जन ॥ करा राष्ट्रघात
ज्ञानचक्षुअंध ॥ तुह्मीं झालां ॥ १ ॥

खाणें पिणें झोंप ॥ प्रजासंपादन
अन्यत्र यांविण ॥ लक्ष्य न द्या ॥ २ ॥

पुढील काळाचा ॥ विचार न करा
घातक बेपर्वा ॥ तुमची ही ॥ ३ ॥

जे जे कोणी देशकार्यासाठीं झटती
त्यांतें ह्मणा तुह्मीं ॥ माथेफिरू ॥ ४ ॥

उत्तेजन त्यांतें ॥ योग्य तें नच द्या
मार्गीं विघ्नें आणितां ॥ नानापरि ॥ ५ ॥

तुह्माकरितां जे जे ॥ आटाआटी करिती
तयांची फजिती ॥ तुह्मीं चिंता ॥ ६ ॥

अशा या स्थितींत ॥ देशभक्त त्यांनीं
कैशी देशभक्ति ॥ करावी हो ॥ ७ ॥

---

## स्वतःच्या दुःस्थितिसंबंधानें उद्गार-

### अभंग.

पूर्वकर्म दत्त फळ उभें ठेलें
प्रतिकूळ स्थिति पाश आले ॥ १ ॥

वर्तमानजन्मी ॥ माझिया ललाटीं
निराशा बैसली ॥ कृत्येपरि ॥ २ ॥

अनन्य चित्तानें ॥ ईशभक्ति हाच
योग्य प्रतिकार ॥ या कृत्येचा ॥३॥

ईश्वरभक्तीनें ॥ मनमळ जाईल
पुण्योदय होईल ॥ कांहीं काळें ॥ ४ ॥

पुण्योदय पुढें ॥ होईल तेधवां
हेतु शुभ फळा ॥ येतिल माझे ॥ ५ ॥

तोंवरि हे हेतु ॥ गुप्त राहातील
भूमीगतबीज ॥ तैशापरि ॥ ६ ॥

भूमिगतबीजा ॥ अंकुर येतसे
जेधवां होतसे ॥ जलवृष्टि ॥ ७ ॥

पुण्योत्कर्ष काल ॥ येईल तोंवरी
दुःखें माझ्या शिरीं ॥ नाचतील ॥ ८ ॥

( २ )

आयुष्यानें शक्य ॥ पुण्यकर्में करणें
ऐशा विवेकानें ॥ दिवस काढीं ॥ १ ॥

नकळे किती दिन ॥ वर्तमान पुण्य
पूर्वील दुष्कर्म ॥ लोपवील ॥ २ ॥

जोंवरि पूर्वील ॥ दुष्कर्मांचीं फळें
नशीबीं भोगणें ॥ माझ्या असतीं

तोंवरि सकल ॥ वर्तमान पुण्य
जाईल लोपून ॥ त्याच्या बळें ॥ ४ ॥

काहीं पुण्य प्राप्तदुःखातें शमवील
कांहीं सौम्य करील ॥ दुःखव्यथा ॥ ५ ॥

कांहीं भवितव्य दुःखातें टाळील
कांहीं मनीं देईल ॥ समाधान ॥ ६ ।

कांही रुष्ट दिव्यजना सांत्ववील
कांहीं नित्य कष्ट ॥ करिल कमी ॥ ७ ॥

पुढील काळाच्या ॥ तजवीजीसाठीं
संग्रहा पडेल ॥ कांहीं पुण्य ॥ ८ ॥

विवेकानें ऐशा ॥ दिन काढिताहें
शरणागत आहें ॥ विश्वनाथा ॥ ९ ॥

माझा विश्वनाथ ॥ कृपामूर्ति आहे
मज रक्षिताहे ॥ संकटांत ॥ १० ॥

# स्वप्नस्थितींतही मनाची निर्मळता अखंड असावी यासाठीं ईश्वरप्रार्थना.

## अभंग.

जागृतींत मन ॥ निर्मळ राखिलें
मोठ्या शिकस्तीनें ॥ दक्षपणें ॥ १ ॥
परि स्वप्न जगीं नचाले अधिकार ॥
जागृति विसर ॥ पडुनि जाई ॥ २ ॥
जागृति धडपड ॥ जागृतिस्थयत्न
यांचें स्वप्नीं स्मरण ॥ राहात नसे ॥ ३ ॥
पुन्हा स्वप्नांतूनि ॥ जागृतींत येतां
खेद मम चित्ता ॥ फार वाटे ॥ ४ ॥
जगदीशा अससी ॥ सर्वस्थितिसाक्षी
जागृति स्वप्नस्थिति ॥ पाहासी दोन्ही ॥ ५ ॥
सुषुप्तीमध्येंहि ॥ तूंच संरक्षीसि
ह्मणुनि तुजसि ॥ शरणागत ॥ ६ ॥

शुद्धमूर्ते नाथा ॥ जगाच्या चालका
स्वप्नींही मजला ॥ शुद्ध ठेवीं ॥ ७ ॥

तुझी कृपा असतां ॥ सर्व शक्य होईल
सर्व भयें जातील ॥ नाशास्थिति ॥ ८ ॥

विश्वाच्या चालका ॥ भक्तांच्या सखया
मनोरथ माझा ॥ पुरवावा ॥ ९ ॥

---

# स्वतःची दुःस्थाति कशी सुधारेल यासंबंधानें उद्गार.

## अभंग.

ललाटीं सुस्थिर ॥ करूनीयां आत्मा
भजणें परमात्मा ॥ तरणोपाय ॥ १ ॥

नित्यदिनक्रिया ॥ विवेकें करावी
सदा संभाळावी ॥ चित्तशुद्धी ॥ २ ॥

लक्ष्य तरि सदा ॥ सर्वत्र अलक्ष्य
एकचित्तें लक्ष्य ॥ विश्वेश्वरीं ॥ ३ ॥

ऐशारीती भावीदिन या जन्माचे
काढीत राहाण्याचें ॥ आलें दैवीं ॥ ४ ॥

दुष्ट परिस्थिति ॥ सर्वपरि जाचे
दुःख फार होतें ॥ पदोपदीं ॥ ५ ॥

एखाद्या पक्ष्याच्या ॥ पंखांतें छाटावें
मग त्यानें जैसें ॥ धडपडावें ॥ ६ ॥

तैशी माझी स्थिति ॥ केली प्राक्तनानें
बहु धडपडें ॥ परि विफल ॥ ७ ॥

पक्षीयाला पुन्हा ॥ पंख प्राप्त होतां
गगनीं भराऱ्या ॥ पुन्हा मारी ॥ ८ ॥

तैशी मज पुन्हा ॥ येतां शुभस्थिति
आनंदाची भरती ॥ येईल मज ॥ ९ ॥

( २ )

सूक्ष्मपणें जगीं ॥ पाहतां मज दिसे
तेज सुखभोगें ॥ शांत होई ॥ १ ॥
दुःखप्राप्ती होतां ॥ तेज चढतसे
आत्मा झगडतसे ॥ दुःखासवें ॥ २ ॥
सुखामध्यें फार ॥ जे जे कोणी रुळती
नष्टतेजास्थिति ॥ येई त्यांतें ॥ ३ ॥
अतिरेक जेथें ॥ सुखाचा जाहला
तेथें फेरा आला ॥ अवदशेचा ॥ ४ ॥
सुखांत असुनी ॥ सावध राहाती
संयम करिती ॥ स्वतःचा ॥ ५ ॥
नेमस्तचि सुख उपभोग घेती
तेचि टाळूं शकती ॥ भावी दुःखा ॥ ६ ॥
माझ्या स्थितिवरुनी ॥ पाहातां मज वाटे
पूर्वी अनुभविलें ॥ सुख अति ॥ ७ ॥
तेव्हां पूर्वदेहीं ॥ न केला संयम
ह्मणुनि पुण्यतेज ॥ नष्ट झालें ॥ ८ ॥

पुण्यतेज नाहीं ॥ ऐसा जन्मा आलों
ह्मणुनीयां झालों ॥ दुःखी प्राणी ॥ ९ ॥
आतां पुण्यतेज ॥ जरी सांठवीन
तरीच होईन ॥ सुखी पुढें ॥ १० ॥

---

## जगद्धिताचे अथवा राष्ट्रीय हेतु न धरणारे व विदेह मोक्ष इच्छिणारे जे लोक त्यांस उद्देशून.

### अभंग.

( १ )

स्थिति अदेहाची ॥ असो प्रिय कोणा
देह हा मजला ॥ आहे प्रिय ॥ १ ॥
वाइट हेतूंतें ॥ मनीं धरूं नये
शुद्ध हेतु ते ते ॥ मनिं धरावे ॥ २ ॥

हेतुसिद्धीसाठीं ॥ देह अवश्य आहे
रहातां देहाविणें ॥ हुरहुर ॥ ३ ॥
सदेह असावें ॥ सत्कर्म करावें
यशानें भरावें ॥ त्रिभुवन ॥ ४ ॥
दुष्टांसि दंडावें ॥ सुजनां पूजावें
सदा वाढवावें ॥ जगत्‌हित ॥ ५ ॥
अनपराधी शील ॥ त्यांतें अभय द्यावें
सन्मार्गी लागावे ॥ खळ जन ॥ ६ ॥
पृथ्वीवरि शांति ॥ सर्वत्र पसरावी
नीति संरक्षावी ॥ आत्मतेजें ॥ ७ ॥
शरणागत चित्तीं ॥ विश्वेशा राहावें
सत्यातें पाळावें ॥ सदाकाळीं ॥ ८ ॥
प्रिय जनासह ॥ उत्सव करावे
सुखी आपण व्हावें ॥ तयांसह ॥ ९ ॥
ऐशी स्थिति मज ॥ मनीं इष्ट वाटे
सत्य सांगतसें ॥ मनिंचे हेतु ॥ १० ॥

अव्यक्ता जाणार ॥ कोणी ते जाणोत
त्यांचा भिन्नपंथ ॥ स्पष्ट आहे ॥ ११ ॥
माझे हेतु तेचि ॥ ज्यांचे चित्तीं असती
तयांची संगती ॥ मज इष्ट ॥ १२ ॥
त्यांचेसवें मज ॥ पुन्हां जन्म आहे
नांदेन सुखानें ॥ त्यांच्यामध्यें ॥ १३ ॥
जगदीशा माझा ॥ हेतु मान्य आहे
ऐसें मज वाटे ॥ अंतरांत ॥ १४ ॥
अंतरांत मज ॥ समाधान आहे
माझा सखा आहे ॥ जगत्कर्ता ॥ १५ ॥

( २ )

अहो जगत्कर्ता ॥ जगातें चालवी
आणि तुह्मी तरि ॥ जगा निंदा ॥ १ ॥
जगदीश जगा ॥ व्यापुनीयां आहे
तुह्मांमध्यें राहे ॥ व्यापुनी तो ॥ २ ॥
जीव तुमचे गेले ॥ कोणत्याहि गति
तरि तुह्मांतरीं ॥ ईश असेल ॥ ३ ॥

महदाश्चर्य कीं ॥ ईश्वर-इच्छेला
आळा घालूं पहा ॥ तुह्मीं जन ॥ ४ ॥
जोंवरि ईश्वर ॥ इच्छा धरीताहे
तोंवरि चालताहे ॥ सर्व सृष्टी ॥ ५ ॥
सृष्टी ही जोंवरि ॥ चालत असेल
तुह्मांला अशक्य ॥ निष्क्रियता ॥ ६ ॥
येथींच्या क्रियांतें ॥ हट्टानें टाळाल
तुह्मीं जेथें जाल ॥ तेथें दुसऱ्या ॥ ७ ॥
तुमचे हे जीव ॥ क्रिया करितील
भाग तयां पाडिल ॥ ईश्वरेच्छा ॥ ८ ॥
ईश्वरें निजेच्छा ॥ जगच्चालनाची
जों न आंवरीली ॥ तोंवरि तुह्मां ॥ ९ ॥
पूर्ण निष्क्रियता ॥ शक्य न कोठेंही
जरि जाणार तरी ॥ त्या अव्यक्ता ॥ १० ॥
येथील गुंत्यांतें ॥ सोडून दीधलें
ह्मणुनि संपलें ॥ न हें जग ॥ ११ ॥

येथील खटपट ॥ हट्टानें टाळीली
दुसरी प्राप्त झाली ॥ ईशनियमें ॥ १२ ॥

चाद तुह्मांसवें ॥ मज न करणें
चला जाणार ते ॥ अव्यक्तासि ॥ १३ ॥

तुमचा मार्ग सोपा ॥ तुह्मांप्रति होवो
वाद संपलाहो ॥ येथें अपुला ॥ १४ ॥

---

## ईश्वरप्रार्थना स्वतःसाठीं व राष्ट्रासाठीं.

### अभंग.

दयेची मूर्ती तूं ॥ असती विश्वेशा
सदा निजभक्तां ॥ संरक्षीशी ॥ १ ॥

अंतर्बाह्य त्यांतें ॥ ठेविशी पवित्र
परम पुण्यलाभ ॥ सदा देशी ॥ २ ॥

माझ्या राष्ट्रासह ॥ मज सर्वकाळ
द्यावें श्रेष्ठपुण्य ॥ विनवीतसें ॥ ३ ॥

सर्वसमर्थ तूं ॥ दहाहि दिशांस
सर्वत्र भरलास ॥ जगदीशा ॥ ४ ॥
माझ्या राष्ट्रासह ॥ मज सर्वकाळ
द्यावें श्रेष्ठबळ ॥ विनवीतसें ॥ ५ ॥
पूर्णवैभव तूं ॥ सर्व वैभवदाता
सदा अपुल्या भक्तां ॥ देशी विभव ॥ ६ ॥
माझ्या राष्ट्रासह ॥ मज सर्वकाळ
द्यावें श्रेष्ठविभव ॥ विनवीतसें ॥ ७ ॥
अभय स्वरूप ॥ अससी विश्वेश्वरा ॥
अपुलीया भक्तां ॥ देशी अभय ॥ ८ ॥
माझ्या राष्ट्रासह ॥ मज सर्वकाळ
द्यावें पूर्ण अभय ॥ विनवीतसें ॥ ९ ॥
आनंदमूर्ती तूं ॥ जगन्नाथा अससी
श्रेष्ठानंद देशी ॥ निजभक्तां ॥ १० ॥
माझ्या राष्ट्रासह ॥ मज सर्वकाळ
द्यावा श्रेष्ठानंद ॥ विनवीतसें ॥ ११ ॥

# ईश्वरप्रार्थना.

## पद.

भो प्रभु ॥ सुखें सदा द्या मजला ॥
शुभमयि स्थिति ॥ सदा द्या बाळा ॥
उत्तम कर्मी ॥ मजला रुचि द्या ॥
सकल संकटिं ॥ रक्षुनि भो प्रभु ॥
सुखें सदा द्या मजला ॥ १ ॥

---

# जीवकर्मगति.

## अभंग.

परघात करिती ॥ उन्मत्तपणानें ॥
ह्मणूनीयां दुःखें ॥ प्राप्त होती ॥ १ ॥
पर अपराध ॥ जैशा रीती केले ॥
त्या रीती भोगणें ॥ दुःखें प्राप्त ॥ २ ॥
प्राणी परस्पर ॥ अपराध करूनी
परस्पर हानी ॥ वाढवीति ॥ ३ ॥

क्वचित एकादा ॥ अनुतापी होई
मार्ग दृढ धरी ॥ अपीडेचा ॥ ४ ॥
ह्मणुनीयां जगीं ॥ सुखी विरळ दिसती
प्रायः असती ॥ सर्व दुःखी ॥ ५ ॥

---

## श्री सर्वेश्वरस्तोत्र.

### दिंडी.

( १ )

विश्वनाथा विनवितों नम्रभावें
सदा हृदयीं आपुलें ध्यान द्यावें
पापचित्तीं वर्तनीं कधिं न व्हावें
शत्रुभय तें अल्पही कधिं नसावें ॥ १ ॥

( २ )

मनीं हौशी सर्वदा शुद्ध याव्या
क्रिया हातुनि सर्वदा शुद्ध व्हाव्या
सदा हौशी शुभफलाप्रति न्याव्या
इष्ट सौख्यांच्या सदा भेटि व्हाव्या ॥ २ ॥

( ३ )

श्रोत्रचक्षु स्पर्शन रसन घ्राण
तशीं इंद्रियें कर्मकारि मन
सदा नीतीच्या संयमीं असोत
सदा पुण्याच्या वृद्धितें करोत ॥ ३ ॥

( ४ )

शुद्ध वस्तु रमणीय सौख्यकारी
नयन माझे पाहोत सदाकालीं
पाहुनीयां मम जीव तृप्त होवो
संग त्यांचा मज पुण्य वृद्धि देवो ॥ ४ ॥

( ५ )

शुद्ध आणिक सुखकारि पुण्यदायी
असे अभिराम स्पर्श सर्वकालीं
देहगात्रां माझिया शांतवोत
सकल तापांतें श्रमांतें हरोत ॥ ५ ॥

( ६ )

मंजु मंजु प्रिय शब्द सौख्यकारी
सुधास्पर्शापरि सकल दुःखहारी
श्रुती माझी सुखवोत सदाकालीं
जीव राहो तल्लीन तयांसंगां ॥ ६ ॥

( ७ )

बाहु, हस्त, अंगुली एकभरें
जीवतृप्ती करणारिं करुत कार्यें
सदा कार्यें शुभ अशीं त्यां मिळोत
जयांमध्यें मन सौख्यदंग होत ॥ ७ ॥

( ८ )

हृदय माझें दृढ धरो अशा वस्तु
जयांपासुनि अंतरा दिव्यहर्षु
तुटी त्यांची स्वल्पही कधिं न होवो
तुटी देणारी स्थिती कधिं न येवो ॥ ८ ॥

( ९ )

मुखें माझ्या होऊत क्रिया ऐशा
सफल करिती ज्या शुद्ध प्रिय इच्छा
स्थिती अनुकूलशि असो या क्रियांतें
नाशपंथा लागोत सकल विघ्नें ॥ ९ ॥

( १० )

चरण माझे गुंतोत अशा कार्यी
श्रमुत नित्यहि सर्वदा अशा रीती
सकल दुःखांची हानि होय पूर्ण
अशी करणी होउं दे त्यांकडून ॥ १० ॥

---

# ईश्वरप्रार्थना.

## पदें.

( १ )

हे विश्वमायबाप ॥
प्रभो हरिं माझा सर्वही ताप ॥ धृ० ॥

संकल्पांमध्यें ॥ दोष वाढले ॥
घडलें बहुतचि पाप ॥ प्रभो ॥
देहक्रियाहि ॥ अयोग्य घडल्या ॥
जरिं मुखिं पुण्यप्रलाप ॥ प्रभो ॥
त्रिदेहस्थानीं ॥ बाधत असती ॥
अपकृत बहुजन शाप ॥ प्रभो ॥
दुःख भोगितां ॥ वाइट वाटे ॥
चित्तिं अतां अनुताप ॥ प्रभो ॥
परि पुनरपि मन ॥ चंचल होउनि ॥
वाढवि मम अघमाप ॥ प्रभो ॥
जगच्चालका ॥ संरक्षीं मज ॥
तारिं तारिं ॥ माय बाप ॥ १ ॥

( २ )

रक्षिं कृपावंता ॥ मजला ॥
अन्न प्राण मन कोशांची मम ॥
राक्षिं सदा शुचिता ॥ मजला ॥
त्रिदेहिं माझ्या ॥ आपुलें निर्मल ॥

तेज भरीं ताता ॥ मजला ॥
पापदोष जे त्रिदेहिं असती
त्याची करिं निर्मुळता ॥ मजला ॥
सर्व स्थितींतहि । सर्वहि काळीं
द्यावी पुण्यमार्गिं स्थिरता ॥ मजला ॥

---

## शूद्धस्थलमहात्म्य.

### दिंडी.

(१)

स्थळीं राहति ज्या शुद्ध जीव नित्य
शुद्ध सुविचारां मनीं स्थान देत
तया ठायीं आकाश शुद्ध राहे
तया ठायींचा पवन शुद्ध वाहे ॥ १ ॥

(२)

अशा ठायीं जलप्राप्ति शुद्ध होई
शुद्ध धान्यांची गर्दि तेथ राही

दिव्य कुसुमें आणि फळें सदाकाळीं
तेथ देती सानंद वृक्षवेली ॥ २ ॥

( ३ )

दिसे न कधीं तेथ रोगराई
भयें नसती त्या स्थळीं कोणतींही
पुण्यवृद्धी निर्विघ्न तेथ होई
तेथ प्रेमें नांदती देवताही ॥ ३ ॥

( ४ )

शुद्ध इच्छा नरनारि मनिं धरीती
अनायासें त्या सदा पूर्ण होती
जगीं वागति कृतकृत्य पूर्ण मोदें
वंद्य होती इतरांस हीं कुटुंबें ॥ ४ ॥

# ईश्वरप्रार्थना.

## दिंडी.

( १ )

जगन्नाथा मज पूर्ण शुद्ध ठेवा
मनीं थारा पापास भुलिं न द्यावा
पूर्वदोषां सत्वरी संहरावें
सकल अशुभांतें सदा निवारावें ॥ १ ॥

( २ )

दुःख देणाऱ्या गोष्टि लया न्याव्या
शुद्ध सुखदायी वस्तु प्राप्त व्हाव्या
पुण्यमार्गामधिं भुली कधिं न याव्या
जरी आल्या तरि नष्ट त्या कराव्या ॥ २ ॥

( ३ )

निरपराधी मम जिणें सदा व्हावें
कुणी रिपुभावें मला मनिं न ध्यावें
शुद्ध आनंदें सुखी जन असावे
शुद्धप्रेमें मज त्यांनिं सौख्य द्यावें ॥ ३ ॥

## स्वतःच्या स्थितीसंबंधानें उद्गार.

### दिंडी.

( १ )

पूर्वजन्मीं मी काय कर्म केलें
म्हणुनि मजला दारिद्र्य प्राप्त झालें
कुणा सुजनातें पूर्वि छळियेलें
म्हणुनि मजला या जन्मि शत्रु झाले ॥ १ ॥

( २ )

काय केले अपराध स्त्रीजनांचे
म्हणुनि हालाहल विषापरी साचे
हाल भोगीतों पत्निवियोगाचे
दुःख वदवेना माझिया जिवाचें ॥ २ ॥

( ३ )

रोष यावा ऐश्वर्य दैवतांना
अशुभ झाल्या दुष्कृती काय नाना

पूर्वजन्माचें चरित मज स्मरेना
अनैश्वर्यांची स्थिति सोसवेना ॥ ३ ॥

( ४ )

भ्रष्ट वैभव दुर्दैवि जीव झालों
विविध दुःखें भोगीत झुरत गेलों
जरी आतां अनुतापि मनिं न होईं
जरी शरणागत ईश्वरा न जाईं ॥ ४ ॥

( ५ )

जरी पुण्यातें प्रतिक्षणिं न जोडीं
जरी सुजनाशीर्वाद शिरिं न घेईं
तरी जीवा आणीक दुःखकारी
अशी होईल स्थिति प्राप्त भावि कालीं ॥५॥

---

# सुखकारी वायू.

## पद.

शुद्ध सुशीतल पवना ॥
सखयारे ॥

मम तनुतापा दूर करीशी ॥
प्राणा बहुपरि रंजविशी
प्रसन्नता चित्तातें देशी
किति मानूं तव उपकृति
सखयारे ॥
शुद्ध सुशीतल पवना ॥ १ ॥

---

## मनोहर राई.

### पद.

किति रम्य मनोहर ॥
तरुराई ॥
मम जीव अहा किति ॥
सुखि होई ॥
हिरवी दाट ही पल्लवगर्दी
पक्षीगण किलबिल मनहारी
कुसुमामोद भरे दिगंतरिं

हर्षें गुंग कसा मी होई
किती रम्य ॥ १ ॥

---

## रम्य जलाशय.

### पद.

रम्य जलाशय शोभे ॥
विस्तृत उद्यानातें सुख दे ॥ धृ० ॥
रम्य जलाशय शोभे ॥
दिव्य सुगंधा कमलें देती
शेवाळाच्या झुलती पंक्ती
त्यां मधुनीयां कांसव फिरती
मच्छ झोंपती शांत कसे हे ॥
रम्य जलाशय शोभे ॥ १ ॥

---

# जीवकर्मगती.

## अभंग.

स्मृति मृत्यूसवें ॥ जातसे जन्माची
काळजी जीवाची ॥ संपे तेव्हां ॥ १ ॥

स्मृति जाई सर्व त्रासांची क्लेशांची
नवीन जन्माची ॥ प्रस्तावना ॥ २ ॥

नवा जन्म झाला ॥ प्राणी जगीं आला
कांहीं न स्मरे त्याला ॥ पूर्वजन्म ॥ ३ ॥

पूर्वजन्मस्मृति ॥ कांहींच न होई
परि न त्या सोडी ॥ पूर्वकर्म ॥ ४ ॥

जैसें कर्म केलें ॥ तैशी स्थिति येई
प्राण्या सुख देई ॥ अथवा दुःख ॥ ५ ॥

जरि न जाहला ॥ अंतरीं विवेकी
जरी मूढस्थिति ॥ वर्तताहे ॥ ६ ॥

पुनः पुन्हा जन्मे ॥ पुनः पुनः मरे
परि न सुटतसे ॥ दुःखांतूनी ॥ ७ ॥

शुद्ध हेतु मनीं ॥ जगद्धितकारी
मनीं सदा धरी ॥ विवेकें जो ॥ ८ ॥
शुद्ध हेतूसाठीं ॥ श्रमे न्यायमार्गें
त्यासि जीवओझें ॥ होत नसे ॥ ९ ॥
भावी कालाविषयीं ॥ जेणें मार्ग धरिला
सत्यपूर्ण भला ॥ पुण्यकारी ॥ १० ॥
येवोत त्यावरि ॥ संकटें आपत्ती
त्याची शांतस्थिति ॥ सदा राहे ॥ ११ ॥
जेव्हां पूर्वदुरितफळें संपताती
तेव्हां प्रकट होई ॥ त्याचें भाग्य ॥ १२ ॥
नवें पाप कधीं ॥ मुळिंही होत नाहीं
पूर्वपाप पाहीं ॥ दुःखें संपे ॥ १३ ॥
सदा नवें नवें ॥ पुण्याचि तो जोडी
तेणें भाग्यघडी ॥ जवळी येत ॥ १४ ॥
असा जो विवेकी ॥ तो नर तरला
ओलांडुनी गेला ॥ भवोदधि ॥ १५ ॥

---

# भाग्यवृद्धि केव्हां होते.

## अभंग.

उपकृति घडे ॥ प्राणीमात्रांवरी
भाग्यवृद्धी तरि ॥ होत असे ॥ १ ॥
सर्वांभूतीं ब्रह्म ॥ त्याचे आशीर्वाद
घेतां प्राणी भाग्यवंत होई ॥ २ ॥
अपकृति करी ॥ जितुकी प्राण्यांसि
तितुकी भाग्यहानी ॥ होत असे ॥ ३ ॥
सर्वांभूतीं ब्रह्म ॥ त्याचे घेई शाप
ह्मणुनी प्राणी होत ॥ हतभागी ॥ ४ ॥

---

# ईश्वरप्रार्थना.

## अभंग.

तुझा मायामोह ॥ पडो सर्व भूतां
मम घात चित्ता ॥ त्यांच्या नसो ॥ १ ॥

तुझें कृपाछत्र ॥ मम शिरीं वसो
मज तान्ह्या असो ॥ सुखशांती ॥ २ ॥

आपत्ती भोगिल्या ॥ भोगीतही आहें
जीव त्रासलाहे ॥ कटकटी ॥ ३ ॥

लोटांगण घेईं ॥ तुझ्या पुढें दीन
माझें भय पूर्ण ॥ संहरावें ॥ ४ ॥

---

## दैन्यवाण्या जिण्याची निंदा.

### अभंग.

नको नको नको ॥ भयभग्नजिणें
मरण बरवें ॥ अशाहुनी ॥ १ ॥

नको नको नको ॥ पापकारी जिणें
मरण बरवें ॥ अशाहुनि ॥ २ ॥

नको नको नको ॥ चिंतादग्ध जिणें
मरण बरवें ॥ अशाहुनि ॥ ३ ॥

नको नको नको ॥ अविवेकी जिणें
मरण बरवें ॥ अशाहुनि ॥ ४ ॥

नको नको नको ॥ संतापाचें जिणें
मरण बरवें ॥ अशाहुनि ॥ ५ ॥

नको नको नको ॥ अपराधी जिणें
मरण बरवें ॥ अशाहुनि

---

# ईश्वरवंदन.

## अभंग.

विश्वव्यापका तूं ममांतरिं असशी
मज जगवीशी ॥ तुज नमो ॥ १ ॥

विश्वचालका तूं ॥ ममांतरीं असती
मज संरक्षीशी ॥ तुज नमो ॥ २ ॥

सर्व समर्था तूं ॥ ममांतरीं असती
मज बळ देशी ॥ तुज नमो ॥ ३ ॥

आनंदस्वरूपा ॥ ममांतरीं असशी
मज सुख देशी ॥ तुज नमो ॥ ४ ॥

शुद्धज्ञानरूपा ॥ ममांतरीं असशी
मज ज्ञान देशी ॥ तुज नमो ॥ ५ ॥

---

# निरपराधी प्राण्यांचे छलकांस व त्यांचे हिंसकांस उद्देशून.

## अभंग.

(१)

अश्ववृषभादि ॥ निरपराधी प्राणी
तयांतें छळीती ॥ नानापरी ॥ १ ॥

ईशदत्तसुखशक्ति घात करिती
निष्ठूर पीडिति ॥ त्यांच्या गात्रां ॥ २ ॥

त्यांच्या देहां छळुनि ॥ सुखें आपण घेणें
धिक् ऐशीं कर्मे ॥ प्रापात्मक ॥ ३ ॥

ऐशीं कर्में करुनी ॥ मिरवीति थोरवी
त्यांसि अधोगति ॥ पुढें आहे ॥ ४ ॥

( २ )

दीनप्राणी मत्स्य ॥ जळीं जे फिरती
त्यांवरि संक्रान्ति ॥ कांहो आणा ॥ १ ॥

कांहो हिंसीतां त्या ॥ जळचर प्राण्यांतें
त्यांनीं अपराध ते ॥ काय केले ॥ २ ॥

मेंढे बकरे हरिण ॥ निरपराधी प्राणी
पृथ्वीवरि फिरुनी ॥ पोट भरिती ॥ ३ ॥

कोंबडे पारवे कवडे आदिपक्षी
दीनप्राणी जाती ॥ सृष्टीमध्यें ॥ ४ ॥

अशा पशूपक्ष्यां ॥ अथवा कूर्ममत्स्या
कारें संहारितां ॥ भक्ष्यासाठीं ॥ ५ ॥

पहा धान्यें फळें ॥ जगदीशें केलीं
असती निर्मीलीं ॥ तुह्मांसाठीं ॥ ६ ॥

कष्ट करुनी धान्यें ॥ फळें मिळवूनी
कां न जगा तुह्मीं ॥ मानवहो ॥ ७ ॥

अविवेकें पडा ॥ तुह्मीं नरकांत
तुह्मां सावध करित ॥ हा वामन ॥ ८ ॥

---

## आत्मबुडव्यांस उद्देशून.

### अभंग.

नीच तयां वाटे ॥ लबाडी करूनी
भाग्य भोगूं आह्मीं ॥ जनामध्यें ॥ १ ॥

ब्रह्म सर्वत्रहि ॥ सर्वकालीं आहे
लबाडीसि पाहे ॥ दंडी नीट ॥ २ ॥

मूर्खपणें वाटे ॥ खोटा मार्ग भला
सत्य मार्ग बरा ॥ नच वाटे ॥ ३ ॥

जगामध्यें खोटें ॥ त्यासि यश नाहीं
ऐसा नियम पाहीं ॥ ईश्वराचा ॥ ४ ॥

विलंदर खोटा ॥ तोचि आत्मबुडव्या
मनीं सदा धरा ॥ तुह्मीं जन ॥ ५ ॥

दुसऱ्या फसवी ॥ तो त्याचा अपराधी
आणि अपराधी ॥ स्वतःचा ॥ ६ ॥

आणिक तो असे ॥ जनाचा अपराधी
वाईट वळण ॥ घाली ह्मणुनी ॥ ७ ॥

तसाच तो असे ॥ देवाचा अपराधी
देवाचा नियम ॥ मोडी ह्मणुनी ॥ ८ ॥

ऐसा खोटा नर ॥ आत्मपरघाती
तयाची फजिती ॥ होते पुढें ॥ ९ ॥

---

# स्वतःच्या स्थितीसंबंधानें उद्गार.

## अभंग.

स्वतःच्या बळानें ॥ शुद्ध जिणें बिकट
ह्मणुनि दिला हात ॥ देवा हातीं ॥ १ ॥

जगाचा चालक ॥ कृपामूर्ती आहे
प्रेमें पाहताहे ॥ प्रेमळ भक्ता ॥ २ ॥
उदासीना उदासीनपणें पाहे
वंचकातें पाहे ॥ क्रोधदृष्टी ॥ ३ ॥
दया गुण ऐसा ॥ विश्वचालकाचा
जाणुनियां त्याचा ॥ भक्त झालों ॥ ४ ॥
त्यासि विश्वासानें ॥ सुखदुःख सांगें
त्याचि कृपा मागें ॥शुभासाठीं ॥ ५ ॥
ईश्वरमनांश ॥ माझें मन राहो
ईश्वरक्रियांश ॥ माझें कर्म ॥ ६ ॥
वेगळा भाव तो ॥ दुःखासि कारण
जिणें ईशाधीन ॥ सुखकर ॥ ७ ॥
विचार करुनी ॥ सुखाचा हा मार्ग
धरिलासे चांग ॥ म्यां वामनें ॥ ८ ॥
जनहो तुह्मांला ॥ सांगें अनुभव
हितासाठीं बोध ॥ लिहियेला ॥ ९ ॥

---

# जगदीश स्तोत्र.

## अभंग.

जगदीशा तूझा ॥ अपार महिमा
मी वर्णूं शकेना ॥ अल्पमति ॥ १ ॥

तुज भय नाहीं ॥ तुज चिंता नाहीं
तुज दुःख नाहीं ॥ अल्पमात्र ॥ २ ॥
तुज उणिव नाहीं ॥ तळमळही नाहीं
तुज पीडा नाहीं ॥ कसलीही ॥ ३ ॥
तुज क्लेश नाहीं ॥ तुज नाश नाहीं
तुज बंधन नाहीं ॥ कोठूनीही ॥ ४ ॥
तुज मोह नाहीं ॥ तुज विस्मृति नाहीं
तुज संशय नाहीं ॥ तिळमात्र ॥ ५ ॥
तुझ्या कृतीमध्यें ॥ स्वल्प चुकी नाहीं
कांहीं दोष नाहीं ॥ कोठेंसुद्धां ॥ ६ ॥
तुजला स्पर्शेना ॥ असत्य अन्याय
दुरभिमान दंभ ॥ बाष्कळपण ॥ ७ ॥

तुजमध्यें नाहीं ॥ पक्षपातमति
नाहीं दुष्टबुद्धी ॥ तुजमध्यें ॥ ८ ॥

तुझा नियम कधीं ॥ तूं मोडीत नाहीं
तुज भ्रम नाहीं ॥ कधां होत ॥ ९ ॥

तुज दगदग ॥ कधीं होत नाहीं
तुज वणवण ॥ नाहीं होत ॥ १९ ॥

तुझ्या कृतीमध्यें ॥ अव्यवस्था नाहीं
कांहीं गोंधळ नाहीं ॥ तुझ्या कृतिंत ॥ ११ ॥

तुझ्या चित्तामध्यें ॥ कांहीं मळ नाहीं
तुझ्या कृतींत नाहीं ॥ त्याचपरी ॥ १२ ॥

तुझी बुद्धी कोठें ॥ व्यर्थ जात नाहीं
वायां जात नाहीं ॥ तुझी क्रिया ॥ १३ ॥

तुझ्या सामर्थ्याचा ॥ थांग कळत नाहीं
तर्क होत नाहीं ॥ तव ज्ञानाचा ॥ १४ ॥

तुझ्या रहस्याचा ॥ स्फोट होत नाहीं
अंत कळत नाहीं ॥ तुझा कांहीं ॥ १५ ॥

तुझ्या स्वरूपाला ॥ मर्यादाचि नाहीं
सर्व दिशांलाहि ॥ तूं अनंत ॥ १६ ॥

तुझ्या अस्तित्वाला ॥ आरंभचि नाहीं
तैसा नाश नाहीं ॥ तव अस्तित्वा ॥ १७ ॥

कालाच्याहि पूर्वीं ॥ कालाच्याहि पुढें
गूढ तुझें जिणें ॥ जगदीशा ॥ १८ ॥

तुझ्या आनंदाची ॥ कांहीं गणती नाहीं
आनंदाची नाहीं ॥ सीमा कळत ॥ १९ ॥

तुझ्या शुद्धतेला ॥ दुजी उपमा नाहीं
अशी शुद्धता ती एकमात्र ॥ २० ॥

तुझी स्वाधीनता ॥ तुझी स्वतंत्रता
यांसि नाहीं उपमा ॥ कांहींएक ॥ २१ ॥

शुद्ध रम्य शांत ॥ जैशी तुझी प्रभा
तैशी तेजप्रभा ॥ दुसरी नाहीं ॥ २२ ॥

जैसी तुझी करुणा ॥ सुखद सर्वांसि
दुसरी गोष्ट तैसी ॥ जगीं नाहीं ॥ २३ ॥

तूं जैसा पोशिंदा ॥ सकलांचा होशी
तैसा कोणी विश्वीं ॥ दुजा नाहीं ॥ २४ ॥

यथायोग्य कर्मफलदाता तूंचि
सहज चालवीशी ॥ विश्वलीला ॥ २५ ॥

अपार ही विश्वलीला तूझी आहे
परी तुज नोहे ॥ स्वल्प त्रास ॥ २६ ॥

चालवीशी सृष्टी ॥ आवरीशी सहज
पुन्हाही सृजीशी ॥ लीलेनें तूं ॥ २७ ॥

तुझ्या योजनांचा ॥ उगम कळत नाहीं
जेथें तेथें तुझें ॥ गूढ रूप ॥ २८ ॥

प्रत्येक गोष्टीचें ॥ कारण शोधितां
शेवटीं अनंता ॥ तूं कारण ॥ २९ ॥

जितुका मनीं जास्त ॥ करावा विचार
तितुका महिमा थोर ॥ वाटे तूझा ॥ ३० ॥

शेवटीं मन त्या ॥ महिम्यांत मुरे
मनपण मोडे ॥ नकळत ॥ ३१ ॥

पुढें आनंदाचा ॥ परम गूढ देश
जेथें भय अशुभ ॥ कांहीं नाहीं ॥ ३२ ॥

तेथें देहावरि ॥ आत्मा साक्षी राही
मागें पुढें पाही ॥ त्रिकालज्ञ ॥ ३३ ॥

सनातनत्वाचा ॥ अनुभव घेई
स्वरूपबोध होई ॥ आत्मयासि ॥ ३४ ॥

आत्मबोध होतां ॥ शांति प्राप्त होई
कृतज्ञ तो होई ॥ जगदीशा ॥ ३५ ॥

जगदीशा मग ॥ क्षणही न विसंबे
त्यांतें स्मरतसे ॥ सर्व स्थितिंत ॥ ३६ ॥

जगदीश स्मरणें ॥ सर्वहि स्थितींत
सर्व भोग्य क्लेश ॥ होत नष्ट ॥ ३७ ॥

मुक्तक्लेश सदानंदीं वागताहे
त्यासि मिळत आहे ॥ अमृतपान ॥ ३८ ॥

अमृतपान तें ॥ सदा ईशस्मरण
सर्वेशवंदन ॥ सदा चित्तीं ॥ ३९ ॥
सर्वेशप्रार्थना ॥ नम्रभावें चित्तीं
सदा करित राही ॥ शुभासाठीं ॥ ४० ॥
हेंचि अमृतपान ॥ हीच मुक्ती जाण
परम निर्वाण ॥ हेंचि असे ॥ ४१ ॥
विचार करुनि ॥ पहा तुह्मीं जन
प्रेमानें वामन ॥ बोलताहे ॥ ४२ ॥

---

## परमेश्वरापाशीं शरणंगतीनें संभाषण.

### अभंग.

अपराधी तूझा ॥ फार फार आहें
बहु त्रासलोंहें ॥ स्वतःवैरि ॥ १ ॥
मन स्थिर क्षणमात्रहि टिकेना
विवेका घेईना ॥ सूज्ञपणें ॥ २ ॥
परोपरि बहुतवेळां समजाविलें
परि व्यर्थ झालें ॥ तितुकें सर्व ॥ ३ ॥

आतां काय करूं ॥ हानी कैशी टाळूं
कैसें स्वाधिन ठेवूं ॥ निज मना ॥ ४ ॥

मनचंचलत्व ॥ सर्वपापबीज
सर्व हानी करित ॥ प्राणीयाची ॥ ५ ॥

आतां दुःखें भोगीं ॥ पूर्वपापफळ
पूर्वपापमूळ ॥ मनदौर्बल्य ॥ ६ ॥

मनदौर्बल्य हें ॥ आतांहि असतां
पुढेंही मजला ॥ गांजील दुःख ॥ ७ ॥

जगाच्या चालका ॥ अच्युता अनंता
शरणागत त्राता ॥ तूं आहेसि ॥ ८ ॥

शरणागत तुज ॥ सर्व भावें आहें
मज पाहें पाहें ॥ कृपादृष्टी ॥ ९ ॥

कायावाचामनें ॥ मज सदाकाळीं
पूर्ण शुद्ध ठेवीं ॥ सत्यरूपा ॥ १० ॥

पूर्ण निरपराधी ॥ सदा मज ठेवीं
पुण्यजोड द्यावी ॥ क्षणोक्षणीं ॥ ११ ॥

पूर्वदोष सर्व ॥ तुवां संहरावे
निर्बीज करावें ॥ आतां त्यांचें ॥ १२ ॥
द्रव्याची अप्राप्ती ॥ आरोग्य-अप्राप्ति
शत्रूंची समृद्धी ॥ छळिती मज ॥ १३ ॥
आतां धावें धावें ॥ संकटनाशना
लक्ष्मीरमणा ॥ करुणाकरा ॥ १४ ॥
तुज विसरलों ॥ अच्युता माधवा
ह्मणुनि पोळला ॥ जीव माझा ॥ १५ ॥
तुझें ध्यान आतां ॥ दृढ देईं चित्तीं
जेणें जीवशांति ॥ होइल सत्य ॥ १६ ॥
व्यापक सर्वत्र ॥ श्रीविष्णो आहेसि
प्रगट जरि होशी ॥ कृपा धरुनि ॥ १७ ॥
तरि सहजचि ॥ मज तारिशील
दूर करिशील ॥ सकल क्लेश ॥ १८ ॥
मी तों अपराधी ॥ ह्मणुनी दुःख भोगीं
समजें हें मनीं ॥ जगन्नाथा ॥ १९ ॥

अपराधी बाळा ॥ माता जरी दंडी
तरि तें दृढ धरि ॥ मातेलाचि ॥ २० ॥

तैसा मी अपराधी ॥ परी तूझें बाळ
ह्मणूनि अव्हेर ॥ करूं नको ॥ २१ ॥

---

## राष्ट्रोन्नति कशी होईल.

### अभंग.

### ( १ )

परस्पर अपराध जरि होती
तरि ऐक्य गोष्टी ॥ वृथा वृथा ॥ १ ॥

मन शुद्ध करा ॥ अनीतीतें सोडा
निरपराधिता ॥ ठेवा कृतित ॥ २ ॥

मग राष्ट्रऐक्य ॥ सहजचि होईल
हित कार्यें घडतील ॥ सहजचि ॥ ३. ॥

पाया आधीं घाला ॥ मग घर बांधा
दृढ पाया नसतां ॥ घर कोसळे ॥ ४ ॥

( २ )

राष्ट्रदेहामध्यें ॥ अंतर्द्वेष ताप
राष्ट्रसौख्यनाश ॥ करीताहे ॥ १ ॥

वाईट आचार ॥ टाका दुराचारी
सर्वश्रेष्ठाचारी ॥ व्हाहो जन ॥ २ ॥

सर्वश्रेष्ठाचार ॥ होतां एकाचार
मग अंतर्वैर ॥ जाईल नाशा ॥ ३ ॥

परि ऐक्यासाठीं ॥ श्रेष्ठाचारत्याग
करूं नका जन ॥ श्रेष्ठाचारी ॥ ४ ॥

मद्यमांसाहार ॥ तुह्मीं धरूं नका
शुद्धाचारी करा ॥ इतरांतें ॥ ५ ॥

शुद्धाचारी सर्व राष्ट्रजना करा
सर्व तुह्मीं वागा ॥ परमप्रेमें ॥ ६ ॥

( ३ )

श्रेयस्कर कैसा ॥ द्वेष आपणा होईल
द्वेषनाश करिल ॥ अधिकाधिक ॥ १ ॥

द्वेष ह्मणजे स्पष्ट अकल्याण इच्छा
आह्मीं एकमेकां ॥ मारीताहों ॥ २ ॥
प्रत्येकाभ्यंतरीं ॥ ईश्वरांश आहे
संभाळीत आहे ॥ त्याचें हित ॥ ३ ॥
जरि जीव परस्पर घात पाहाति
तरि राष्ट्रोन्नति अशक्यचि ॥ ४ ॥
परस्पर घात चित्तीं चिंतीताति
ह्मणुनि राष्ट्रोन्नति ॥ होत नाहीं ॥ ५ ॥

( ४ )

सर्वांच्या अंतरीं ॥ परब्रह्म आहे
कर्म पाहताहे ॥ सकलांचें ॥ १ ॥
अपराध घडतां ॥ कोठेंहि कुणाचा
शाप देई दुष्टा ॥ रोकडाचि ॥ २ ॥
आह्मी शापहत ॥ ह्मणुनि अभागी
होऊं पश्चातापी ॥ तरि बरें ॥ ३ ॥
जरि भाग्यमार्ग ॥ पुढें सुधारणें
तरि न्याय धरणें ॥ अवश्य आहे ॥ ४ ॥

जरि अधिकाधिक ॥ दुःखें न भोगणें
तरि न्याय धरणें ॥ अवश्य आहे ॥ ५ ॥

अनपराधिता ॥ देहीं प्राणीं मनीं
विवेक करूनी ॥ धरूं याहो ॥ ६ ॥

( ५ )

नराच्या जीविता ॥ स्त्रिया सुखाधार
होती प्रवर्तक ॥ प्रिय जनांच्या ॥ १ ॥

ह्मणुनि स्त्रियांच्या ॥ मनींच्या आकांक्षा
सदा शुद्ध ऐशा ॥ पाहिजेत ॥ २ ॥

जरि स्त्रिया राष्ट्रहितदक्ष नसतील
तरि तैसें होतील ॥ प्रियजन त्यांचे ॥ ३ ॥

त्यांचे पति आप्त ॥ कन्यापुत्रजन
स्वकर्तव्यशून्य ॥ बनतील ॥ ४ ॥

ह्मणुनि स्त्रियांतें ॥ शिकवा देशभक्ति
तेणें राष्ट्रोन्नति ॥ होइल खचित ॥ ५ ॥

( ६ )

अपमान अपेष्टा ॥ सोसूनि मिळविलें
तें अन्न बाधतें ॥ विषापरि ॥ १ ॥

ह्मणुनि अपमान ॥ अपेष्टा न होती
ऐशीयाच रीती ॥ तुह्मी वागा ॥ २ ॥

कष्ट जास्त पडले ॥ तरि त्यांतें सोसा
परि अप्रतिष्ठा ॥ घेऊं नका ॥ ३ ॥

आत्मअप्रतिष्ठा ॥ ह्मणजे आत्मघात
आत्मघात हीच ॥ अधोगति ॥ ४ ॥

विवेकी जनहो ॥ शुद्ध जिणें जगा
अधोगति जीवा ॥ देऊं नका ॥ ५ ॥

( ७ )

व्यापार प्रशस्त ॥ द्रव्यप्राप्तिमार्ग
जरि तिकडे लक्ष्य ॥ न दीधलें ॥ १ ॥

तरि द्रव्यहीन ॥ राष्ट्र खचित होईल
सर्व द्रव्य जाईल ॥ परदेशीं ॥ २ ॥

परदेशीं सर्व ॥ द्रव्य जाऊनीयां
होईल दैन्यवाणा ॥ आपुला देश ॥ ३ ॥

ऐसें इतिहास ॥ सांगे पदोपदीं
परि जन तुह्मी ॥ न समजा ॥ ४ ॥

आतां दैन्य तुह्मां ॥ प्रचीतीस आलें
अजुनी जन भले ॥ व्हा सावध ॥ ५ ॥

करा व्यापारांत ॥ उत्साहानें कष्ट
संपादा अपार ॥ धनसंपत्ती ॥ ६ ॥

राष्ट्रसामर्थ्याचें ॥ व्यापार हें बीज
विशेषें प्रस्तुत कालीं आहे ॥ ७ ॥

**पद्यग्रंथ भाग पहिला समाप्त.**

**जगदीशार्पण असो.**

**तत्सत्.**

२(९

REFBK-0000281

REFBK-0000281